# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ३१.१.२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

गुरूवार दिनांक ३१ जानेवारी २००८ (दि.१८.०१.२००८ ची तहकूब सभा) रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.०५ वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त,नगरसचिव तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
०२. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
०३. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
०४. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०५. स.स.श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
११. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१२. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१३. स.स.श्रीमती आशन्ना लक्ष्मी शंकर
१४. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१५. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१६. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१७. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१८. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
१९. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२०. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२१. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२२. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
२३. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२४. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२५. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद खान
२६. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
२७. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२८. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२९. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३०. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
३१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३२. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३३. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनुस
३४. स.स.श्री.खान निसार मोहमंद खान
३५. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
३६. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
३७. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
३८. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष

३९. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४०. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफिज
४१. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४२. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४३. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
४४. स.स.श्रीमती खान जहुरबी नासेर
४५. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४६. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
४७. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
४८. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
४९. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५०. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५१. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५२. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५३. स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
५४. स.स.श्री.खुडे विजय किसन
५५. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
५६. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
५७. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
५८. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
५९. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६०. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
६१. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
६२. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६३. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६४. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६५. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६६. स.स.सौ.जाधव संगीता विठ्ठलराव
६७. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
६८. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६९. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७०. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७१. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७२. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७३. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७४. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७५. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
७६. स.स.सौ.अल्पा विकास जैन
७७. स.स.श्रीमती मोमीन सोफिया फिरदोस अय्युबखान
७८. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
०३. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०४. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी

**विषय क्र. ६३ :**

दिनांक २६.१०.२००७, २९.१०.२००७, २०.११.२००७ आणि २०.१२.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा.महापौर : इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक २६.१०.२००७, २९.१०.२००७, २०.११.२००७ आणि २०.१२.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. ६४ :**

**स्थायी समिती कडील प्रस्ताव**

दिनांक ३१.१२.२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये विषय क्र.२९१ अन्वये घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प संदर्भातील प्रस्ताव मंजुरीसाठी आला असता स्थायी समिती सभेने घनकचरा हाताळणी संबंधी प्रकल्पाची मुदत ठरविण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेला आहे व धोरणात्मक निर्णयासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस केलेली आहे. प्रशासनाचा मूळ प्रस्ताव खालीलप्रमाणे आहे.

**प्रशासनाचा मुळ प्रस्ताव**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, घन कचरा हाताळणी व व्यवस्थापनाची कार्यवाही मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार आणि वने, पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांच्या २५ सप्टेंबर २००० च्या नोटीफिकेशन प्रमाणे करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने घन कचरा व्यवस्थापन नियम २००० ची अंमलबजावणी दिनांक ३० एप्रिल २००७ पर्यंत करण्याचे निर्देश सर्व महानगरपालिकांना दिले आहेत.

**घन कचरा व्यवस्थापन नियम २००० मधील मुद्दे :**

कचरा इतस्तत: न टाकता तो एकत्रित जमा करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा नागरिकांना पुरविणे.
कचरा वेगवेगळा जमा करून (ओला कचरा व सुका कचरा) वेगवेगळ्या कचरा कुंड्यात टाकणे.
घरोघर जावुन कचरा जमा करून, त्याची वाहतुक डंपींग स्टेशन पर्यंत करणे.
कचऱ्याची वाहतुक बंद वाहनातून करणे.
कचऱ्याची हाताळणी करतांना मानवी बळाचा वापर कमी करून यांत्रिकी पध्दतीने हाताळणी करणे.

औरंगाबाद महानगरपालिकेत सध्या कचरा वाहतूक घंटागाड्या मनपाच्या ट्रक, डंपर, कंटेनर, डंपरप्लेसर याद्वारे करण्यात येत आहे. डंपर व ट्रक्स कचऱ्याने भरल्यानंतर ताडपत्रीने झ ाकुनच कचरा डेपोवर नेले जातात, परंतु कचरा वाहतुकीसाठी बंद बॉडीचीच वाहने वापरावी असा नियम असल्याने त्या नियमांचे उल्लंघन होत आहे. उघड्या कचराकुंड्या असू नयेत व मानवी हाताने त्याची हाताळणी करू नये, असे नियम असतांना आपल्याकडे यांत्रिक साधने उपलब्ध नसल्याने कामगारांकडूनच कचरा उचलण्याचे काम करून घ्यावे लागते. सदरची कार्यपध्दती ही मा.सर्वोच्च न्यायालयाच्या नियमांविरूध्द आहे व अशा प्रकारे नियमांचे पालन होत नसल्याने मा.न्यायालयाकडून दंडात्मक कार्यवाही देखील होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पर्यावरण संरक्षण कायद्या अंतर्गत खालील प्रमाणे नियमावली तयार असुन, नियमावलीनुसार ज्या नगरपालिका व महानगरपालिका कार्यवाही करणार नाहीत, त्यांचेवर सेक्शन १५, १६, १७, १८, इपीजे १९८६(२९) अन्वये,

१) सरकारी खात्याकडून दिरंगाई झाल्यास कलम१५ व १७ अंतर्गत दंडात्मक कार्यवाही होवु शकते.
२) दंडात्मक कार्यवाही व शिक्षा ही सेक्शन १५ मध्ये विहीत केली असून ५ वर्षा पर्यंत कारावास किंवा १ लाखा पर्यंतदंड किंवा दोन्ही प्रकारची कार्यवाही होवु शकते.

पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ (२९) कलम १७ अन्वये सरकारी खात्या अंतर्गत होणारे गुन्हे कुठल्याही अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे किंवा दुर्लक्ष करण्यासाठी संधी दिल्याने सदरचा अधिकारी शिक्षेस पात्र राहील.

सध्या आपल्याकडे कार्यरत यंत्रणा ही अपुरी असून नियमांचे उल्लंघन होत असल्याने अनेक कायदेशीर समस्या निर्माण होवू शकतात.

- घन कचरा व्यवस्थापनाच्या नियमामध्ये झालेल्या अमुलाग्र बदलांचे पालन करण्याच्या दृष्टीने औरंगाबाद महानगरपालिकेने या कामी All India Institute of Local Self Govt., Mumbai या संस्थेची Project Management Consultant (PMC) म्हणुन नियुक्ती केली आहे.
- All India Institute of Local Self Govt.,Mumbai यांनी औरंगाबाद शहराच्या घनकचरा व्यवस्थापना साठी केलेल्या सखोल अभ्यासाद्वारे तयार केलेल्या प्रकल्प अहवालास सर्वसाधारण सभेने विषय क्र.९६३ दि.१८.७.२००७ अन्वये सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी दिली आहे व वैधानिक कार्यवाही करण्याचा ठराव पारित केला आहे.

त्यानंतर निविदा सुचनेचे जाहीर प्रकटन दैनिक लोकमत, दै.हिंदुस्थान टाईम्स व दै.नवभारत या वर्तमानपत्रात देण्यात आले. तसेच इ-टेंडरींग पध्दतीनुसार महानगरपालिकेच्या वेबसाईटवर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली. दिनांक ३ सप्टेंबर २००७ रोजी Pre-bid meeting घेण्यात येवुन त्यामध्ये उपस्थित bidder बरोबर चर्चा करून काही निर्णय घेण्यात आले. नवीन वाहनांचे आयुष्य हे दहा वर्षे असल्यामुळे ७ वर्षाच्या कालावधीनंतर देखील आणखीन ३ वर्षे जास्ती पर्यंत त्याचा वापर करू शकतो. या मुद्यावर तांत्रिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या विचार करून निविदेचा कालावधी ७ वर्षावरून १० वर्षापर्यंत सर्वानुमते वाढविण्यात आला.

महानगरपालिकेतर्फे डिस्पोझल साईटवर वर्कशॉप व पार्कींग करीता एक हेक्टर जागा देण्याचे ठरले. परंतु जर संबंधीत कंत्राटदार यांना शहर विभागात कार्यालय, पार्कींग व वर्कशॉपसाठी जागा घ्यावयाची असेल तर त्यांच्या स्वतःच्या खर्चाने घ्यावी लागेल. त्यासाठी महानगरपालिका वेगळा खर्च देणार नाही.

सर्व बिडर्सना इ-टेंडरींग पध्दतीची माहिती देण्यात आली. दिनांक १७.९.२००७ रोजी दुसऱ्यांदा प्रि-बिड मिटींग घेण्यात आली. यामध्ये टेंडर स्विकृतीची मुदत १३.९.२००७ ऐवजी वाढवून १८.९.२००७ करण्यात आली.

एकूण पाच टेंडर विक्री झाले. परंतु फक्त एकच टेंडर प्राप्त झाले व सिंगल टेंडर आल्यामुळे दुसऱ्या वेळी निविदा सुचना वर्तमानपत्रात व वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार निविदा स्विकृतीची तारीख दिनांक ५.१०.२००७ देण्यात आली व दिनांक २७.९.२००७ रोजी प्रिबिड मिटींग घेण्यात आली.

एकूण पाच निविदा विक्री झाल्या व खालील प्रमाणे चार निविदा प्राप्त झाल्या.

**M/s. Sham Narayan & Brothers, Mumbai.**
**M/s. Center for Development Communication, Jaipur.**
**M/s. Ramky Enviro Engineers Ltd., Hyderabad.**
**M/s. Antony Waste handling cell Pvt. Ltd., Mumbai**

दिनांक ६.१०.२००७ रोजी E-Tendering विभागात निविदेची Technical Bid उघडण्यात आली. निविदेमधील अटी/शर्तीचे पालन न केल्यामुळे दोन निविदा फायनान्सीयल बिड उघडण्याकरीता अपात्र ठरविण्यात आल्या.

दिनांक २०.१०.२००७ रोजी तांत्रिकदृष्ट्या पात्र असलेल्या दोन निविदाधारकांची कमर्शियल बिड उघडण्यात आली. त्यांनी दहा वर्षाच्या कालावधीसाठी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

१. **M/s. Antony Waste handling cell Pvt. Ltd., Mumbai** — **Rs.११८.४५ Crores**
२. **M/s. Ramky Enviro Engineers Ltd., Hyderabad.** — **Rs.११०.९८ Crores**

**M/s. Ramky Enviro Engineers Ltd., Hyderabad** यांची निविदा तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची आहे. मा.आयुक्त, मनपा औरंगाबाद यांनी **M/s. Ramky Enviro Engineers Ltd., Hyderabad** यांना प्रत्यक्ष वाटाघाटीस हजर राहण्याचे कळविले. वाटाघाटीअंती **M/s. Ramky Enviro Engineers Ltd., Hyderabad** यांनी त्यांचे दर रूपये १०८.५ कोटी पर्यंत कमी करण्याचे मान्य केले आहे.

**<u>कंत्राटदाराच्या कामाचे स्वरूप पुढील प्रमाणे राहील.</u>**

१) घरोघरीजावुन कचऱ्याचे संकलन करणे, ओला कचरा व सुका कचरा वेगवेगळा जमा करणे.
२) घरोघरी जावुन जमा केलेला कचरा छोट्या बंद वाहनातुन मोठ्या कॉम्पॅक्टर्स पर्यन्त वाहुन नेणे व त्यात ट्रान्सफर करणे.
३) मोठ्या कॉम्पॅक्टर्सद्वारा कचऱ्याचे वहन डंपींग ग्राऊंड पर्यंत करणे.
४) घनकचरा व्यवस्थापनाच्या नियमामध्ये झालेल्या अमुलाग्र बदलांविषयी जनजागृती कार्यक्रम राबविणे.
५) डब्रीज, ग्रीन वेस्ट (पालापाचोळा), यांचे संकलन आणि वहन स्वतंत्रपणे डंपरप्लेसर्स, हुक लोडर्स द्वारे करणे.

**M/s. Ramky Enviro Engineers Ltd., Hyderabad** हे पुढील प्रमाणे बंद वाहने, मशिनरीज, इक्वीपमेंट पुरवठा करणार आहेत.

| Sr. No. | Item | Minimum Requirement of AMC | Number offered by Ramky |
|---|---|---|---|
| १) | Litter bins ५० Liters units | ७७० | ७७० |
| २) | Transfer point bin ११०० liters units | ३४० | ३७४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३) | Bulk Generators bins, units | ६६० | ६६० |
| ४) | Skip bins ४५०० liters units | ०६ | ०६ |
| ५) | Hook lift container ८००० lit. units | ०१ | ०१ |
| ६) | Hand carts with ६० lit. bins, units | २०० | २०० |
| ७) | Tricycle ३३० lit. container units | ५७ | ५७ |
| ८) | Mini truck ७५० kilograms १.५ GVW units | ३४ | ३५ |
| ९) | Compactor small ५-६ ft., १०-११ GVW units | १७ | १९ |
| १०) | Compactor ८ medium ८ T, १६ GVW units | ११ | १२ |
| ११) | Skip loader ३-४T, ११ GVW units | ०१ | ०१ |
| १२) | Hook lift truck, ८T १६ GVW units | ०१ | ०१ |
| १३) | Excavator, loader backhoe, units | ०१ | ०१ |

तसेच बिन्स ठेवण्यासाठी सिमेंट कॉंक्रीट प्लॅटफॉर्म उभारणे, कम्युनिकेशन सिस्टीमची व्यवस्था करणे, स्वतःचे कार्यालय व वर्कशॉप स्थापन करणे, ३० टनी वेइंग ब्रीज इतर सुविधांसह उभारणे, जी.पी.एस. सिस्टीमची व्यवस्था करणे इत्यादी सुविधा कंत्राटदाराने उभारावयाच्या आहेत.

**M/s. Ramky Enviro Engineers Ltd., Hyderabad** यांनी पुरवठा केलेल्या सर्व बंद वाहनांची देखभाल, निगा, दुरूस्ती इत्यादीची जबाबदारी त्यांचीच असेल, तसेच घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी लागणारे मनुष्यबळ संबंधीत कंत्राटदारानेच पुरवावयाचे असून त्यांचे वेतन कामगार कायद्यानुसार द्यावयाचे आहे. घन कचरा व्यवस्थापनाच्या नियमामध्ये झालेल्या अमुलाग्र बदला विषयी औरंगाबाद शहरामध्ये जनजागृती करण्यासाठी खास जनजागृती कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारी देखील कंत्राटदाराचीच असेल.

कंत्राटदारास घन कचरा हाताळणी व व्यवस्थापनातील विविध मुद्यांच्या मुल्यमापनावरून बिलाची अदायी करण्यात येईल. कंत्राटदाराच्या कामाचे मुल्यमापन, औरंगाबाद महानगरपालिकेचे संबंधीत स्वच्छता निरीक्षक, वॉर्ड अधिकारी हे करतील. कंत्राटदाराचे काम १०० टक्के समाधानकारक असेल तरच संपूर्ण बिलाची अदायी करण्यात येईल, अन्यथा मुल्यमापनाच्या प्रमाणात बिलातील रक्कमेत कपात करण्यात येईल. एकुणच औरंगाबाद शहराच्या संपूर्ण स्वच्छतेसाठी व नागरी आरोगयासाठी प्रभावी उपाययोजना या प्रकल्पाद्वारे राबविण्यात येणार आहेत.

करीता **M/s. Ramky Enviro Engineers Ltd., Hyderabad** यांनी दाखल केलेली घन कचरा व्यवस्थापन व हाताळणी संबंधीची १० वर्षे मुदतीची व रूपये १०८.५ कोटी खर्चाची निविदा मंजुरीस्तव सादर.

**चर्चा :**

श्री.संतोष जेजूरकर :हा विषय स्थायी समितीकडून आलेला असून मुदतवाढ मागितलेली आहे. ती देण्यात यावी.

श्री.संजय केनेकर : ७ वर्षावरून १० वर्ष मुदतवाढ मागितलेली आहे मान्यता द्यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:महत्वाचा विषय आहे पूर्ण चर्चेची नोंद व्हावी. खाजगी एजन्सीला दिल्यास खर्च जास्त होणार आहे त्यासाठी महापालिकेने मशीनरी खरेदी करून कर्मचारी देऊन हा प्रकल्प चालवावा या ठरावास माझा वैयक्तिक विरोध आहे.

श्री.कैलास गायकवाड :माझा या ठरावास विरोध नोंद करून घ्यावा.

श्री.हिम्मतराव दाभाडे : घरापर्यंत जावून कचरा नेणार का. ज्या गल्ली मध्ये वाहन जाणार नाही त्या ठिकाणी काय व्यवस्था करणार आहे. अनेक प्रकल्पाचे खाजगीकरण केलेले आहे. बीओटीवर दिले परंतू त्या-त्या एजन्सीज चांगले काम करीत नाही घनकचरा व्यवस्थापनाचे खाजगीकरण करू नये माझा यास विरोध आहे.

श्री.कचरू मोरे :कचरा व्यवस्थापनासाठी जागाच अद्याप उपलब्ध नाही. घनकचरा प्रकरणात महापालिकेची मोठी बदनामी झालेली आहे. याची नोंद घ्यावी. वाहनावर जो खर्च होणार आहे तो महापालिका करू शकते खाजगी एजन्सीला ११० कोटी देण्याऐवजी महापालिकेने हे काम करावे हा प्रस्ताव मंजूर करण्यास माझा विरोध आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :महापालिकेचे मुख्य उत्पन्न जकातीतून मिळते जकात नाका रद्द झाल्यास हा खर्च कसा पेलणार याचा विचार करून हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :हा विषय मंजूर करतांना जनतेच्याही भावना लक्षात घ्याव्यात. हा विषय स्वच्छता व आरोग्याशी निगडीत आहे. १० वर्षासाठी देत आहोत. खर्चाचा विचार करून योग्य तो निर्णय घ्यावा १०८ कोटी देणार उद्या काम कसे होईल याचा विचार करावा खाजगी एजन्सीस देण्यास माझा वैयक्तीक तसेच पक्षाचा पण विरोध आहे.

मा.महापौर :मा.आयुक्त यांनी माहिती द्यावी.

मा.आयुक्त :सध्या घनकचरा व्यवस्थापनासाठी असलेली वाहने जुनी झाली आहेत. प्रभावी नाही. कॉम्पक्टर वगैरे नाही. घरी जाऊन कचरा गोळा करणे आवश्यक आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने जे नियम घालून दिले आहे त्यानूसार कचरा गोळा करून वाहतूक करणे अपेक्षीत आहे. मा.न्यायालयाने आदेशाचे पालन करणे बंधनकारक आहे. दोन पर्यायाने हे करता येते महापालिकेने वाहन खरेदी करून मजूर कर्मचारी ठेवून कचऱ्याची विल्हेवाट लावणे किंवा खाजगी एजन्सीला कचरा उचलण्याचे टेंडर काढून कार्यवाही करणे असे दोन प्रकारे हे काम करता येते. खाजगी एजन्सीला मार्फत काम करण्यासाठी १-२ वर्षापूर्वी सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली आहे त्यानंतरच याची पूढील कार्यवाही सुरू झालेली होती. आज महापालिकेच्या वतीने कचऱ्यांची विल्हेवाट होते ७.५ ते ८ कोटी खर्च येतो. सध्या १० ते १५ टक्केच घरापर्यंत जावून कचरा गोळा करतो बाकीच्या ठिकाणचा कचरा गोळा करण्याची सिस्टम इम्प्रुव्ह करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. सध्या काम्पक्टर नाही. कचऱ्याची वाहनावर कव्हर वगैरे टाकून वेगवेगळया कुंडया त्यावर झाकन ठेवणे यासाठी सिस्टम सुधारण्याचा प्रयत्न करीत आहे जो प्रस्ताव ठेवला यात महापालिकेचा आर्थिक फायदा आहे असे प्रशासनाचे मत आहे घरी जावून कचरा गोळा करणार वेगवेगळया साईजची गाडी घेणे अभिप्रेत आहे दोन वेगवेगळया अशा ८०० ते ८५० जागेवर त्यांनी कचरा कुंडया लावणे,कचरा कुडंयाच्या बाजूला कचरा दिसणार नाही ही अट आहे. यासाठी जवळपास ७.५ ते ८ कोटी खर्च येईल दरवर्षी २ कोटीची वाढ आहे. जे सिस्टम घालून दिले त्याची अमलबजावणी झाली तर डस्टबीन उघडयावर दिसणार नाही बाहेर कचरा दिसणार नाही. पूर्ण सिस्टम डिझाईन केलेले आहे व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे कोणत्या पध्दतीने विल्लेवाट लावावयास पाहिजे या बद्दल ऑल इंडिया लोकल सेल्फ गव्हर्नमेंन्टला दिले होते त्यांनी पूर्ण अभ्यास करून घनकचऱ्याची वाहतूक, कलेक्शन कसे असावयला पाहिजे याबद्दल अहवाल दिला.

श्री.रेणुकादास वैद्य : जकात खाजगीकरण केल्यानंतर तेथील कर्मचारी वसूलीसाठी वापरणार असे प्लॅनींग केले होते त्याप्रमाणे हा प्रकल्प खाजगी तत्वावर दिल्यास तेथील कर्मचारी उपलब्ध होणार याबाबत प्लॅनींग केलेले आहे का ?

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :यापूर्वी वार्ड कार्यालय ड तसेच ब स्वच्छतेचे खाजगीकरण केलेले होते त्यांचा अनुभव काय? त्या एजन्सीवर कोण नियंत्रण ठेवते माझ्या माहिती प्रमाणे रस्त्यावरचा कचरा सदर एजन्सीचे लोक रस्त्याच्या कडेला लावतात इतर ठिकाणी ही साफसफाई होत नाही. जनतेचे सहकार्य मिळाले तरच हा प्रोजेक्ट सफल होणार असे माझे मत आहे इतर मनपात खाजगीकरण केलेले आहे काय याची माहिती घ्यावी.

श्री.प्रशांत देसरडा :खाजगी एजन्सीला स्वच्छतेचे काम दिले होते स्वच्छता होते का या बाबतीत कमेटी नियुक्त केली त्यात स.सदस्य श्री.पाथ्रीकर होते त्यांनी अहवाल द्यावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:खुलासा योग्यप्रकारे दिला जात नाही. ७.५० कोटी खर्च येणार पूढे ही येत राहीलच जे कर्मचारी असतील त्यांना काढता येणार नाही. नंतर विचार करता येईल. जकात खाजगीकरण झाल्यानंतर वसुलीसाठी कर्मचारी पाठवून वसूलीसाठी कर्मचारी दिले वसूली २५ टक्केच. बाकीचे कुठे आहे.

हा ठराव स्थगित ठेवून मा.पदाधिकारी स्थायी समितीचे सदस्य मा.आयुक्त यांची कमेटी करून त्यावर अभ्यास करून पूढील बैठकीत घेण्यात यावे आता मंजूर केले तर विरोध आहे. अगोदर या विषयास सभागृहाची सम्मती नव्हती आता मंजुरी देण्याची तयारी आहे यामूळे नागरीकांसमोर सभागृहाच्या चांगल्या भावना जात नाही.

मा.आयुक्त :हा प्रस्ताव मंजूर केल्यास वार्ड कार्यालय ड व क चे स्वच्छतेचे खाजगीकरण करण्याची गरज पडणार नाही. यासह इतर स्वच्छतेसाठी वाहन चालक व इतर कर्मचारी याबाबत जाणीव आहे. दोन वार्डात जो खर्च होतो तो कमी होईल एकुण दोन कोटी रूपये जास्त जातील मा.सर्वोच्च न्यायालयाचे जे निर्देश आहे त्याची ही अमलबजावणी होईल. गव्हर्नमेंन्ट कडील पीएमसी नियुक्त केले होते. त्या पीएमसीने येथील सिस्टम बाबत पाच सहा महिने अभ्यास करून काय काय ॲक्टीव्हिटीज करावयास पाहिजे तशी सिस्टम करून दिली. त्यानूसार टेंडर काढले होते. डिझेल,देखभाल दुरूस्ती,रिकरींग खर्च वर्षाला २ कोटी येणार ते योग्य आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे विल्हेवाट लावणे आवश्यक होते. सर्वसाधारण सभेने एक दीड वर्षापूर्वी खाजगीकरणाच्या माध्यमातून कार्यवाही करण्याची परवानगी दिली होती. गाडयांची लाईफ ही १० वर्षाची असते त्यामूळे ७ वर्षा ऐवजी १० वर्षासाठी द्यायचे की नाही यासाठी प्रस्ताव ठेवलेला आहे. खाजगीकरण केल्यानंतर कोणत्याही मनपाच्या कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले जाणार नसून त्यांना इतर ठिकाणी दिले जाईल जे आहे ते पुरेसे कर्मचारी होतील. महापालिकेच्या वतीने करावयाचे असेल तर कर्ज घेवून वाहने घेणे तसेच कर्मचारी घेणे शक्य नाही. ऑलरेडी ३९ ते ४० टक्के खर्च करतो कमीत कमी १००० कर्मचारी लागतील ते नियुक्त करणे टेक्नीकली शक्य नाही सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानंतर ऑल इंडिया सेल्फ गव्हरमेंन्टला पाठवून त्यांचे सजेशन प्रमाणे टेंडर कॉल केले. दोन अडीच कोटी जो एक्स्ट्रा खर्च पडणार आहे तो यामूळे करीत नाही की खाजगीकरण करीत आहे. शहरात कचरा डोअर टू डोअर तो १०० टक्के उचलावयाचा असेल गाडीतून कचरा जात असतांना बंद करून गेला पाहिजे सर्व जागेवर दोन वेगवेगळया कचरा कुंडया असावयास पाहिजे त्या बंद असावयास पाहिजे हे सर्व करण्यास महापालिकेला २ कोटीपेक्षा जास्त खर्च प्रत्येक वर्षाचा पडेल. सिस्टम चांगल्या पध्दतीच्या असून त्यानूसार कार्यवाही होणार आहे पीएमसीने जे सिस्टम घालून दिले शहरासाठी ही सिस्टम फारच योग्य आहे असे प्रशासनाचे मत आहे दुसरे असे की वेस्ट टू एनर्जी प्लॅन्ट मंजूर केलेला आहे. घनकचऱ्यांच्या व्यवस्थापनामध्ये चार प्रोजेक्ट महत्वाचे होते. त्यात कचरा हा शास्त्रोक्त पध्दतीने घेवून जाणे व कलेक्शन करायचे आहे. नारेगावहून शिफ्ट करून दुसरीकडे जागा निवडायची आहे. तसेच वेस्ट टू एनर्जी प्रोजेक्ट करायचे,१२ वा वित्त आयोगाचे निधी मिळाल्यानंतर नारेगाव चे मेजर पोर्शन बंद करण्याचे टेंडर काढले आहे. स्थायी समिती समोर येणार आहे. मान्यता झाल्यानंतर तेथील काम बंद करू शकतो दुसरी जागा ही विमानतळा पासून कमीत कमी २० कि.मी. असावयास पाहिजे. यापेक्षा जास्त अंतरावर जागा निवडली तर बदलावे लागेल. गाडयांची लाईफ ही १० वर्षाची असते ७ वर्ष चालविल्यानंतर ३ वर्षासाठी नविन घेणे परवडणार नाही. म्हणून ७ ऐवजी १० वर्ष केलेले आहे. ही योजना सफल होण्यासाठी नागरीकांचे सहकार्य लागेल नागरीकांना समजून सांगून त्यांचा गैरसमज दुर करून घ्यायला पाहिजे. योग्य प्रस्ताव असल्याने मान्यता द्यावी.

सौ.पुष्पा शिंदे : माझ्या वार्डात महानगरपालिकेचे कर्मचारी काम करतात. जे कर्मचारी स्वच्छतेचे काम करतात त्यांना बेरोजगार करणार का? प्रस्ताव मंजूर करण्यास माझा विरोध आहे.

मा.आयुक्त :खाजगी एजन्सीला काम दिले तरी महापालिकेच्या कोणत्याही कर्मचाऱ्यास कामावरून कमी केले जाणार नाही जेथे कमी आहे तेथे दिले जातील.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : आमचा विरोध नोंदून घ्या यासोबत इन्डेक्स नाही.अनेक्झर जोडले नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :तांत्रिक बाबी तपासून कार्यवाही करावी. सर्वसाधारण सभेपूढे पीएमसी नियुक्त करण्याचा प्रस्ताव आलेला होता. तांत्रिक दृष्या अडकू नये. प्रथम खाजगीकरण करण्यास मान्यता देवून नंतर या प्रस्तावास मान्यता द्यावी.

श्री.कचरू मोरे :मा.आयुक्तांनी व्यवस्थीत सिस्टीम सांगितली. एसटी महामंडळाची परीवहन सेवेस घसरण आली होती. आता चांगल्या प्रकारे शहरात बस सेवा चालू आहे. एसटी महामंडळाने जशी सुधारणा करून घेतली त्यापध्दतीने महानगरपालिकेने कचरा उचलण्याचे खाजगीकरण न करता महापालिकेच्या वतीने राबवावी. महापालिकेकडे उत्पन्नाचा स्त्रोत नाही या ठरावास माझा व माझ्या पक्षाच्या वतीने विरोध नोंद करून घ्यावे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :यावर सखोल अभ्यास करून नंतर योग्य तो निर्णय घ्यावा. मार्च नंतर ठरवा, आता घाई करू नये.

सौ.संगिता जाधव :माझा पण या ठरावास विरोध आहे.

सौ.वंदना खंदारे :माझा पण या ठरावास विरोध आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : आमचा ठरावास विरोध आहे.

मा.महापौर : सदरील ठराव हा सर्वसाधारण सभेपूढे निविदेचा कालावधी १० वर्षे मुदतीकरीता करण्यासाठी आलेला आहे. या प्रस्तावावर सर्व निर्णय स्थायी समितीने घ्यायचे आहेत. १० वर्षासाठी जी मुदत मागीतली आहे, ती मंजूर करून हा प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविण्यास शिफारस करण्यांत येते. ज्या सदस्यांचा प्रस्तावास विरोध आहे, तो नोंदवून हा प्रस्ताव मंजूर करण्यांत येत आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घन कचरा हाताळणी व व्यवस्थापनाची कार्यवाही मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार आणि वने, पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांच्या २५ सप्टेंबर २००० च्या नोटीफिकेशन प्रमाणे करणेस तसेच महाराष्ट्र शासनाने घन कचरा व्यवस्थापन नियम २००० ची अंमलबजावणी संदर्भाने प्रस्तुत प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे,निविदेचा कालावधी १० वर्षे मुदतीकरीता करण्यास मंजूरी देण्यांत येवून सदरील प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविणेस शिफारस करण्यात येते. तसेच ज्या सदस्यांचा प्रस्तावास विरोध आहे, त्यांचा विरोध नोंदवून प्रस्तावास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ६५ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७६ अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणेचे कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००६-२००७ च्या जिल्हादरसुचीनुसार रक्कम रू.३५,३९,२७७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर प्रभाग गुंठेवारी प्रभागात येत असल्याने गुंठेवारी प्रशमण फिस जमा रक्कमेच्या अधिन राहून काम करणेस मंजुरी दिलेली आहे. सदर कामाचा खर्च गुंठेवारी प्रशमण शुल्क जमा रक्कमेतून करण्यात येणार आहे.

करीता सदर कामाचे रक्कम रू.३५,३९,२७७/- चे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७६ अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणेचे कामाचे रक्कम रू.३५,३९,२७७/- चे अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते. तसेच सदर कामाचा खर्च गुंठेवारी प्रशमण शुल्क जमा रक्कमेतून करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>संवाद :</u>**

याच वेळी विषय क्र. ६४ हा नामंजूर करण्यासाठी स.सदस्य मागणी करतात डायस समोर खाली बसतात.

मा. महापौर :कुणी सदस्यांनी डायससमोर बसू नये. सभागृहाचा अवमान होणार नाही याची सर्वांनी दखल घ्यावी.खाली बसू नये.

श्री.संजय सिरसाट :डायससमोर बसलेले सदस्यांना जागेवर बसवावे त्यानंतर कामकाज करावे.

श्री.काशिनाथ कोकाटे : या सभागृहाचे आम्ही सदस्य आहोत आम्हाला बोलण्याची संधी दयावी.

याच वेळी मा.महापौर यांनी आदेशीत करूनही डायस समोर खाली बसलेले सदस्य जागेवर बसत नाही

मा. महापौर :सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते.

(सभा दु.२.५५ वा.तहकूब पुन्हा सभेला दु.१.२५ वा.सुरूवात.)

श्री.काशिनाथ कोकाटे :सर्वांना बोलण्याची संधी मिळावी १८ जानेवारी रोजी स्पेकने सिडको हडको भागात लावलेल्या मालमत्ताचा करा संदर्भात चर्चा चालू असतांना सभा तहकूब केली त्याच विषयाला धरून आजच्या सभेचे कामकाज सुरू होणे अपेक्षीत होते. मालमत्ता कराचा विषय जनतेच्या जिव्हाळयाचा महत्वाचा विषय आहे सर्वसाधारण सभेने ५ रू.स्क्वे. मी. प्रमाणे कर आकारणी होणे अपेक्षीत होते परंतू ६.५० रू. प्रमाणे आकारणी करून सिडको हडकोतील नागरीकांना नोटीसेस दिलेल्या आहे. सर्वसाधारण सभेने जो निर्णय घेतला त्यांची अमलबजावणी का झालेली नाही.

श्री.संतोष जेजूरकर :विषय पत्रिका नंतर यावर चर्चा घ्यावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :सिडको हडकोतील मालमत्ता कराचे दर आकारण्याच्या संदर्भात चर्चा होवूनही आपण निर्णय दिलेला नव्हता त्यावर रूलींग दयावे. आम्ही थोडा उशिरा आलो.

डॉ.भागवत कराड :सर्वसाधारण सभेने ५ रू.चौ.मी.प्रमाणे निर्णय घेतला त्यानुसार नोटीसेस दयाव्यात. मी महापौर असतांना प्रशासना सोबत बैठक घेतली होती मान्यही केले होते त्या निर्णयाची अमंलबजावणी व्हावी.

श्री.संजय सिरसाट :प्रशासन अमलबजावणी करणार की नाही खुलासा घ्यावा.

मा.आयुक्त :ॲक्ट नुसार जे नियम आहे कसे कर लावावेत मालमत्ता कर ज्यावर्षासाठी १ एप्रिलला देय होते. कायदयानूसार २० फेब्रुवारी पूर्वी पुढील वर्षासाठी जे कर लावणार त्याचे दर निश्चित करणे आवश्यक असते.

श्री.देसरडा प्रशांत :सिडको हस्ततरणांचा मुळ प्रस्ताव, करारनामा, ५ रू.प्रमाणे कर घ्यावा ठराव केंव्हा झालेला आहे ती तारीख यासह सर्व माहिति ठेवावी.

मा.आयुक्त :पूढील वर्षाचा जो टॅक्स लावणार आहे त्या बाबत २० फेब्रुवारीच्या पूर्वी दर मंजूर करावे लागेल. टॅक्सचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे फेब्रुवारीमध्ये येईल त्यात जे दर निश्चित केले जातील त्यानुसार वृत्तपत्रात जाहिर करावे लागते दरम्यानच्या कालावधीमध्ये त्या वर्षाचा टॅक्समध्ये बदल करता येत नाही.२० फेब्रुवारी पूर्वी प्रस्ताव येईल त्यात काय बदल करायचे हे अधिकार सभागृहाला आहे त्यानंतर ते दर १ एप्रिल २००८पासून म्हणजे २००८-०९ या वर्षासाठी लागू राहतील.

डॉ.भागवत कराड :ज्या नागरीकांनी ६.५०रू. प्रमाणे टॅक्स भरणा केला असेल तर पूढील वर्षी ५ रू. प्रमाणे नोटीसा देणार त्यावेळेस वजा करून टॅक्स घ्यावा.सिडकोच्या जनतेला हस्तांतरण करताना तसा शब्द या सभागृहाने दिलेला आहे.

मा.आयुक्त : दरम्यानच्या काळात रेटमध्ये बदल करून शकत नाही.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :ठराव घेतला त्यावेळी प्रशासनाने निदर्शनास आणून दिले नाही.सर्वसाधारण सभेने ठराव घेतला तो उशीरा आला असे शासनास कळवून मार्गदर्शन घेवू शकतो.सिडको महापालिकेकडे नव्हते तरी घेतच होतो.

मा.आयुक्त :सिडको महापालिकेकडे पूर्वीपासून होतेच फक्त तेथील सेवा महापालिकेकडे नव्हती.

श्री.काशिनाथ कोकाटे :जो निर्णय या सभेने घेतलेला आहे त्यांची अमलबजावणी व्हावी. महापालिकेचे लाखो रूपये कुठे खर्च होत आहे जनतेला कळते, जनतेच्या हिताचा निर्णय घेण्याची वेळ येते तेव्हा नियमावर बोट ठेवण्याची गरज नाही. नियम लोकप्रतिनिधीनेच तयार केलेले आहे.

मा.आयुक्त : २० फेब्रुवारीच्या पूर्वी कर आकारणी करण्याचा ठराव घेतल्यानंतर ते पुढील वर्षासाठी लागू राहील.दरम्यानच्या काळात बदल करता येणार नाही.

श्री.संजय सिरसाट :जो ठराव घेतला तो २० फेब्रुवारी पुर्वी की नंतर घेतलेला आहे.

मा. आयुक्त : २० फेब्रुवारी नंतर ठराव घेतलेला आहे,त्यामूळे त्याची अमंलबजावणी करता येत नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :१०० टक्के टॅक्स ॲसीसमेंन्ट झालेले आहे काय?

श्री.कवरसिंग बैनाडे :ठराव २० फेब्रुवारी पूर्वी झालेला आहे.हस्तांतरण होवून दोन वर्ष पूर्ण होत आहे जेवढया सुविधा सिडकोकडून मिळत होत्या त्या महापालिकेने दिलेल्या नाही.कराच्या नोटीस मध्ये मोठी तफावत आहे. हस्तांतरण झाले तेंव्हा सिडकोने १५ कोटी दिले सिडको भागात त्यातून कोणत्या भागात विकास केलेला आहे ५ रू प्रमाणे कराची आकारणी केल्यास १०० टक्के लोक टॅक्स भरतील स.सदस्यही त्यासाठी मदत करतील.

मा.महापौर :यापूर्वी सर्वसाधारण सभेने सिडको हडको भागात मालमत्ता कर हा ५ रू प्रमाणे आकारण्याचा निर्णय घेतला त्याची अमलबजावणी व्हावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:सन २००६-०७ व २००७-०८ दोन वर्षाच्या नोटीसेस दिल्यानंतर निर्णय घेतल्यास अमबजावणी करणे शक्य होईल का ?नोटीस अगोदरच गेलेल्या आहे त्या थांबवू शकत नाही. अमलबजावणी करायची असेल तर सुनावणी घ्यावी लागेल. आता पुढील वर्षासाठी लागू केल्यास मागिल वर्षाचा टॅक्स जास्त व पूढील वर्षाचा कमी असे दिसून इतर शहरातील नागरीकांच्या निदर्शनास आल्यानंतर जनतेची नाराजी होईल.सर्वबाबतीत खूलासा करावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :हस्तांतरण करते वेळी मा.ना.श्री.टोपे साहेब यांचे समक्ष चर्चा झालेली होती जी अमंलबजावणी करायची त्या पध्दतीने ठराव पारीत केलेला होता. एनआरव्हीत बदल करायचा नाही टॅक्स किती आकारायचा हा अधिकार सर्वसाधारण सभेचा आहे. सन २००६-०७ या वर्षाच्या नोटीसा नागरीकांना दिलेल्या नाही त्यामूळे २००७-०८ च्या टॅक्स आकारणीचा प्रश्नच येत नाही स्पेकला बील देण्यात अर्थ नाही. सिडकोच्या जनतेवर अन्याय होणार नाही याची दखल घेत ५ रू. चौ.मी. प्रमाणे टॅक्स आकारणी करण्यात यावी.

श्री.अ.रशिद खान :शहर सिडको दोन्ही साठी न्याय मिळावा. हस्तातरण आता केले परंतू घरे २५ वर्षापूर्वीची आहे. तेव्हापासूनचा विचार करावा लागेल.आजच्या एनआरव्ही प्रमाणे टॅक्स लागू शकत नाही. जो करारनामा केला त्यात चूक होवू शकते सर्वसाधारण सभेने ५ रू.चौ.मी.प्रमाणे मान्यता दिली शासनाकडे पाठवून दुरूस्तीस मान्यता घेवून कार्यवाही करता येवू शकते.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : टॅक्स किती आकारायचा सभागृहाचा अधिकार आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: स.सदस्य श्री.कोकाटे यांनी सांगितल्याप्रमाणे दुरूस्त करण्यात यावे. सर्वसाधारण सभा स्थगिती देत आहे. नविन टॅक्स आजच लावण्याबाबत नविन ठराव घ्यावा.

डॉ.भागवत कराड : हस्तांतरण होईल तेंव्हापासून जुन्या रेटप्रमाणे कर लावावा असे ठरले होते. सर्व सदस्य व पदाधिकारी यांनी सिडको कार्यालयात बैठक होवून ५ रू. प्रमाणे कर आकारणी करावी असे ठरले त्यानंतर सर्वसाधारण सभेने निर्णय घेतला त्याची अमलबजावणी करावी.

मा.महापौर :सभागृहाच्या भावना लक्षात घेवून सर्वसाधारण सभेने सिडको हडकोसाठी कर आकारणीचा जो निर्णय घेतला त्याची प्रशासनाने अमंलबजावणी करावी

**<u>विषय क्र. ६६ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यान येथे नामांकित कंपनीचे आधुनिक खेळणी,हेलीकॉप्टर,रबराईज्ड सेप्टी प्लोरींग बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे, याच भागात यापूर्वी मेरी गो राऊड व डक मेरी गो राऊड बसविण्यात आलेला आहे.

सदरील खेळणी बसविण्यात येत असलेल्या भागातील जमीन सपाट करून लॉन विकसीत करणे, अस्तित्वातील खेळणी,मेरी गो राऊंड डक मेरी गो राऊंड इत्यादीची दुरूस्ती करणे आवश्यक आहे. या कामाकरीता बी.ओ.टी तत्वावर खाजगी एजन्सीची नियुक्ती करून संबंधीताकडून उपरोक्त कामे व या ठिकाणची देखभाल दुरूस्तीची कामे त्याच प्रमाणे या ठिकाणी आवश्यकते नुसार सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून देणे इत्यादी कामे एक वर्षाच्या कालावधी पर्यंत करून घेता येईल.

उपरोक्त कामाच्या खर्चाकरीता १ वर्षाच्या कालावधी करीता या ठिकाणी बसविण्यात आलेल्या हेलीकॉप्टर, मेरी गो राऊड व डक मेरी गो राऊड या खेळण्यास महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरानूसार तिकीट लावून उत्पन्न घेण्याबाबत व येणाऱ्या उत्पन्ना नुसार महानगरपालिकेस दरमहा रक्कम भरणा करणे बाबत खाजगी एजन्सीकडून/बी.ओ.टी. धारकाकडून ऑफर मागविण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

डॉ.भागवत कराड :या संबधी अटी शर्ती सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्यात याव्या त्यानंतर मान्यता दयावी.

श्री.प्रशांत देसरडा :खेळणी वगैरे विकसीत आहे. ते चालविण्यासाठी बीओटीवर देणे कितपत योग्य आहे खूलासा दयावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :बीओटीचे एकत्रित प्रस्ताव सादर करून योग्य ते निर्णय घ्यावे.

मा.आयुक्त :या ठिकाणी १२ व्या वित्त आयोगाचे ४० लक्ष खर्च केलेले आहे.

श्री.अ.रशिद खान : माझ्या वॉर्डात येते. या उद्यानात तीन वेळेस म्यूजिकल फाऊंटन मध्ये नौझल लावण्यात आले ते चोरीला गेले. विनाशुल्क ठेवले म्हणून खेळणी खराब झाली. आता ४० लक्ष खेळणीसाठी खर्च केले उदयान चांगले, खेळणी खराब होते हे होवू नये यासाठी नियम तयार करून कार्यवाही करावी.

श्री.रेणुकादास वैद्य : कोणतेही शुल्क न आकारता सर्वसामान्याच्या मुलांना याचा लाभ घेता येईल. कोणतीही आकारणी न करता महानगरपालिका खर्चातून करून सर्वांसाठी खुला करावा.

सौ.लता दलाल : एजन्सीला कॉन्ट्रक्ट बेसवर देणार की बीओटी धारकांना देणार,समोरचा भाग बीओटी धारकांना दिलेला आहे त्यांचा यात विचार केला काय? १ वर्ष बीओटी वर किंवा करारावर देणार नियम किंवा अटी शर्ती या सोबत दिल्या नाही.

श्री.संजय जोशी :बीओटी याचा अर्थ त्या व्यक्तीने पूर्ण निर्मिती करून त्याचा वापर करावा खर्च लागलेला आहे त्यातून उत्पन्न घ्यावे.महापालिकेची जागा वापरतात म्हणून महापालिकेला काही हिस्सा दयावा नंतर ठरलेल्या कालावधीनंतर महापालिकेला हस्तातरीत करावे. यात सुविधा महापालिकेने उपलब्ध करून दिल्या फक्त दुरूस्तीसाठी बीओटी देत आहोत.महापालिका चालविण्यासाठी सुध्दा सक्षम नाही. हे जनतेसमोर आणावे ठराविक रक्कम,ऑफर, हे सर्व कॅबीनमध्ये होते. यास मंजूरी ही ऑफरसह आहे नंतर वाक्य रचना बदलली जाते.नियम अटी समोर आणाव्या मगच निविदा काढावी एजन्सीच्या सांगण्यावरून ठेवणे बरोबर नाही सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे आदेशीत करावे.

श्री.सलीम खॉन :प्रस्तावात सविस्तर माहिती दिली पाहिजे तोपर्यत हा प्रस्ताव स्थगित करावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :पॉलीसी ठरवावी त्यानंतर सभागृहासमोर यावे.

मा.आयुक्त : उद्यानमध्ये ४० लक्ष केंद्र शासनाचे खर्च करून खेळणी बसविली आहे खालच्या भागात चांगल्या प्रकारे रबरचा सीएफए लावलेला आहे.यात मेरी गो राउंड हे सर्व पेमेंन्ट बेसेसवर होते, त्यासाठी रू.२ प्रमाणे रेट मंजूर आहे तोच रेट इतर खेळणीसाठी लावून सदर एजन्सी देखभाल दुरूस्ती करेल शुल्क न लावता मोकळे सोडले तर जो खर्च केला तो सहा महिण्यात वायाजाईल एक वर्षासाठी दुरूस्ती तसेच खेळणीच्या बाजूला लॉन करून प्रत्येक खेळणीच्या मागे रू.२ शुल्क घेवून कार्यवाही होईल. जेणे करून तेथील खेळणी खराब होणार नाही. दोन सुरक्षा रक्षक तेथे ठेवण्यात आलेले आहे. हेलिकॅप्टरमध्ये बसले तर शुल्क द्यावे लागेल. बाहेरच्या खेळणीचा संबंध नाही.

श्री.संजय सिरसाट :बीओटी हा शब्द यायला नको होता हा प्रस्ताव देतांना सिध्दार्थ उद्यान मध्ये मिनी डोअर हेली कॅप्टर ॲड झाल्याने किती कर्मचारी लागणारे उत्पन्न

मिळण्याचा हेतू नसेल व तरी सर्वसामान्याचे मुले तेथे जातात खेळणी हा भाग वेगळा जरी असेल तरी कर्मचारी अधिकारी यांना अधिकार नसल्याने ते तेथे जात नाही. अवैध धंदे तेथे चालतात आता म्हटले जे सैनिक सेवानिवृत्त आहे त्यांची या शहरात संस्था त्यांना आफर करावे त्यांचे सुरक्षा रक्षक ठेवावे रोजच्या रोज मेन्टनन्स करावे लागत नाही उदयान अधीक्षक यांना अधिकार दयावे. हे काम टेंडर पध्दतीने न जाता ज्या सैनिकाच्या संस्था असेल, अशांना घेण्यात यावे इतरही संरक्षणासाठी या सुरक्षा रक्षकाचा उपयोग होईल. जे दर लावणार आहे ते सुध्दा सर्वसाधारण सभेपूढे यावे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :जेकर्मचारी काम करतात त्यांचेवर इनचार्ज ठेवून त्यांचेकडून कामकरून घ्यावे

श्री.प्रशांत देसरडा :बीओटी शब्द नको पाहिजे असे आताच म्हटले आहे. अमुक चुक झाली नेहमीच सभागृहानेच निदर्शनास आणून देणे योग्य वाटत नाही प्रशासनानेच काळजीपूर्वक प्रस्ताव ठेवायला पाहिजे.सिध्दार्थ उद्यान या शहराची एक शान आहे,एवढयासाठी कॉन्ट्रक्ट बेसेसवर करावे का? बीओटीच्या अनेक प्रकरणात प्रशासनाने चूक केली आहे. बीओटी साठी ज्या अटी व शर्ती करण्याचे अधिकार प्रशासनाला दिले ते रद्य करावे.जे सेवानिवृत्त सैनिक असतात त्यांची संघटना आहे सैन्य दलाची संस्था असते त्यांना काम दयावे. अनेक अधिकारी राजकारण करतात जे करीत नाही त्यांचेकडे दुर्लक्ष होते इतर महानगरपालिकेत उद्यान अधिक्षकाचे जे पद इक्वल असेल ते त्यांना देण्यात यावे. उद्यान अधिक्षक यांना अधिकार दयावे उद्यानमध्ये जे चोरीचे प्रकार झाले त्याची दखल घ्यावी. जलतरण तलाव येथे नागरीक नगरसेवकांचे नाव दाखवून दादागिरी करून विना शुल्क प्रवेश करून महापालिकेच्या कर्मचा-यांवर दबाव आणतात. त्यासाठी सर्व व्यवस्था तेथे असावी जी काही मदत पाहिजे ती प्रशासनाने करावी. या प्रस्तावानुसार महापालिकेनेच कार्यवाही करून सैनिक संस्था असेल त्यांना हे दयावे. बीओटीचे करतांना अटी शर्ती करण्याचे अधिकार यासभागृहालाच राहतील असे रूलीग दयावे.

श्री.अ.रशिद खान : नगरसेवक/अधिकारी यांचे रिलेटयूव विना शुल्क जलतरण तलावाचा फायदा घेत होते नंतर त्यांना बंद केले. तीन वेळेस म्यूझीकल फाऊंटनचे नौझल चोरी गेले ४० लक्षची खेळणी बसविली सर्व नागरीक उद्यानमध्ये जातात यास स्थगिती न देता मान्यता दयावी. नाला लगतची भिंत पडली असून उद्यानचे संरक्षण होण्यासाठी तेथे सुरक्षा रक्षक देणेची कार्यवाही व्हावी. मागच्या बाजूने लहान रस्ता करावा. मा.चपळगांवकर यांनी निर्णय दिला होता की,उद्यानच्या बाजूला फिरता येईल. खेळणीवर शुल्क लावण्यात यावे. यास मंजूरी दयावी.

सौ.लता दलाल :उद्यान अधिक्षक यांना पुरेसा कर्मचारी असावा याचा विचार कुणी केला नाही. उद्यान अधिक्षक यांनी सर्व कामे करण्याची अपेक्षा ठेवू नये. या शहराची लोकसंख्या १२ लक्ष असून उद्यान ओस पडण्याची वेळ आलेली आहे. वार्डवाईज जबाबदारी दिली काय दुभाजकावर झाडे लावलेली असून त्याची देखभाल कोण करते एक उद्यान अधिक्षक पुरेसा नाही. उद्यान विभागासाठी जास्तीचे कर्मचारी देवून त्यांना जबाबदारी देवून कार्यवाही करावी लागणार आहे ती करावी.

श्री.कवरसिंग बैनाडे :माझ्या वार्डात एन-५ येथे सर्वात मोठाहरीत पटटा आहे त्याची दयनीय अवस्था झालेली असून उद्यान अधिक्षक किंवा वार्ड अधिकारी यांना अधिकार दयावे. वॉर्ड अधिकारी यांना सांगितले तर ते उद्यान विभागाकडे दाखवतात. आपली मालमत्ता आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉयः सर्वांत मोठे सिध्दार्थ उद्यान असून शहरातील संपूर्ण नागरीक त्यांचा फायदा घेतात. या उद्यानात पूर्ण व्यवस्था महानगरपालिकेच्या माध्यमातून पुरवावी चांगले व्यवस्थापन ठेवावे. खाजगीकरण करू नये.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : गेली २ वर्षापासून सांगतो, कर्मचाऱ्यांना ओळखपत्र का दिले जात नाही. कार्ड तयार होत नाही. संपूर्ण भारतात ओळखपत्र वाटप झाले.

सौ. लता दलाल : कार्यालयातील कोणतेही कर्मचारी युनीफॉर्ममध्ये येत नाही. आठ महिण्यात बदल झालेला दिसून आलेला नाही. नवीन वर्षापासून तरी कार्यवाही करावी. कोण अधिकारी, कर्मचारी आहे हे कळायला हवे.

श्री.मिलींद दाभाडे :सिध्दार्थ उद्यान मध्ये भगवान बुध्दाची मुर्ती बसविण्याचा प्रस्ताव मंजूर झाला आहे. अद्याप का बसविले नाही. निविदा झालेल्या आहे. त्यातील एक मुर्तीकार यानी यापूर्वी विदयापीठ गेट समोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा निष्कृष्ठ दर्जाचा बसविलेला होता त्याच मुर्तीकारास हे काम कसे दिले त्याला काम देवू नये.

डॉ.भागवत कराड :अनेक नागरीक,विदयार्थी या उद्यानमध्ये येत असतात बीओटीवर कार्यवाही न करता प्रशासनातर्फे कार्यवाही करावी यानंतर जे जे बीओटीवर योजना राबवायचा असेल त्याचे अटी शर्ती या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनेच कराव्यात.असे आदेशीत करावे.

मा.आयुक्त :तीन चार ॲक्टीव्हिटीज करावी लागेल. यात मुलानी खेळणी खराब करायला नको त्यासाठी फेंन्सीग करावी लागेल.तिकीट देण्यासाठी एक कर्मचारी दयावे लागेल काही ठिकाणी लॉन करावे लागेल. तसेच सुरक्षा रक्षक ठेवावे लागतील. खाजगी किंवा माजी सैनीक मंडळाकडील सुरक्षा रक्षक घेवू शकतो. चारही टेंडर एकत्रित करून एका व्यक्तीला देण्यात यावे अशा प्रकारचा प्रस्ताव आहे खेळणी खराब होणार नाही त्यासाठी डिपॉजीट एक वर्षासाठी घेणार या प्रकारचे एकत्रित टेंडर एक वर्षासाठी देण्यात यावे अशा प्रकारचा प्रस्ताव आहे.

डॉ.भागवत कराड :अटी शर्ती सभागृहा समोर आणले तर सर्व स.सदस्यांना माहिती मिळेल.

मा.आयुक्त :जेवढे बीओटीचे टेंडर झाले ते सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनेच झालेले आहे.

श्री.अ.रशीद खान :या प्रस्तावास मान्यता दयावी तेथील मालमत्तेचे नुकसान होत आहे.

मा.महापौर :हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

श्री.मिलींद दाभाडे :भगवान बुध्दाच्या मुर्ती बाबत खूलसा करावा.

मा.आयुक्त : जी मूर्ती बसवायची आहे त्याचे टेंडर काढले होते तीन शिल्पकाराची मुर्ती आलेली आहे त्याची पाहणी झालेली आहे आतापर्यत टेंडर मंजूर झालेले नाही. मुद्रा अंतिम झाल्यानंतर ठरविण्यांत येईल.

श्री.काशिनाथ कोकाटे :ठराव होवून चार वर्ष झाले अदयाप मुर्ती का बसविली नाही. अंमलबजावणी नाही. प्रशासनाचा हेतू काय, तोच प्रस्ताव आला नाही. आपण राजकरण करता का?

मा.आयुक्त : चर्चा झाली. डिझाईन झाले. प्रशासनाने मनापासून काम केलेले आहे.

डॉ.भागवत कराड :टेंडर झालेले आहे जी मुर्ती चांगली असेल फायनल करून कार्यवाही करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे : समिती गठीत केली का. मा.आयुक्तांनी किती बैठका घेतल्या.

श्री.अ.रशीद खान :कमेटी केली होती त्यात आपण तसेच इतर सदस्यही होते मुर्ती का पंसत झालेली नाही माहिती दयावी.

श्री.मिलींद दाभाडे : केंव्हा काम सुरू होणार. तारीख जाहीर करावी. गोविंदभाई श्रॉफ यांचा पुतळा बसविण्यापूर्वीच हा ठराव मंजूर झालेला आहे.

मा.महापौर :हा विषय मंजूर करण्यात येत असून जेंव्हा बीओटीसाठी ज्या अटी शर्ती ठरवण्यात येतील ते अगोदर या सभागृहासमोर आणावेत.महापालिकेच्या कर्मचा-यांना १ एप्रिल पासून ओळखपत्र देण्यात यावे.सर्व कर्मचारी गणवेशमध्ये राहतील याची दखल घ्यावी. उद्यान मध्ये कुठल्याही प्रकारची चोरी वगैरे होणार नाही याची प्रशासनाने दखल घ्यावी. देखभाल दुरूस्तीकडे लक्ष द्यावे. उद्यान विभाग सक्षम करून पुरेसे कर्मचारी दयावे उद्यान विभाग वेगळा करावा. भगवान गौतम बुध्दाची मुर्ती संदर्भात बैठक झाली होती स.सदस्यही होते. पाहणी केली. चेहरा ठेवण कशी असावी या संदर्भात ही

पाहणी केली. उद्यानात भगवान बुध्दाची मुर्ती चे काम फेब्रुवारी अखेर पर्यत सुरू करावे. कमेटी बसून निर्णय घेतील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या सिध्दार्थ उद्यान येथे नामांकित कंपनीचे आधुनिक खेळणी,हेलीकॉप्टर,रबराईज्ड सेप्टी प्लोरींग बसविण्याचे काम प्रगतीपथावर असल्यामूळे,व याच भागात यापूर्वी मेरी गो राऊड व डक मेरी गो राऊड बसविण्यात आलेला असल्यामूळे, आणि सदरील खेळणी बसविण्यात येत असलेल्या भागातील जमीन सपाट करून लॉन विकसीत करणे, अस्तित्वातील खेळणी,मेरी गो राऊंड डक मेरी गो राऊंड इत्यादीची दुरूस्ती करणे आवश्यक असल्यमूळे, या कामाकरीता बी.ओ.टी तत्वावर खाजगी एजन्सीची नियुक्ती करून संबंधीताकडून उपरोक्त कामे व या ठिकाणची देखभाल दुरूस्तीची कामे त्याचप्रमाणे या ठिकाणी आवश्यकते नुसार सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून देणे इत्यादी कामे एक वर्षाच्या कालावधी पर्यंत करून घेणेस उपरोक्त कामाच्या खर्चाकरीता १ वर्षाच्या कालावधी करीता या ठिकाणी बसविण्यात आलेल्या हेलीकॉप्टर, मेरी गो राऊड व डक मेरी गो राऊड या खेळण्यास महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरानूसार तिकीट लावून उत्पन्न घेण्याबाबत व येणाऱ्या उत्पन्ना नुसार महानगरपालिकेस दरमहा रक्कम भरणा करणे बाबत खाजगी एजन्सीकडून/बी.ओ.टी. धारकाकडून ऑफर मागविण्यास मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६० मो.सिल्लेखाना ते थेट समर्थ नगर येथील वरद गणेश मंदीर पर्यंत नवीन ४५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी. स्वतंत्र जलनिःसारण वाहीनी टाकण्याचे काम कार्यादेश जा.क्र./मनपा/काअ/ड्रेनेज/१८१३/०७ दिनांक २३.०३.२००७ अन्वये कंत्राटदार मे.असेण्ड कंन्स्ट्रक्शन औरंगाबाद हे करत असून सदरील काम प्रगतीपथावर आहे. सदरील कामाकरीता मनपा अर्थसंकल्प २००७-०८ पान क्र.डब्ल्यु-४० वर मेनसिव्हर लाईन या लेखाशिर्ष अंतर्गत अ.क्र.२ वर रक्कम रू.१०.०० लक्ष इतकी तरतुद उपलब्ध आहे. परंतु सदरील काम करतांना वीर सावरकर चौक ते वरद गणेश मंदीर पर्यंतचा मुख्य रस्ता खोदावा लागणार असून जलनिःसारण वाहीनीचे कामाअंतर्गत खोदकामामुळे नादुरूस्त झालेला रस्ता व फुटपाथ ड्रेनेज विभागातर्फे दुरूस्त करण्याचे अतिरिक्त शहर अभियंता विभागातर्फे सुचविण्यात आलेले आहे. सदरील रस्ता दुरूस्तीच्या कामाचा समावेश मुळ अंदाजपत्रकात नाही. रस्ता दुरूस्ती करण्याच्या कामाच्या अतिरीक्त बाबींचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून अतिरीक्त बाबींची अंदाजपत्रकीय रक्कम रू.४,१३,४८०/- इतकी आहे. सदरील रस्ता दुरूस्तीसाठी सन २००७-०८ या अर्थसंकल्पात नावानिशी तरतुद उपलब्ध नाही. म्हणून अर्थसंकल्प पुस्तिका पान क्र. डब्ल्यू-३७, अ.क्र.३६ वरील लेखाशिर्ष भांडवली कामे जलनिःसारण करीता उपलब्ध रक्कम रू.३०.७० लक्ष मधुन रक्कम रू.४.१४ लक्ष ही अर्थसंकल्प ०७-०८ पान क्र.डब्ल्यू-४० लेखाशिर्ष मेनसिव्हर लाईन अ.क्र.२ वरील मो.सिल्लेखाना ते थेट वरद गणेश मंदीर पर्यंत ४५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी.स्वतंत्र जलनिःसारण वाहीनी टाकणे या कामाच्या अतिरीक्त बाबीसाठी वळती करण्याचे प्रस्तावित आहे.

तरी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :समर्थनगर रस्त्याचे यापूर्वी केंव्हा काम केलेले होते. एकदा डांबरीकरण केल्यानंतर कमीत कमी दोन तीन वर्ष रस्ता खराब होत नाही. लगेच रस्त्यावर खोदकाम होवून खराब होत असेल तर विचार केला पाहिजे.इतर ठिकाणच्या रस्त्याचा विचार करून तेथीलही काम करावे.

श्री.संजय जोशी :दुरूस्तीच्या कामासाठी वेगळी तरतूद केली तसा ठराव आला या रस्त्यावर ड्रम प्रोजेक्टचे काम चालू असून निराला बाजार रस्त्याच्या कडेला माती पडलेली दिसून येते ड्रम प्रोजेक्ट कडून असे काम करावयास पाहीजे. जसे हे वाढीव कामाचा प्रस्ताव आणला त्याच प्रमाणे अमरप्रित हॉटेल ते बीडबाय पास रस्त्या पर्यत पॅचवर्क करण्याच्या खर्चाचा प्रस्ताव आणू शकत होते अनेक वेळ स्थायी समितीच्या बैठकीत मागणी केली कार्यवाही झाली नाही त्या रस्त्यावर ४-४ फुट मोठमोठे खड्डे पडलेले आहे दर्गाजवळ ट्राफिक जास्त होते. उदया पासून त्या रस्त्याचे पॅचवर्क करण्याचे आदेशीत करावे.

श्री.भगवान घडमोडे : पॅचवर्क सांगीतल्यावर ६ महिने होत नाही. २/२ स्मरणपत्र देवूनही होत नाही. रस्त्यावर खोदकाम करून ठेवले जाते नागरिकांना यामूळे त्रास होतो त्यांच्या तीव्र भावना आहेत. काहींना दुकानामध्ये जाता येत नाही व्यापार बंद झालेले आहे दंडाची कार्यवाही होते परंतू नागरीकांना ते अपेक्षीत नसून वेळीच काम होणे अपेक्षीत असते.

डॉ.भागवत कराड :अमरप्रित हॉटेल ते बीडबायपास ते शहानुरमिया दर्गा या रस्त्याची परीस्थिती बिकट झालेली आहे पॅचवर्क करण्याचे आदेशीत करावे तसेच समर्थनगरचा हा रस्ता एक वर्षापूर्वी झालेला होता तेथे ड्रेनेजसाठी पून्हा खोदकाम झालेले आहे यात महापालिकेचे नुकसान होते. रस्ता करतांना त्यांनी ड्रेनेजचा विचार केला नाही का. रस्ता करून एक वर्षही झाले नाही.

सौ.मेहरून्नीसा खान :नेहरूनगर येथे डीपी रोडचे सहा महिण्यापासून काम चालू आहे जागेवर मटेरियल पडलेले आहे वाहने जाण्यास अडचण निर्माण होत आहे त्यांना पेमेंट करू नये.

श्री.मो.जावेद मो.इसहाक:बेगमपूरा ते आझादचौक पर्यत रस्त्यासाठी अनेक जागा भुसंपादीत केल्या मोबदला दिला जागा ताब्यात घेतलेल्या नाही. विलंब का होतो.

श्री.काशिनाथ कोकाटे :यापूर्वी सावरकर चौक ते वरद गणेश मंदीर पर्यतच्या रस्त्याचे काम केलेले होते ठरावातील रस्त्याचे नव्हे ऑलरेडी या कामास उशीर झालेला आहे मान्यता दयावी.

श्री.संजय सिरसाट :सिल्लेखाना ते लक्ष्मणचावडी पर्यत रस्त्याचे काम चालू आहे रस्त्याच्या खाली रेनवॉटर तसेच ड्रेनेजचे पाईप त्यासाठी तरतूद नाही असे स.सदस्यांनी वारंवार प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले त्यासाठी वेगळी तरतूद केली की रस्ता झाल्यानंतर पून्हा खोदणार आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:रस्त्याच्या दुरूस्तीच्या कामाचे सर्व यंत्रसामुग्री महापालिकेकडे होती ती संपवली ती पून्हा चालू करण्याची कार्यवाही करावी.

सौ.कला बोरामणीकर :जलनि:स्सारण वाहिनीचे काम होणे गरजेचे आहे हा रस्ता दोन वर्षात दोन वेळेस खोदला गेला तेही काम तातडीने व्हावे पावसाळया आधी हे काम पूर्ण होईल याची दखल घ्यावी. १००% कर भरणा केला जातो.

श्री.प्रल्हाद निमंगावकर :शिवाजीनगर ते सुतगिरणी चौक रस्त्याचे काम आठ/नऊ महिण्यापासून सुरू आहे एक साईडचे अर्धवट काम तर दुस-या साईडचे काम सुरूच केलेले नाही एक महिण्यात काम करण्याचे आदेशीत करून सदर ठेकेदाराला आतापर्यत दंडापोटी किती रक्कम वसूल केलेली आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :समर्थनगर ते वरद गणेश मंडळ हाररस्ता कधी झाला.त्यावर कितीखर्च झाला.

अति.शहर अभियंता :सिल्लेखाना ते वरद गणेश मंदरीपर्यतचा रस्ता चार वर्षापूर्वी झालेला आहे शिवाजीनगर ते सुतगिरणी रस्त्याचे ठेकेदारास दंडात्मक कार्यवाही केली नाही कारण त्यांना अदयाप कामाचे बिल दिलेले नाही. बिल देते वेळेस दंडाची वसुली करण्यात येईल. मार्चपर्यत पूर्ण काम केले नाहीतर काळ्या यादीत समाविष्ट करण्यांत येईल.

मा.आयुक्त :एक महिण्यात काम होणार नाही तीन महिने लागतील याच ठेकेदाराकडून करून घेतले जाईल जितका उशीर होईल तितका दंड त्यांना आकारला जाईल. मार्च पर्यत मुदत आहे तोपर्यत काम केले नाही तर दुस-या एजन्सीला काम दिले जाईल.

श्री.देसरडा प्रशांत :कोणतेही काम एकदा सुरू झाल्यानंतर त्या ठेकेदाराला बंद करता येत नाही.काम चालू करण्याचे आदेशीत करावे.

श्री.सलिम पटेल : २ कोटीची निविदा झालेली आहे. रोशनगेट पर्यत ५० फुट व पूढे ८० फुट ऐवजी ६० फुट झाले आहे.

मा.आयुक्त :स.सदस्य यांनी विचारलेल्या प्रश्ना बाबत सदर भुसपांदनासाठी किती रक्कम होती जवळपास ८ कोटीच्या भुसंपादनाचा होता महापालिकेपासून ते रोषणगेट पर्यत ५० फुट तेथून किराडपूरा पर्यत ८० व तेथून जळगाव रस्त्यापर्यत ६० फुटाचा आहे. मधला जो पॅच आहे तो ८० फुट ऐवजी ६०

फुटाचा करण्यात यावा असा सर्वसाधरण सभेने निर्णय घेतलेला आहे. त्याची कार्यवाही सुरू केलेली आहे महापालिका कार्यालय ते रोषणगेट पर्यत ५० फुट रस्ता करण्या बाबत दोन तारखेला बैठक आयोजित केली असून ताबडतोब कार्यवाही सुरू होईल.

श्री.रवी कावडे : चिकलठाणा वार्डात श्री.हिवराळे या ठेकेदारास काळया यादीत नोंद झालेली आहे सदरचे काम अदयाप सुरू का करण्यात आलेले नाही.

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी सदर काम तात्काळ सुरू करण्याची कार्यवाही करावी.

सौ.लता दलाल :जे ठेकेदार मुदतीत काम करीत नसतील तर दुस-या एजन्सीला काम देवून त्या ठेकेदारास काळया यादीत समावेश करण्यात यावे अशा किती लोकांवर कार्यवाही केली आहे.

डॉ.भागवत कराड :शहरातील अनेक रस्ते खराब असून स.सदस्यांच्या सुचना घ्याव्यात यासाठी विशेष बैठक आयोजित करावी.

मा.आयुक्त :जी एजन्सी काम करणार नाही त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करणार आहोत.

मा.महापौर :विषय क्र. ६७ मंजूर करण्यात येतो.सभागृहाच्या भावना लक्षात घेवून आणि शहरातील नागरिकांना खड्ड्याचा त्रास होतो नागरीक हैराणही होतात म्हणून जे काही शहरात वेगवेगळया ठिकाणी खडडे पडलेले आहे त्यात अमरप्रित हॉटेल ते बीडबायपास रस्ता असेल किंवा जे काही स. सदस्यांनी काही विषय मांडले आहे ते व शहरातील सर्व रस्ते ज्या ठिकाणी खंडडे आहे वेळीच बुजवले तर मोठे होण्याचे लगेच थांबते मोठे खडडे झाल्याने जो काही पूढील धोका होतो तो सुध्दा टळतो या दृष्टीकोनातून प्रशासनास आदेशीत करण्यात येते की शहरामध्ये रस्त्यावर जेवढे खडडे आहेत तेवढे सर्व खडडे बुजविण्यात यावे हे काम ताबडतोब हाती घेण्यात यावे. तसेच शहरात ज्या रस्त्याची कामे चालू आहे ती वेळच्या वेळी पूर्ण होईल याची प्रशासनाने दक्षता घ्यावी व ज्या ठिकाणी कामे वेळीच पूर्ण झालेली नाही अशा ज्या ज्या तक्रारी सदस्यानी केलेल्या आहे त्या जागेवर प्रशासनाने पाहणी करून हे रस्ते वेळीच पूर्ण होतील याची काळजी घ्यावी. या करीता सुधारीत अर्थसंकल्पाच्या अधिन राहून ही तरतूद करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६० मो.सिल्लेखाना ते थेट समर्थ नगर येथील वरद गणेश मंदीर पर्यंत नवीन ४५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी. स्वतंत्र जलनि:सारण वाहीनी टाकण्याचे काम कार्यादेश जा.क्र./मनपा/काअ/ड्रेनेज/१८१३/०७ दिनांक २३.०३.२००७ अन्वये कंत्राटदार मे.असेण्ड कंन्स्ट्रक्शन औरंगाबाद हे करत असून सदरील काम प्रगतीपथावर असल्यामूळे, व सदरील काम करतांना वीर सावरकर चौक ते वरद गणेश मंदीर पर्यंतचा मुख्य रस्ता खोदावा लागणार असून जलनि:सारण वाहीनीचे कामाअंतर्गत खोदकामामुळे नादुरूस्त झालेला रस्ता व फुटपाथ ड्रेनेज विभागातर्फे दुरूस्त करण्याचे अतिरिक्त शहर अभियंता विभागातर्फे सुचविण्यात आलेले असल्यामूळे, आणि सदरील रस्ता दुरूस्तीच्या कामाचा समावेश मुळ अंदाजपत्रकात नसल्यामूळे, रस्ता दुरूस्ती करण्याच्या कामाच्या अतिरीक्त बाबींचे तयार केलेले रक्कम रू.४,१३,४८०/- अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते. सदरील काम अर्थसंकल्प पुस्तिका पान क्र. डब्ल्यू-३७, अ.क्र.३६ वरील लेखाशिर्ष भांडवली कामे जलनि:सारण करीता उपलब्ध रक्कम रू.३०.७० लक्ष मधुन रक्कम रू.४.१४ लक्ष ही अर्थसंकल्प ०७-०८ पान क्र.डब्ल्यू-४० लेखाशिर्ष मेनसिव्हर लाईन अ.क्र.२ वरील मो.सिल्लेखाना ते थेट वरद गणेश मंदीर पर्यंत ४५० मी.मी.व्यासाची आर.सी.सी स्वतंत्र जलनि:सारण वाहीनी टाकणे या कामाच्या अतिरीक्त बाबीसाठी वळती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:जे प्रशासनातर्फे प्रस्ताव आलेले आहे ते मंजूर करून घ्यावे.

मा.महापौर :स.सदस्यांनी मिळून चर्चा करावी वारंवार मी म्हटलेले आहे.कृपया आपण साथ दयावी सर्व विषय सर्वांच्या मताने सर्वांचे ऐकून मंजूर केले असे व्हावे.

**विषय क्र. ६८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील सिडको भागातील खोलगट रस्त्यांवरील पावसाचे पाणी वाहून जाणेसाठी रस्त्याची दुरूस्ती करणे. या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००६-२००७ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.२९,८६,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च २००७-०८ या आर्थिक वर्षात रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे.

तरी रक्कम रू.२९,८६,०००/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

श्री.सलीम पटेल :ठरावात नुसते सिडको भाग लिहलेला आहे.सिडको भाग फार मोठा आहे. कोणत्या वार्डातील व कोणत्या भागातील काम आहे उल्लेख नाही.

मा.महापौर :विषय क्र.६८ मंजूर करण्यात येतो. सिडको हडकोचा भाग आहे. यादी स.सदस्यांना दाखवावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील सिडको भागातील खोलगट रस्त्यांवरील पावसाचे पाणी वाहून जाणेसाठी रस्त्याची दुरूस्ती करणेच्या कामाचे रक्कम रू.२९,८६,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९४ शाहू नगर भागात रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाकरीता सा.बां.विभागाचे जिल्हा दरसुची सन २००५-०६ नुसार रक्कम रू.२२,९०,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील कामाचा खर्च सन २००७-०८ या आर्थिक वर्षा अंतर्गत पुर्न:डांबरीकरण शहरी भाग या लेखाशिर्षा अंतर्गत पृष्ठ क्र.डब्ल्यू ११८/१८१ अ.क्र.१९/४२/२१/९ नुसार उपलब्ध तरतुद रक्कम रू.२३.०० लक्ष नुसार प्रस्तावीत आहे.

त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.२२,९०,५००/- चा प्रस्ताव मान्यतेच्या विचारार्थ सादर.

मा.महापौर : हा विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९४ शाहू नगर भागात रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाचे र.रू.२२,९०,५००/-चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७० :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, विद्यानगर या मंजुर रेखांकनातील न.भु.क्र.१५१८९ ते १५१९४ यांना त्यांचे भुखंडाचे पुर्व बाजुने सद्य:स्थितीमध्ये रस्ता नसल्याचे आढळून आले आहे.

मुळ मंजुर रेखांकन व नगर भुमापन अभिलेखानुसार (शीट क्र.३०७) विद्यानगर या रेखांकनात वरील नमूद नगर भूमापन क्रमांक १५१८९ ते १५१९४ च्या पुर्व बाजुने अंदाजे २.०० मीटरची सर्व्हीस लेन दर्शविलेली आहे. तथापी वरील नमूद प्रमाणे प्रत्यक्ष जागेवर गल्लीची जागा उपलब्ध होत नाही.

असे असले तरी या रेखांकनाच्या स्थळावर पुर्णत: झालेला विकास व स्थळावर विजयनगर रेखांकनातील भूखंडधारक ज्यांचे न.भु.क्र.१५१८७/अ/१ ते ७ यांनी तारकुंपण केल्याने विद्यानगर रेखांकनातील वरील सहा भूखंड धारकांचा रस्ता बंद झालेला आहे.

तसेच विद्यानगर रेखांकनातील भूखंड धारकांनी पोच रस्ता उपलब्ध करून देणेकरीता जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच (Consumer court) मा.जिल्हा न्यायालय येथे दावे दाखल केलेले आहेत.

मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच यांनी विद्यानगर रेखांकन धारकांस त्वरीत रस्ता उपलब्ध करून देणे बाबत आदेशीत केले आहे व अद्याप रस्ता उपलब्ध करून देण्यात आलेला नसल्यामुळे या बाबत मा.न्यायालयात अवमान याचिका दाखल झालेली आहे. तसेच मा.जिल्हा न्यायालय यांनी दि.१०/१०/२००६ रोजी मार्गदर्शक निर्देश दिले असून यानुसार विजयनगर रेखांकनातील भूखंड ज्यांचे नगर भूमापन क्रमांक १५१८७/अ/१ ते १५१८७/अ/७ आहेत. ह्या भूखंडाचे पुर्वेकडील बाजूकडून ४.०० मीटर रूंदीची जागा रस्त्यासाठी घेण्याचे व त्या बदल्यात या भूखंड धारकास वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक देणे व सामासिक अंतरामध्ये आवश्यक सवलती देणे बाबत निर्देश दिलेले आहेत. असे असले तरी जागेवर संपूर्ण वस्तुस्थिती व विकास नियंत्रण नियमावली

नुसार ७.५० मीटर रूंदीचा रस्ता करणे आवश्यक आहे.परंतु उर्वरीत ३.५० मीटरची जागा विद्यानगर रेखांकनातील भूखंडधारक ज्यांचे नगर भूमापन क्रमांक १५१८८ ते १५१९४ आहेत. ते भूखंडाच्या पश्चिम बाजुकडील जागा रस्त्याकरीता देण्यास तयार नाही.

मा.जिल्हा न्यायालय यांचे आदेश व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचमध्ये दाखल झालेली आवमान याचिका उक्त नमूद रस्ता करीता जागा देणे बाबत दोन्ही रेखाकंनधारकामध्ये अद्याप कोणतीही तडजोड,निर्णय झालेला नसल्यामूळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार किमान ७.५० मीटर रूंदीचा विकास योजना रस्ता यामध्ये विजयनगर रेखाकंनामधून मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार ४.०० मीटर व उर्वरित क्षेत्र ३.५० मीटर विद्यानगर रेखाकंनातील भूखंडामधून घेवून रस्ता प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

करीता पूर्वी विषय क्र.६९६/१० दिनांक २०.०१.२००७ मा.सर्वसाधारण सभेमध्ये विजयनगर व विद्यानगर या दोन रेखाकंनामधील नमूद भूखंडासाठी ६.०० मीटर रूंदीचा ना-विकास योजना रस्ता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ नुसार तयार करण्याचा मंजूर करण्यांत आलेला प्रस्ताव रद्द करणे व वरीलप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार ७.५० मीटर रूंदचा विकास योजना रस्ता प्रस्तावित करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.सतीश कटकटे :रद्द करण्यात यावा.

मा.आयुक्त :फेसींग काढणार नाही मा.न्यायालयाचे आदेश आहे त्यास अपील मध्ये गेलो आहे जो मा.न्यायालयाचा निर्णय होईल त्याप्रमाणे कार्यवाही होईल.

श्री.सतीश कटकटे :एक वर्षापासून मा.न्यायालयाचे आदेश घेवून ते फिरता. हा विषय नामंजूर करावा.

मा.महापौर :हा विषय स्थगित करण्यात येतो.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: मंजूर करण्यात यावा.

मा.महापौर :हा विषय काय आहे हे सर्व सदस्यांना मा.आयुक्तांनी समजून सांगावा पूढील बैठकीत आणावा. त्यासाठी स्थगित केलेला आहे.

मा.महापौर डायस समोर स.सदस्य एकत्र जमा होतात मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबरॉय:तुम्ही तुमच्याच मनाने निर्णय घेणार काय?

मा.महापौर :ही सर्वाचीच जबाबदारी आहे की आपण सहमती करूनच बोलावे.

याच वेळी स.सदस्य मा. महापौर डायस समोर येवून मोठमोठयाने बोलतात.

श्री.सतीश कटकटे :माजी महापौर श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांचे सभासदत्व रद्य करण्यात यावे.

श्री.काशिनाथ कोकाटे :स्थगित का केलेला आहे खुलासा करावा.

श्री.सतीश कटकटे :या विषयावर आपण रूलींग दिले आहे आता चर्चा नको.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव तुर्त स्थगित करून पूढील बैठकीत ठेवण्यास मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र.७१ :**

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद शहर हे मराठवाडयाची राजधानी असून शैक्षणिक क्षेत्राचे माहेरघर आहे,औरंगाबाद शहराच्या जवळपास औद्योगीक वसाहत असून नामांकित औद्योगिक कंपन्यांचा समावेश आहे. अंतरराष्ट्रीय स्तरावर ऐतिहासीक शहर म्हणून गणना केली जाते. तसेच संपूर्ण आशिया खंडात प्रगतीपथावर असलेले हे शहर आहे.

जलदगतीने विकसीत होत असलेल्या या शहरात प्रादेशिक विज्ञान केंद्राची निर्मिती (Regional Science Center) करण्याचे नियोजन आहे.

विज्ञान,संगणक आणि आधुनिक तंत्रज्ञान या माध्यमाचा अभ्यास करून त्यांचे ज्ञान जनमाणसापर्यंत पोहचविणे, कॉलेज मधील विद्यार्थ्यांना, अभ्यांगतांना,वैज्ञानिकांना व पर्यटकांना या प्रकल्पाचा सर्वकश लाभ घेऊन विकास करता यावा आणि हे शहर विज्ञान आणि पर्यटन स्थळ म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवर जावे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

प्रादेशिक विज्ञान केंद्राची उभारणी करण्याकरीता केंद्र शासनातर्फे ५० टक्के अनुदान प्राप्त करण्यात येईल व उर्वरित ५० टक्के निधी महानगरपालिकेस करावा लागेल. या ५० टक्के निधीपैकी ५० टक्के निधी महाराष्ट्र शासन यांचे मार्फत मिळविता येईल. मात्र प्रकल्प राबविणे व दैनंदिन देखभाल महानगरपालिकेस करावी लागेल.

प्रकल्प उभारणीकरीता आवश्यक तांत्रिक बाबी उदा. नकाशे,आराखडे,अंदाजपत्रके या बाबी NCSM (National Council of Science Museum) कलकत्ता मार्फत मान्यता घेण्यात येईल. तसेच NCSM मार्फत टेक्नीकल कन्सन्टन्सी (Technical Consultancy) राहील.

प्रादेशिक विज्ञान केंद्राकरीता अंदाजे १० एकर जमीन अपेक्षीत असून योग्य ठिकाणी लागणारी जमिन ग्रहीत करणेकरीता आवश्यक बाबी आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांचे स्तरावर करावे यासह प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**संवाद :**

श्री.संतोष जेजूरकर :मंजूर करण्यात यावा.

डॉ. भागवत कराड :अटी शर्ती सभागृहा समोर आणाव्यात

याच वेळी मा.महापौर डायस समोर स.सदस्य जमतात मोठया आवाजात एकाच वेळी बोलतात गोधंळ चालू असतो.

मा.महापौर :सर्व स.सदस्यांनी शांत रहावे आपआपल्या जागेवर बसावे. हा विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जलदगतीने विकसीत होत असलेल्या या शहरात प्रादेशिक विज्ञान केंद्राची निर्मिती (Regional Science Center) करण्यास तसेच प्रादेशिक विज्ञान केंद्राची उभारणी करण्याकरीता केंद्र शासनातर्फे ५० टक्के अनुदान प्राप्त करण्यास व उर्वरित ५० टक्के निधी महानगरपालिकेस करावा लागेल. या ५० टक्के निधीपैकी ५० टक्के निधी महाराष्ट्र शासन यांचे मार्फत मिळविणेस आणि प्रकल्प राबविणे व दैनंदिन देखभाल महानगरपालिकेने करणेस तसेच प्रकल्प उभारणीकरीता आवश्यक तांत्रिक बाबी उदा. नकाशे,आराखडे,अंदाजपत्रके या बाबी NCSM (National Council of Science Museum) कलकत्ता मार्फत मान्यता घेण्यास आणि NCSM मार्फत टेक्नीकल कन्सन्टन्सी (Technical Consultancy) राहील. प्रादेशिक विज्ञान केंद्राकरीता अंदाजे १० एकर जमीन ग्रहीत करणेकरीता आवश्यक बाबी आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांचे स्तरावर करावे यासह प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : स्थगित का ठेवले आमचे ऐकायचे नाही का?

मा.महापौर :स.सदस्य आपण यावर चर्चा केली असती तर माझी यास तयारी आहे आपण शांततेने चर्चा करावी असे वांरवार मी सर्वांना आवाहन केले होते.

सौ.लता दलाल :स्थानिक नागरीकांच्या भावना लक्षात घ्याव्या तुमच्या राजकारणासाठी ते नाहीत.

मा.महापौर :सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

**विषय क्र.७२ :**

मा.आयुक्त,महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जाधववाडी येथे वाहतुक नगर तयार करणेसाठी मनपाच्या ताब्यात १० एकर जमीन उपलब्ध असून सदर प्रकल्प विकास करणेसाठी मा.सर्वसाधारण सभेच्या दिनांक १९.०६.२००६ रोजीच्या विषय क्र.२७४/२ नुसार रू.२०० लक्षची मंजुरी प्राप्त आहे. तसेच सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात रूपये ३०० लक्षची तरतुद करण्यात आली आहे.

विकास कामाचे अंदाजपत्रके तयार करण्यात आले असून उपलब्ध १० एकरपैकी ६ एकरमध्ये महानगरपालिकेचे वाहतुकनगर,मध्यवर्ती जकातनाका,गोडाऊन,यांत्रिकी प्रयोगशाळा,वेब्रीज इत्यादी विकास कामासाठी अंदाजपत्रके तयारकरून निविदा काढण्यात येऊन मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त आहे.

उर्वरीत ४ एकर वाहतुक नगरशी संबंधीत कार्यासाठी जागा उपलब्ध असून सदर ठिकाणी वाहतूक दारांना राहणेसाठी सोय उपलब्ध करून देणे (लॉजींग) रेस्टॉरंट,बँक,ट्रान्सपोर्ट प्लाझा, वाहन दुरूस्ती,ॲटोपार्टस,गॅरेज,पेट्रोलपंप व वाहने उभी करण्यासाठी सोय उपलब्ध करणे, इत्यादीसाठी जागेचा विकास करणेचा मनपाचा मानस आहे. यासाठी सदर ४ एकर जागा ९९ वर्षाच्या भाडे तत्वावर खाजगी वाहतूक नगर देणेसाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संतोष जेजूरकर :विषय क्र.६६ ज्या प्रमाणे मंजूर केला जे नॉर्मस् त्यास देण्यात आले तेच या विषयास देण्यात यावे.

मा.महापौर :प्रशासनाने अटी शर्तीसह हा प्रस्ताव सादर करावा. व त्यानंतर यास मंजूरी घ्यावी.

**ठराव :**

प्रशासनाने अटी शर्तीसह प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र.७३ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करत आहेत की, महानगरपालिकेच्या कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी वैद्यकीय परतावा(मेडीकल रीइमबर्समेन्ट) अधिनियम लागू केले आहे. या नियमाअंतर्गत कर्मचारी व अधिकाऱ्यांना ठराविक गंभीर आजारांसाठी ठराविक आगाऊ रक्कम देण्यात येते. व इतर ठरावीक आजारांसाठी रूग्णालयाची व औषधांची बिले सादर केल्यानंतर वैद्यकीय परताव्याची रक्कम दिली जाते. दरवर्षी मनपाचा यावर ३० ते ४० लाख खर्च होतो. तसेच रूग्ण गंभीर स्थितीमध्ये खाजगी रूग्णालयात दाखल होतो व वैद्यकीय परताव्याच्या प्रशासकीय कार्यवाहीमुळे कित्येकदा रूग्णास वैद्यकीय खर्चासाठी वेळेवर रक्कम हातात मिळत नाही. त्यामुळे वैद्यकीय उपचारामध्ये अडथळे निर्माण होतात.

वरील सर्व विलंब टाळण्यासाठी खाजगी इन्शुरन्स कंपनीकडून मनपा कर्मचारी व अधिकारी यांची हेल्थ पॉलीसी घेण्यात येणार आहे. या पॉलीसी अंतर्गत प्रत्येक कर्मचाऱ्यास व अधिकाऱ्यास हेल्थ कार्ड देण्यात येईल. ते त्याचा कुटूंबियासाठी(पती-पत्नी,आई-वडील सन २००१ पुर्वीची सर्व अपत्ये,सन २००१ नंतर झालेली असल्यास २ अपत्ये,महिला कर्मचारी/अधिकारी यांच्यावर आर्थिक दृष्टया अवलंबून असलेले यांचे आई,वडील/सासू,सासरे) यांना वापरता येईल. पॉलीसी कार्ड होल्डर किंवा त्याच्या कुटूंबातील व्यक्ती रूग्णालयात भरती झाल्यावर त्यांना रूग्णालयाशी कोणत्याही पैशाचे व्यवहार न करता ताबडतोब रूग्णालयातर्फे उपचार सुरू होतील. रूग्णालयात आलेल्या एक लाखा पर्यंतचा खर्च इन्शुरन्स कंपनीतर्फे रूग्णालयास परस्पर अदा केला जाईल. या हेल्थ इन्शुरन्स कव्हरेजसाठी ८० टक्के रक्कम मनपातर्फे भरण्यात येईल. व उर्वरीत २० टक्के रक्कम संबंधीत कर्मचारी व अधिकारी यांच्याकडून वसूल करण्यात येईल. एक लाखाच्या रकमेच्या वरतीचा वैद्यकीय परतावा व इतर काही विशेष बाबी उद्भवल्यास नियमानुसार मनपातर्फे वैद्यकीय परतावा देण्यात येईल. सदरील प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

मा.महापौर :आपण सर्व स.सदस्य जागेवर बसले तर चर्चा करता येईल.

श्री.नासेर नाहदी :विषय क्र.७१ चे टेंडर कॉल करावे निधी कोठून आणणार आहे खुलासा करावा.

मा.आयुक्त : ते शासनाकडे मंजूरीसाठी जाईल.

सौ.लता दलाल :७३ वा विषय चालू आहे सविस्तर खुलासा व्हावा.स्थायी समितीला असा प्रस्ताव आला होता की, ९० टक्के दयावे व आता ८० टक्के मेडीकल देयक परतावा दयावे म्हणून आले सविस्तर खुलासा करावा.

मा.महापौर : मा.आयुक्तांनी संपूर्णपणे हा विषय सभागृहासमोर मांडावा.

मा.आयुक्त सध्या मेडीकल रिईबर्समेंन्ट जे रूल आहे त्या व्यक्तीना अगोदर खर्च करावा लागतो नंतर त्याला परतावा देतो त्यांना ८० टक्के परतावा केला जातो मोठा खर्च असेल तर ॲडव्हान्स घ्यावे लागते ऐनवेळी ॲडव्हान्स रक्कम घेणे अवघड होते. त्यामूळे सिस्टम काढले की कॅशलेस मेडीकल इन्शुरन्सचे कार्ड देवून यामूळे कोणतीही रक्कम अगोदर खर्च करण्याची गरज पडणार नाही कॅशलेसं अडमीशन होईल.त्यांना तेथे कोणताही प्रकारचा खर्च करण्याची गरज भासणार नाही.१०० टक्के कंपनी पिकअप करणार पुर्वी ८० टक्के होते शासनाने ९० टक्के सूधारीत केलेले आहे. ठराव पूर्वी पाठविण्यात आला होता त्यात ९० टक्के करण्यास काही हरकत नाही ९० टक्के असावयास पाहिजे. त्या प्रमाणे मान्यता दयावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : मंजूर करावे.

मा.महापौर :दुरूस्तीसह मान्यता देण्यात येते.मेडीकल खर्च हा ९०%अदा करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महानगरपालिकेच्या कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी वैद्यकीय परतावा(मेडीकल रीइमबर्समेन्ट)अधिनियम लागू केले असल्यामूळे,व या नियमाअंतर्गत कर्मचारी व अधिकाऱ्यांना ठराविक गंभीर आजारांसाठी ठराविक आगाऊ रक्कम देण्यात येते. व इतर ठरावीक आजारांसाठी रूग्णालयाची व औषधांची बिले सादर केल्यानंतर वैद्यकीय परताव्याची रक्कम दिली जाते. दरवर्षी मनपाचा यावर ३० ते ४० लाख खर्च होतो. तसेच रूग्ण गंभीर स्थितीमध्ये खाजगी रूग्णालयात दाखल होतो व वैद्यकीय परताव्याच्या प्रशासकीय कार्यवाहीमुळे कित्येकदा रूग्णास वैद्यकीय खर्चासाठी वेळेवर रक्कम हातात मिळत नाही. त्यामुळे वैद्यकीय उपचारामध्ये अडथळे निर्माण होतात.

वरील सर्व विलंब टाळण्यासाठी खाजगी इन्शुरन्स कंपनीकडून मनपा कर्मचारी व अधिकारी यांची हेल्थ पॉलीसी घेण्यात येणार आहे. या पॉलीसी अंतर्गत प्रत्येक कर्मचाऱ्यास व अधिकाऱ्यास हेल्थ कार्ड देण्यात येईल. ते त्याचा कुटूंबियासाठी(पती-पत्नी,आई-वडील सन २००१ पुर्वीची सर्व अपत्ये,सन २००१ नंतर झालेली असल्यास २ अपत्ये,महिला कर्मचारी/अधिकारी यांच्यावर आर्थिक दृष्टया अवलंबून असलेले यांचे आई,वडील/सासू,सासरे) यांना वापरता येईल. पॉलीसी कार्ड होल्डर किंवा त्याच्या कुटूंबातील व्यक्ती रूग्णालयात भरती झाल्यावर त्यांना रूग्णालयाशी कोणत्याही पैशाचे व्यवहार न करता ताबडतोब रूग्णालयातर्फे उपचार सुरू होतील. रूग्णालयात आलेल्या एक लाखा पर्यंतचा खर्च इन्शुरन्स कंपनीतर्फे रूग्णालयास परस्पर अदा केला जाईल. या हेल्थ इन्शुरन्स कव्हरेजसाठी ९० टक्के रक्कम मनपातर्फे भरणे या दुरूस्तीसह व उर्वरीत १० टक्के रक्कम संबंधीत कर्मचारी व अधिकारी यांच्याकडून वसूल करण्यात येईल. एक लाखाच्या रकमेच्या वरतीचा वैद्यकीय परतावा व इतर काही विशेष बाबी उद्‌भवल्यास नियमानुसार मनपातर्फे वैद्यकीय परतावा देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

टिप : विषय क्रं.८२ नंतर विषय क्रं.७४ वर निर्णय झाल्याने विषय क्र.८२ नंतर एकत्रित चर्चेसह वृत्तांतात नोंद घेण्यात आलेली आहे.

**चर्चा :**

श्री.प्रशांत देसरडा :जे जे नागरीक १०० टक्के टॅक्स वेळेवर भरणा करतील त्याचा २५००० रू. अपघाती विमा काढणार होते इन्शुरन्सच्या पावत्या प्रत्येक वार्ड कार्यालयात पडलेल्या आहे मागिल ज्या योजना राबविल्या त्याचा विचारही केला पाहिजे.एकही नागरीकापर्यत वाटप झालेले नाही जो पत्ता व नाव दिले ते व्यवस्थीत दिले नाही झोन कार्यालयाकडून लेखा विभागात आले तेथून एजन्सीकडे गेले.नागरीकाचे घरे मिळत नाही म्हणून पावतीवर एजन्सीने लिहिले.आज त्या नागरीकांचे घरे सापडत नाही.

श्री.सतीश कटकटे :आरोग्य समितीच्या संदर्भात विषय आहे आरोग्य समितीकडे पाठविण्यात यावा.

मा.महापौर :जी सुचना स.सदस्यांनी केली ती सत्य आहे.ज्यांनी कर भरणा केला त्यांचे विमा काढला परंतू त्या नागरीकापर्यत पॉलीसीच पोहचली नाही याची काळजी प्रशासनाने घेतली पाहिजे महापालिका उपक्रम राबविते ते लोकापर्यत गेले पाहिजे.त्याची दखल घेत जे उपक्रम मागे राबविले गेले त्याची दखल प्रशासनाने घ्यावी.

**विषय क्र. ७५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९७ करीता मनपा अर्थसंकल्प २००७-०८ मध्ये पान २२८ वर असलेल्या २० लाखाच्या तरतुदीत रक्कम रूपये ०२ लाख रूपये उरलेले आहे सदरील उरलेली रक्कम वार्ड क्र.९७ मध्ये विद्युत संदर्भात आवश्यकतेनुसार विविध किरकोळ कामे करण्यासाठी रक्कम वळती करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.अ.साजेद अ.सत्तार अनुमोदक : श्रीमती मोमीन सफिया फिरदौस अय्युब खान

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९७ करीता मनपा अर्थसंकल्प २००७-०८ मध्ये पान २२८ वर असलेल्या २० लाखाच्या तरतुदीत रक्कम रूपये ०२ लाख रूपये उरलेले असल्यामूळे,सदरील उरलेली रक्कम वार्ड क्र.९७ मध्ये विद्युत संदर्भात आवश्यकतेनुसार विविध किरकोळ कामे करण्याकरीता वळती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.३० हर्षनगर येथील खालील प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | प्रभाग क्र.३० हर्षनगर अंतर्गत बागा देखभाल व दुरूस्तीची कामे करणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यू ५५ अ.क्र.५ तरतुद रक्कम १.५ लक्ष. | प्रभाग क्र.३० येथील फुटकळ दुरूस्तीचे कामे करणे. |
| ०२ | प्रभाग क्र.३० हर्षनगर अंतर्गत विविध भागात मनपा इमारतीव दवाखाने इ.विकास कामे करणे अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यू ५७ अ.क्र.७ तरतुद रक्कम १ लक्ष. | प्रभाग क्र.३० येथील विविध ठिकाणी फुटकळ दुरूस्तीचे कामे करणे. |
| ०३ | प्रभाग क्र.३० मध्ये विविध ठिकाणी जी.आय.पोल व उर्जा बचत दिवे लावणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यू १९४ अ.क्र.४ तरतुद रक्कम ३ लक्ष. | प्रभाग क्र.३० येथे बारा मिटर चे हायमस्ट लावणे व उर्जाबचत दिवे लावणे. |

सुचक : सौ.शोभा हरीश्चंद्र मिटकर अनुमोदक : श्री.सतिष कटकटे

मा.महापौर :विषय क्र. ७६ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.३० हर्षनगर येथील खालीलप्रमाणे कामांचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | प्रभाग क्र.३० हर्षनगर अंतर्गत बागा देखभाल व दुरूस्तीची कामे करणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यू ५५ अ.क्र.५ तरतुद रक्कम १.५ लक्ष. | प्रभाग क्र.३० येथील फुटकळ दुरूस्तीचे कामे करणे. |
| ०२ | प्रभाग क्र.३० हर्षनगर अंतर्गत विविध भागात मनपा इमारतीव दवाखाने इ.विकास कामे करणे अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यू ५७ अ.क्र.७ तरतुद रक्कम १ लक्ष. | प्रभाग क्र.३० येथील विविध ठिकाणी फुटकळ दुरूस्तीचे कामे करणे. |
| ०३ | प्रभाग क्र.३० मध्ये विविध ठिकाणी जी.आय.पोल व उर्जा बचत दिवे लावणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यू १९४ अ.क्र.४ तरतुद रक्कम ३ लक्ष. | प्रभाग क्र.३० येथे बारा मिटर चे हायमस्ट लावणे व उर्जाबचत दिवे लावणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पैठण रोड ते मनपा हद्द (वळदगांव) पर्यंत मंजुर विकास योजना अन्वये मंजूर प्रस्तावित ४२ मिटर रूंद रस्त्याचे भूसंपादन करणे सदरील रस्ता हा अत्यावश्यक असुन अनेक जड वाहने या भागातील नागरीकांची रहदारीची वर्दळ लक्षात घेता गट नंबर १०३,११४,११५ नक्षत्रवाडी मधून जाणाऱ्या ४२ मिटर रूंद विकास रस्त्याचे भूसंपादन करणे गरजेचे आहे. सदरील रस्त्याचे संयुक्त मोजणी करणे मिळकत धारकांना सूचना देणे, अवार्ड घोषीत करून सदरील रस्त्याच्या जमीनीचे टिडीआर अंतर्गत मोबदला देण्याची कारवाई करण्याचा प्रस्ताव सर्वानुमते मान्यतेसाठी व मंजूरीसाठी सादर. वैधानिक कार्यवाही व्हावी.

सुचक : सौ.अनिता नंदकुमार घोडेले अनुमोदक : श्री.गजानन रामकिसन बारवाल

मा.महापौर :विषय क्र.७७ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पैठण रोड ते मनपा हद्द (वळदगांव) पर्यंत गट नंबर १०३,११४,११५ नक्षत्रवाडी मधून जाणाऱ्या ४२ मिटर रूंद मंजूर विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र भूसंपादन करणे,सदरील रस्त्याचे संयुक्त मोजणी करणे,मिळकत धारकांना सूचना देणे, अवार्ड घोषीत करून सदरील रस्त्याच्या जमीनीचे टिडीआर अंतर्गत मोबदला देण्याची कारवाई करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.४१ येथील खालील कामाचे हेडचेंज करण्यात यावे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | पा.क्रं. | जुना लेखाशिर्ष २००७-०८ | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| ०५ | २२९ | प्रभाग क्रं.शहाबाजार अंतर्गत शाहबाजार कब्रस्तानमध्ये लोखंडी शेड टाकणे रूपये ०५ लाख. | प्रभाग क्रं.४१ येथे विद्युतीकरणाचे फुटकळ व किरकोळ दुरूस्तीचे कामे करणे, जुने पथदिवे बदलणे, |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | २३० | प्रभाग क्र.४१ शहाबाजार अंतर्गत विविध ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे रूपये ०५ लाख | प्रभाग क्र.४१ येथे पेव्हर ब्लॉक दुरूस्ती करणे, काँक्रेट दुरूस्ती करणे, खडी मुरूम टाकणे,मनपा इमारती व गटारी दुरूस्ती करणे, व फुटकळ व किरकोळ दुरूस्तीचे कामे करणे. |
| ०१ | १०२ | प्रभाग क्र.४१ येथे अशोकनगर येथील संडासची दुरूस्ती करणे रूपये ०१ लाख | प्रभाग क्र.४१ येथे ड्रेनेजचे फुटकळ व किरकोळ कामे करणे, दुरूस्ती करणे. |

सुचक :श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनूस अनुमोदक : श्री.नासेर नाहदी

मा.महापौर :विषय क्र. ७८ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

वार्ड क्र.४१ येथील खालील कामाचे हेडचेंज करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | पा.क्रं. | जुना लेखाशिर्ष २००७-०८ | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| ०५ | २२९ | प्रभाग क्रं.शहाबाजार अंतर्गत शाहबाजार कब्रस्तानमध्ये लोखंडी शेड टाकणे रूपये ०५ लाख. | प्रभाग क्रं.४१ येथे विद्युतीकरणाचे फुटकळ व किरकोळ दुरुस्तीचे कामे करणे, जुने पथदिवे बदलणे, |
| १० | २३० | प्रभाग क्र.४१ शहाबाजार अंतर्गत विविध ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे रूपये ०५ लाख | प्रभाग क्र.४१ येथे पेव्हर ब्लॉक दुरुस्ती करणे, काँक्रेट दुरूस्ती करणे, खडी मुरूम टाकणे,मनपा इमारती व गटारी दुरूस्ती करणे, व फुटकळ व किरकोळ दुरूस्तीचे कामे करणे. |
| ०१ | १०२ | प्रभाग क्र.४१ येथे अशोकनगर येथील संडासची दुरूस्ती करणे रूपये ०१ लाख | प्रभाग क्र.४१ येथे ड्रेनेजचे फुटकळ व किरकोळ कामे करणे, दुरूस्ती करणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याचवेळी मा.महापौर यांचे डायससमोर अनेक स.सदस्य जमतात मोठमोठयाने बोलतात.

**चर्चा :**

मा.महापौर :आपण सर्व जण शांत बसावे दोन्ही विषय एकत्र घेणार आहोत आपण चर्चा घेणार आहोत.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:७४ वर चर्चा घ्यावी नंतर ९३ विषय घ्यावा.

सौ.लता दलाल :विषय क्र. ७८ चालू आहे आता कूठे ७४ ची मागणी करीत आहात.

मा.महापौर :दोन्ही विषय सारखे आहे सोबत घेऊ. त्यावेळी चर्चा घेवू.

(यावेळीही सभागृहात अनेक सदस्य बोलत असतात.)

सौ.लता दलाल :दोन्ही विषय बरोबर घ्यावे.

मा.महापौर : आपण दोन्ही विषय एकत्र घेवू. त्यावर सविस्तर चर्चा होईल, कृपया आपण जागेवर बसावे.

**विषय क्र. ७९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, संपुर्ण जगाचे लक्ष वेधून १७ वर्षे चाललेल्या मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा ऐतिहासिक लढा १४ जानेवारी १९९४ रोजी मराठवाडा विद्यापीठाला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवाचे अधिकृतपणे नांव देवून यशस्वी झाला. याचा भारतातील सर्व जाती-धर्माच्या नागरिकांना, तरूणांना सार्थ अभिमान वाटतो, म्हणूनच प्रत्येक वर्षी १४ जाने. या ऐतिहासिक दिनानिमित्त महाराष्ट्राच्या शहरी व ग्रामीण भागातील विविध जाती धर्मातील बहुजन नागरिक मोठ्या संख्येने कुटुंबासह प्रचंड प्रमाणात विद्यापीठाच्या दर्शनाला येतात व या विजयी आनंदी सोहळ्यामध्ये सहभागी होऊन नामांतर लढ्यात शहीद झालेल्या बालक, माता, भगिनी, अनेक तरूण बांधव यांच्या बलीदानाने प्रेरीत होतात. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नांवाने व पदस्पर्शाने पावन झालेल्या विद्यापीठ आणि नागसेन परिसराला जनसागराचे स्वरूप येऊन हा परिसर दिवसभराच्या विविध कार्यक्रमाने गजबजून जातो. त्यामुळे या ऐतिहासिक दिनाचे महत्व गांभीर्य व लोकप्रियता यांचे औचित्य साधून राष्ट्रीय एकात्मतेचा आणि खेळाचा प्रसार,प्रचार व विकास व्हावा या एकमेव हेतूने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवाच्या नांवाने दुसऱ्या राज्यस्तरीय क्रॉस कंट्री स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. अशा प्रकारची क्रिडा स्पर्धा महाराष्ट्राच्या क्रिडा व सामाजिक क्षेत्रामध्ये पहिल्यांदाच होत असल्यामुळे या स्पर्धेला राज्य व राष्ट्रीय स्तरावर फार महत्व प्राप्त झाले आहे. मागील वर्षी देखील लोकवर्गणीतून विभागीय क्रॉस कंट्री स्पर्धेचे यशस्वीपणे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतून राज्य स्पर्धेसाठी जिल्हा संघाची निवड करण्यात आली होती. त्यामुळे या स्पर्धेची लोकप्रियता अधिकच वाढली होती. म्हणून नागरिक व खेळाडू यांच्या आग्रहास्तव या वर्षी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय क्रॉस कंट्री महापौर चषक या

स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या स्पर्धेच्या यशस्वीतेची जबाबदारी स्विकारून या स्पर्धेसाठी होणारा एकूण खर्च आपल्या महानगरपालिकेने महापौर निधीतून करावा. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक:श्री.संजय जगताप अनुमोदक:श्री.अ.साजेद अ.सत्तार,श्री.सलीम मौलाना,श्री.नासेर नाहदी

**संवाद :**

श्री.कैलास गायकवाड :विषय क्र. ७४ वर अगोदर चर्चा घ्यावी.

सौ. लता दलाल :दोन्ही विषय एकाच वेळेस घ्यावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :७४ बरोबर ९३ विषयही घेण्यात यावा. पहिला घ्या.

मा.महापौर :स.सदस्यानी कृपया विषय क्र. ७९ वर बोलावे मी आपणास वारंवार सांगत आहे चर्चा घेणार आहोत. दोन्ही सोबत करू.

श्री.सतीश कटकटे : ७४ नामंजूर करावा. बाकी सर्व मंजूर करावे.

मा.महापौर : विषय क्र. ७९ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवाच्या नांवाने दुसऱ्या राज्यस्तरीय क्रॉस कंट्री स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. अशा प्रकारची क्रिडा स्पर्धा महाराष्ट्राच्या क्रिडा व सामाजिक क्षेत्रामध्ये पहिल्यांदाच होत असल्यामुळे व या स्पर्धेतून राज्य स्पर्धेसाठी जिल्हा संघाची निवड करण्यात आली होती,त्यामुळे या स्पर्धेची लोकप्रियता अधिकच वाढली होती. म्हणून नागरिक व खेळाडू यांच्या आग्रहास्तव या वर्षी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय क्रॉस कंट्री महापौर चषक या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या स्पर्धेच्या यशस्वीतेची जबाबदारी स्विकारून या स्पर्धेसाठी होणारा एकूण खर्च महानगरपालिकेने महापौर निधीतून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.५९ मधील खालील लेखाशिर्षक बदलण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव ठेवण्यात यावा, ही विनंती.

| अ.क्र. | लेखाशिर्षकातील काम | बदलावयाचे काम |
|---|---|---|
| ०१. | १.अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यु २७ अ.क्र.१८ वर खूल्या जागेत उद्यान विकसीत करणे व खेळणी बसविणे ३ लक्ष<br>२.पान क्र.डब्ल्यु १८४ अ.क्र.११ वर विविध ठिकाणी खडीकरण करून डांबरीकरण करणे ३ लक्ष | वार्ड क्र.५९ राधामोहन कॉलनी येथे खूल्या जागेस तार फेन्सींग करून उद्यान विकसीत करणे ६ लक्ष. |

सुचक : श्री.सतिष कटकटे अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील

मा.महापौर :विषय क्र.८० मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५९ मधील कामाचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | लेखाशिर्षकातील काम | बदलावयाचे काम |
|---|---|---|
| ०१. | १.अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यु २७ अ.क्र.१८ वर खूल्या जागेत उद्यान विकसीत करणे व खेळणी बसविणे ३ लक्ष<br>२.पान क्र.डब्ल्यु १८४ अ.क्र.११ वर विविध ठिकाणी खडीकरण करून डांबरीकरण करणे ३ लक्ष | वार्ड क्र.५९ राधामोहन कॉलनी येथे खूल्या जागेस तार फेन्सींग करून उद्यान विकसीत करणे ६ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री.कैलास गायकवाड : जोपर्यंत विषय क्र.७४ वर चर्चा होत नाही, तोपर्यंत दूसरे विषय घेवू नये.

**विषय क्र. ८१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.७१ मधील खालील लेखाशिर्षकात बदल करून विकास काम करण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव ठेवण्यात यावा, ही विनंती.

| अ.क्र. | लेखाशिर्षकातील काम | बदलावयाचे काम |
|---|---|---|
| ०१. | १. पान क्र.डब्ल्यु २२१ अ.क्र.४५ वर प्रभाग क्र.७१ न्यायनगर अंतर्गत १०० फुट रोडला पेव्हर ब्लॉक बसविणे. ५ लक्ष<br>२. पान क्र.डब्ल्यु १९० अ.क्र.१७ वर वार्ड क्र.७१ कल्पतरू हौ.सो.५० फुट रूंद रस्त्यास फुटपाथ बांधणे ५ लक्ष | प्रभाग क्र.७१ न्यायनगर अंतर्गत भुषणनगर, चौंडेश्वरी हौ.सो.इत्यादी ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. करीता सदरील एकूण १० लक्ष रक्कम वापरण्यात यावी. |

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील अनुमोदक : श्री.सतिष कटकटे

मा.महापौर : हा विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७१ मधील कामाचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | लेखाशिर्षकातील काम | बदलावयाचे काम |
|---|---|---|
| ०१. | १. पान क्र.डब्ल्यु २२१ अ.क्र.४५ वर प्रभाग क्र.७१ न्यायनगर अंतर्गत १०० फुट रोडला पेव्हर ब्लॉक बसविणे. ५ लक्ष<br>२. पान क्र.डब्ल्यु १९० अ.क्र.१७ वर वार्ड क्र.७१ कल्पतरू हौ.सो.५० फुट रूंद रस्त्यास फुटपाथ बांधणे ५ लक्ष | प्रभाग क्र.७१ न्यायनगर अंतर्गत भुषणनगर, चौंडेश्वरी हौ.सो.इत्यादी ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. करीता सदरील एकुण १० लक्ष रक्कम वापरण्यात यावी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अर्थसंकल्प २००७-०८ मधील पान क्र.W-१८५ शहरी भागात नविन कॉंकरीट रस्ते या लेखाशिर्षक मधील अ.क्र.०४ साठी तरतूद ५.०० लक्षचे काम करणे ऐवजी वार्ड क्र.१० मध्ये दैनंदिन देखभाल दुरूस्ती किरकोळ व फुटकळ कामे रक्कम रूपये ५.०० लक्ष वापरणे करीता परवानगी देण्यांत यावी. हि नम्र विनंती.

सुचक : श्री.सलीम खॉन यासीन खॉन अनुमोदक : श्री.मिलींद दाभाडे,श्री.संजय जगताप

मा.महापौर :विषय क्र. ८२ मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००७-०८ मधील पान क्र.W-१८५ शहरी भागात नविन कॉंकरीट रस्ते या लेखाशिर्षक मधील अ.क्र.०४ साठी तरतूद र.रू.५.०० लक्षचे काम करणे **ऐवजी** वार्ड क्र.१० मध्ये दैनंदिन देखभाल दुरूस्ती किरकोळ व फुटकळ कामे रक्कम रूपये ५.०० लक्ष वळती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४ :**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करत आहेत की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये शहर अभियंता हे पद वैधानिक पद असून सदरचे पद दि.१६.१२.१९८२ च्या ठराव क्र.१ अन्वये महापालिका आस्थापनेवर निर्माण करण्यात आलेले आहे. महापालिका आस्थापनेवरील अधिक्षक अभियंता/शहर अभियंता पदावर कार्यरत श्री.सी.एस.सोनी हे दिनांक ३१.१०.२००७ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त होत आहेत.

महापालिका आस्थापनेवरील शहर अभियंता पदास शासन निर्णय क्र.एएमसी १४/२०००/२१७४/प्रक्र १३५, दिनांक ०९ डिसेबंर २००२ अन्वये अधिक्षक अभियंता पदाची वेतनश्रेणी रूपये १२०००-१६५०० देण्यात आलेली आहे. तथापी शासन निर्णय क्र.संकिर्ण -१००५/वर्गीकरण/प्रक्र-३७९/०५/नवि-२४,दि.४ मे २००६ अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेचे 'ड' वर्गात वर्गीकरण करण्यात आलेले असून 'ड' वर्ग महापालिकांसाठी शहर अभियंताचे एक पद वेतनश्रेणी रूपये १०६५० ते १५५०० मध्ये दर्शविण्यात आलेले आहे.

शहर अभियंता पदावर कार्यरत श्री.सी.एस.सोनी यांच्या नियत वयोमानाने ३१.१०.२००७ रोजी सेवानिवृत्त होत असल्यामूळे रिक्त होणाऱ्या शहर अभियंता या पदावर कार्यकारी अभियंता संवर्गातील कार्यरत कार्यकारी अभियंत्यापैकी ज्येष्ठ कार्यकारी अभियंता/अति.शहर अभियंता, श्री.एम.डी.सोनवणे यांना शहर अभियंता हे पदनाम देणे योग्य. ज्येष्ठ अधिकाऱ्यास शहर अभियंता हे पदनाम देण्यात येत असले तरी शहर अभियंता व उर्वरीत दोन कार्यकारी अभियंता यांचे सनियंत्रण अधिकारी मा.आयुक्त हेच राहतील. तीनही अधिकारी स्वतंत्रपणे मा.आयुक्तांना प्रतिवेदन (Report) करतील. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.संतोष जेजुरकर : अशाच प्रकारचा विषय पूढे विषयपत्रिकेवर आहे, त्या सोबतच या दोन्ही विषयावर एकत्रित चर्चा करण्यात यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : विषय क्र.७४ हा प्रशासकीय विषय आहे दोन्ही जोडून त्यावर चर्चा करावी. अगोदर यावर चर्चा करावी प्रशासकीय ठराव आहे याला थांबवू शकत नाही.

श्री.सलीम खान : विषय क्र.७४ व ९३ वर एकत्रित चर्चा करावी.

श्री.संतोष जेजूरकर : दोन्ही विषय बरोबरच घ्यावे.
श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : अगोदर विषय क्र. ७४ वर चर्चा करून घ्यावी.
श्री.सतीष कटकटे : दोन्ही विषयावर एकत्रित चर्चा करण्यात यावी.
श्री.संतोष जेजुरकर : दोन्ही विषय एकाचवेळी घेण्यात यावे.पूढच्या विषयाच्या सोबत घेण्यातयावे.
श्री.संतोष खेंडके : एकच विषय आहे दोन्ही विषय मिळून चर्चा करावी.
मा.महापौर : या विषयावरही चर्चा होईल. स.सदस्यांनी कृपया शांत रहावे. विषय क्र.७४ व ९३ हे दोन्ही विषय एकच आहे या दोन्ही विषयावर एकत्रित चर्चा नंतर केली जाईल.
श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : अगोदर विषय क्र.७४ वर निर्णय घ्यावा नंतर ९३ वर जावे.
मा.महापौर :दोन्ही विषयावर एकत्रित चर्चा घेणार आहोत स.सदस्यांनी कृपया जागेवर बसावे.

यावेळी स.सदस्य श्री.कैलास गायकवाड यांनी विषय क्र.७४ वर अगोदर निर्णय घ्यावा म्हणून मागणी करतात मा.महापौर डायस वरील राजदंड धरून ओढण्याचा प्रयत्न करतात. काही सदस्य डायस समोर एकाचवेळी मोठमोठयाने बोलतात.

मा.महापौर : स.सदस्यांनी कृपया जागेवर बसावे.
श्री.संतोष जेजुरकर : यांचे सभासदत्व रद्द करण्यांत यावे.
मा.महापौर : या सर्व विषयावर चर्चा होण्यासाठी सर्व सदस्यांनी कृपया आपआपल्या जागेवर बसावे.
सौ.लता दलाल : सभासदत्व रद्द करण्यात यावे.

याच वेळी सभासदत्व रद्द करण्यात यावे असे अनेक स.सदस्य मोठमोठयाने घोषणा देतात.

श्री.सतीष कटकटे : विषय क्र.७४ नामंजूर करावा बाकी सर्व विषय मंजूर करण्यात यावे.
मा.महापौर : कृपया आपण जागेवर बसा. या विषयावर चर्चा होणे अपेक्षीत आहे मी वारंवार सूचना करीत आहे, कृपया आपण जागेवर बसावे.
श्री.सलिम खान : विषय क्र.७४ व ९३ वर माहिती द्यावी. सर्व विषय मंजूर करावे.

यावेळीही मा.महापौरांच्या डायस समोर अनेक सदस्य जमा झालेले आहेत, सभासदत्व रद्द करण्याचे घोषणा देणे चालूच असते.

मा.महापौर : विषय क्र.७४ रद्द करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करणेस मान्यता देण्यांत आली.

मा.महापौर : पुरवणी विषय पत्रिकेला सुरूवात होत आहे.

यावेळीही सभागृहात गोंधळ चालू असतो.

## <u>पुरवणी विषय</u>

**<u>विषय क्र. ८३ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक ११.१.२००८ रात्री पासुन ए.एम.टी. सर्व्हीसच्या कर्मचाऱ्यांनी अचानक बेकायदेशिर संप पुकारल्यामुळे ए.एम.टी सर्व्हीस बंद पडुन विस्कळीत झाल्यामुळें शहरातील नागरीकांची तसेच विद्यार्थ्यांची गैरसोय निर्माण झाली आहे.

Industrial Disputes Act-१९४७ २ (n) नुसार AMT शहर बस वाहतुक, Public Utility Service आहे. Sub clause (l) Public Utility Service means any Railway Service or any Transport Service for the carriage of Passengers or goods.

इंडस्ट्रीयल डिस्पुट ॲक्ट १९४७ च्या कायदेशिर व्याख्येप्रमाणे मनपा शहर बस वाहतुकीला अत्यावश्यक ट्रान्सपोर्ट सर्व्हीस म्हणून घोषित करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे. तरी कृपया ए.एम.टी.शहर बस वाहतुक सेवेस अत्यावश्यक ट्रान्सपोर्ट सर्व्हीस म्हणून घोषीत करण्यात यावे.

सुचक : श्री.संजय जोशी अनुमोदक : श्री.सिताराम सुरे

मा.महापौर : हा विषय मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, इंडस्ट्रीयल डिस्पुट ॲक्ट १९४७ च्या कायदेशिर व्याख्येप्रमाणे मनपा शहर बस वाहतुकीला अत्यावश्यक ट्रान्सपोर्ट सर्व्हीस म्हणून घोषित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच वेळी मा.महापौर डायस समोर अनेक सदस्य एकत्र जमतात मोठमोठयाने बोलतात,विविध घोषणा देणे चालूच आहे. काहीही ऐकू येत नाही.

**विषय क्र. ८४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७४ मधील खालील विकास काम करणे अत्यंत आवश्यक असुन लेखाशिर्षक बदलण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव ठेवण्यात यावा,ही विनंती. खालील प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्षक (भांडवली कामे व जलनिसारण) | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यू-१८६ अ.क्र.१ वर वार्ड क्र.७४ ज्ञानेश्वर कॉलनी भागातील संघर्षनगर घर क्र.२७/१२ जवळील खुली जागेस संरक्षित भिंत बांधुन सुशोभिकरण करणे-२ लक्ष. | वार्ड क्र.७४ ज्ञानेश्वर कॉलनी संघर्षनगर येथील सिडकोच्या सार्वजनिक गार्डनच्या शेजारी (उत्तरेकडील) खुल्या जागेत पेव्हर ब्लॉक बसविणे २ लक्ष. |

सुचक : श्री.बन्सीलाल तुळशीराम गांगवे (मामा) अनुमोदक : श्री.दामोधर शिंदे

मा.महापौर :विषय क्र.८४ मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७४ करीता अर्थसंकल्पात असलेल्या कामाचे लेखाशिर्ष खालीलप्रमाणे बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्षक (भांडवली कामे व जलनिसारण) | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यू-१८६ अ.क्र.१ वर वार्ड क्र.७४ ज्ञानेश्वर कॉलनी भागातील संघर्षनगर घर क्र.२७/१२ जवळील खुली जागेस संरक्षित भिंत बांधुन सुशोभिकरण करणे-२ लक्ष. | वार्ड क्र.७४ ज्ञानेश्वर कॉलनी संघर्षनगर येथील सिडकोच्या सार्वजनिक गार्डनच्या शेजारी (उत्तरेकडील) खुल्या जागेत पेव्हर ब्लॉक बसविणे २ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र.२६ अ.क्र.३४ वर नवीन पथदिवे व्यवस्था या शिर्षाखाली २०.०० लक्ष रू.ची तरतुद करण्यात आली आहे. या लेखाशिर्षातून रक्कम रू.२.०० (दोन लक्ष रू.) मकसुद कॉलनी रोषनगेट भागातील विविध गल्ल्यांमध्ये पथदिवे लावणे व विद्युतीकरणाचे फुटकळ कामे करणे, यासाठी वळती करण्यात यावी. करीता सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुरीस्तव व पुढील कार्यवाहिस्तव सादर.

सुचक : श्री.मुजीब आलम शाह खान अनुमोदक : श्री.मो.जावेद मो.इसाक

मा.महापौर : विषय क्र.८५ मंजूर करण्यांत येतो.

यावेळीही सभागृहात घोषणा देणे चालूच असते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र.२६ अ.क्र.३४ वर नवीन पथदिवे व्यवस्था या शिर्षाखाली २०.०० लक्ष रू.ची तरतुद करण्यात आली आहे. या लेखाशिर्षातून रक्कम रू.२.०० (दोन लक्ष रू.) मकसुद कॉलनी रोषनगेट भागातील विविध गल्ल्यांमध्ये पथदिवे लावणे व विद्युतीकरणाचे फुटकळ कामे करणे, यासाठी वळती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र.W-२५ वर अ.क्र.३ नुसार नवीन जि.आय.पोल लावणे या लेखाशिर्षाखाली रक्कम रू.१०.०० दहा लक्ष रू.ची तरतुद करण्यात आली आहे. सदरील लेखाशिर्षातून रक्कम रू.१.०० एक लक्ष रू.मकसुद कॉलनी-रोषनगेट प्रभागातील विद्युतीकरणाची फुटकळ कामे करणे या कामासाठी वळती करण्यात यावी. करीता सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुरी व पुढील कार्यवाहीस्तव सादर करण्यात येत आहे.

सुचक : श्री.मुजीब आलम शाह खान अनुमोदक : श्री.मो.जावेद मो.इसाक

मा.महापौर : मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र.W-२५ वर अ.क्र.३ नुसार नवीन जि.आय.पोल लावणे या लेखाशिर्षाखाली रक्कम रू.१०.०० दहा लक्ष रू.ची तरतुद करण्यात आली आहे. सदरील लेखाशिर्षातून रक्कम रू.१.०० एक लक्ष मकसुद कॉलनी-रोषनगेट प्रभागातील विद्युतीकरणाची फुटकळ कामे करणे या कामासाठी वळती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६४ क्रांतीचौक मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| २०७/३० | बिजलीनगर येथील नाल्यातील जलनिःसारण वाहिनी बदलणे १०.०० लक्ष. | १. सावरकर चौक ते झांबड इस्टेट पर्यंत नाला चॅनलींग करणे-८.००<br>२. वार्ड क्र.६४ मध्ये विविध ठिकाणी जी.आय,पोल फिटींग,विद्युत देखभाल दुरूस्तीची विविध कामे करणे.-२.०० लक्ष. |

सुचक : श्री.रेणुकादास (राजु) वैद्य अनुमोदक : श्री.खुडे विजय किसन

मा.महापौर : मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६४ क्रांतीचौक मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| २०७/३० | बिजलीनगर येथील नाल्यातील जलनिःसारण वाहिनी बदलणे १०.०० लक्ष. | ३. सावरकर चौक ते झांबड इस्टेट पर्यंत नाला चॅनलींग करणे-८.००<br>४. वार्ड क्र.६४ मध्ये विविध ठिकाणी जी.आय,पोल फिटींग,विद्युत देखभाल दुरूस्तीची विविध कामे करणे.-२.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.०१ हर्सुल येथे भिल्ल समाज स्मशानभुमी विकसित करण्याकरीता अर्थसंकल्प सन ०७-०८ मधील पान क्र.डब्ल्यु ३३ वरील अ.क्र.०३ वर तरतुद करण्यात आलेली आहे. तथापि भिल्ल समाज स्मशानभुमी ऐवजी या ठिकाणी हिंदु समाज स्मशानभुमी विकसित करण्यात यावी व त्याअनुषंगाने या ठिकाणी विकासकामे करण्यास मंजुरी देण्यात यावी करीता उपरोक्तप्रमाणे लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव सर्वसाधारणसभेपुढे मंजुरीस्तव सादर

सुचक : श्री.पुनमचंद बमणे अनुमोदक : श्री.भाऊसाहेब ताठे

मा.महापौर : मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.०१ हर्सुल येथे भिल्ल समाज स्मशानभुमी विकसित करण्याकरीता अर्थसंकल्प सन ०७-०८ मधील पान क्र.डब्ल्यु ३३ वरील अ.क्र.०३ वर तरतुद करण्यात आलेली आहे. तथापि भिल्ल समाज स्मशानभुमी ऐवजी या ठिकाणी हिंदु समाज स्मशानभुमी विकसित करण्यास तसेच या ठिकाणी विकासकामे करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८२ भारतनगर,मातोश्रीनगर अंतर्गत येणाऱ्या आनंदनगर विश्रांतीनगर, या भागामध्ये दलीत वस्ती ५० टक्के पेक्षा अधिक असल्यामुळे या भागामध्ये अद्याप पावेतो दलीत वस्ती अंतर्गत एकही विकास कामे झालेली नसुन तेथील नागरीकांना जाण्या-येण्यासाठी रस्ते नसुन व पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन नाही, तसेच ड्रेनेज लाईन सुध्दा नाही.

महानगरपालिकेने केलेल्या सर्व्हेक्षणानुसार ५० टक्के पेक्षा अधिक दलीत नागरीक राहात असुन त्यांना शासनातर्फे येणाऱ्या दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत रस्ते, पाण्याची पाईप लाईन,ड्रेनेज लाईन इत्यादीसाठी प्रत्येकी २० लक्ष असे एकुण ६० लक्ष तरतुद वार्ड क्र.८२ भारतनगर,मातोश्रीनगर अंतर्गत येणाऱ्या आनंदनगर,विश्रांतीनगर या भागात मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.पार्वतीबाई विजय वाघमारे

अनुमोदक : श्री.संतोष सुधाकर जेजुरकर, श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे, श्री.सतिष कटकटे

मा.महापौर : मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८२ भारतनगर,मातोश्रीनगर अंतर्गत येणाऱ्या आनंदनगर विश्रांतीनगर, या भागामध्ये दलीत वस्ती ५० टक्के पेक्षा अधिक असल्यामुळे,शासनातर्फे येणाऱ्या दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत रस्ते, पाण्याची पाईप लाईन,ड्रेनेज लाईन इत्यादीसाठी प्रत्येकी २० लक्ष असे एकुण ६० लक्ष तरतुद या भागात मुलभूत सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.५४ व प्रभाग क्र.५६ मधील विविध भागात पाणीपुरवठा व वितरण अत्यंत कमी दाबाने व अपुरा होत असून या भागातील नागरीकांना मुबलक पाणी मिळत नसल्याने नागरीकांची अत्यंत गैरसोय होत असून तीव्र पाणी टंचाईस सामोरे जावे लागत आहे. या भागासाठी मागील २० वर्षापासून जलवाहीनी बदलून मोठ्या व्यासाची जलवाहीनी टाकण्याचे काम हाती घेण्यात आलेले नाही. या भागातील वाढती घरांची संख्या, लोकसंख्या यामूळे अस्तित्वात असलेल्या जलवाहीनीतून सुरळीत पाणी पुरवठा होत नाही.

प्रभाग क्र.५४ व प्रभाग क्र.५६ मधील विविध भागात पाणीपुरवठा उच्च दाबाने व मुबलक होण्यासाठी मोठ्या व्यासाची जलवाहीनी टाकण्याचे काम हाती घेणे गरजेचे असून या कामासाठीचे अंदाजपत्रक तात्काळ तयार करून यासाठी लागणाऱ्या अंदाजपत्रकीय खर्चासाठी सन २००७-२००८ वर्षीच्या अर्थसंकल्पातील पृ.क्र.४५,अ.क्र.३२, अ.क्र.३३, अ.क्र.३४ अन्वये उपलब्ध असलेल्या तरतूदीतुन प्रभाग क्र.५४ मधील विविध भागात मोठ्या व्यासाची जलवाहीनी टाकणेसाठी रक्कम रू.१० लक्ष व प्रभाग क्र.५६ मधील विविध भागात मोठ्या व्यासाची जलवाहीनी टाकणेसाठी रक्कम रू.५ लक्ष वळती करण्यांत यावे. करीता प्रस्तावास सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

सुचक : श्री.संतोष सुधाकर जेजुरकर

अनुमोदक : श्री.अशरफ मोतीवाला, श्री.त्र्यबंक तुपे, श्री.सतिष कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.५४ व प्रभाग क्र.५६ मधील विविध भागात पाणीपुरवठा उच्च दाबाने व मुबलक होण्यासाठी मोठ्या व्यासाची जलवाहीनी टाकण्याचे काम हाती घेणेस व या कामासाठीचे अंदाजपत्रक तयार करून यासाठी लागणाऱ्या अंदाजपत्रकीय खर्चासाठी सन २००७-२००८ वर्षीच्या अर्थसंकल्पातील पृ.क्र.४५,अ.क्र.३२, अ.क्र.३३, अ.क्र.३४ अन्वये उपलब्ध असलेल्या तरतूदीतुन प्रभाग क्र.५४ मधील विविध भागात मोठ्या व्यासाची जलवाहीनी टाकणेसाठी रक्कम रू.१० लक्ष व प्रभाग क्र.५६ मधील विविध भागात मोठ्या व्यासाची जलवाहीनी टाकणेसाठी रक्कम रू.५ लक्ष वळती करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.६८ विष्णुनगर येथे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे विष्णुनगर नाल्यास संरक्षित भिंत बांधणेचे काम पूर्ण करण्यांत आले आहे. सदर काम हाती घेतांना खालील नागरीकांचे नाल्यात बाधीत होत असलेले घरे,प्लॉट (मिळकती) तोडून नाल्याच्या दोन्ही बाजूने दगडी भिंत बांधण्याचे काम करण्यात आलेले आहे. सदर काम करतांना खाली नमूद केलेल्या नागरीकांचे प्लॉट/जागा गेलेल्या आहेत. या नागरीकांना नारेगांव येथील विस्थापींतांसाठी नियोजीत रेखाकंनात प्लॉटस् देण्याबाबत दिनांक २०.०९.२००७ चे विषय क्रमांक १०६३/१० अन्वये झालेल्या ठरावाप्रमाणे रेखाकंनातील रस्ते, विज,पाणी,ड्रेनेज या सुविधा पुरविणेसाठी लागणारी रक्कम अधिक शासकीय दरानुसार किमंत धरून प्रतीवर्ग फुट जी किमंत येईल, त्या किमंतीत प्लॉट देण्यासाठी मंजुरी प्राप्त झालेली आहे. तथापी सदरील नागरीकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीबीची व हलाखीची असल्यामूळे ते मंजूर ठरावाप्रमाणे प्लॉटची किमंत भरणा करू शकणार नाहीत.त्यामूळे या प्रकल्पग्रस्त नागरीकांना औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे नारेगांव येथील विस्थापितांसाठी नियोजीत रेखाकंनात,विना मोबदला (मोफत) प्रत्येकी ६००चौ.फुटाचे प्लॉट देण्यांत यावेत. सदर भागातील नाल्यात बाधीत खालील नागरीकांची घरे, प्लॉट गेली आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.बुधाजी नामदेव साळवे | :- | १०`x ३०` चे दोन प्लॉट (एकूण क्षेत्र ६०० वर्गफुट) |
| ०२. | श्री.लक्ष्मण फकिरराव दाभाडे | :- | १०`x ३०` चा एक प्लॉट |
| ०३. | श्री.फकिरराव म्हातारजी तुरेराव | :- | एक खोली (१०`x १०`) तुटली. |
| ०४. | श्रीमती सुनिता कारभारी थोरवे | :- | एक खोली (१०`x १०`) तुटली. |

| | | | |
|---|---|---|---|
| ०५. | श्रीमती गोदावरीबाई शंकरलाल अग्रवाल | :- | २०`x ३०` चा एक प्लॉट |
| ०६. | श्रीमती मुक्ताबाई नामदेव सावते | :- | २०`x ३०` चा एक प्लॉट |
| ०७. | श्रीमती सविता चंद्रभान पडुळे | :- | १०`x १०` ची एक खोली,संडास,बाथरूम व १०`x १०` ची मोकळी जागा |
| ०८. | श्रीमती चंद्रकलाबाई कडुजी गोरडे | :- | १०`x ३०` चा अर्धा प्लॉट + एक खोली |
| ०९. | श्रीमती शांताबाई गचकेश्वर | :- | १०`x ३०` चा अर्धा प्लॉट |
| १०. | श्रीमती कलाबाई नारायण कदम | :- | १०`x ३०` चा अर्धा प्लॉट |
| ११. | श्री.बाबुराव घनशाम लामतुरे | :- | १०`x ३०` चा अर्धा प्लॉट |
| १२. | श्रीमती कांताबाई मधुकर गुडदे | :- | ६`x २०` ची जागा |
| १३. | श्री.संतोष रामभाऊ शंकपाळ (ठाकुर) | :- | १०`x १२` ची खोली+संडास+बाथरूम |
| १४. | श्री.राजेश कचरूसिंग राजपुत | :- | १०`x १२` ची एक खोली |

तरी वरीलप्रमाणे परिस्थिती असल्यामूळै विष्णुनगर येथील नाल्याचे बांधकाम करण्यासाठी वरील १४ नागरीकांना नारेगांव येथील विस्थापितांसाठी नियोजीत रेखाकंन (Layout) मधील प्रत्येकी ६००चौ.फुटाचा प्लॉट विनामोबदला(मोफत) देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजूरीस्तव सादर.

सुचक : सौ.हर्षमाला पाटणी,श्री.सुरजितसिंग सबरवाल अनुमोदक : श्री.रविंद्र लक्ष्मणराव गांगे

मा.महापौर :विषय क्र.९१ मंजूर करण्यात येतो.

यावेळीही सभागृहात गोंधळ चालूच असतो. विविध घोषणा देणेही चालूच असते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६८ विष्णुनगर येथे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे विष्णुनगर नाल्यास संरक्षित भिंत बांधणेचे काम पूर्ण करण्यांत आले असल्यामूळे, व सदर काम हाती घेतांना प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.०१ ते १४ प्रमाणे नागरीकांचे नाल्यात बाधीत होत असलेले घरे, प्लॉट (मिळकती) तोडून नाल्याच्या दोन्ही बाजूने दगडी भिंत बांधण्याचे काम करण्यात आलेले असल्यामूळे,या नागरीकांना नारेगांव येथील विस्थापींतांसाठी नियोजीत रेखाकंनात विनामोबदला (मोफत) प्रत्येकी ६००चौ.फुटाचे प्लॉट देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९२ :**

महाराष्ट्रातील २२ महानगरपालिकांचे लोकसंख्येच्या आधारावर अ,ब,क,आणि ड असे वर्गीकरण करण्यात आले आहे. औरंगाबाद महानगरपालिका ड वर्गात येते.

शासन निर्णय क्र.संकीर्ण-१००५/वर्गीकरण/प्र.क्र.३७९/०५/नवि-२४ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक ४ मे २००६ मधील परिशिष्ट १ नुसार महाराष्ट्रातील महानगरपालिकांचे वर्गीकरण आणि त्या आधारे महानगरपालिका सेवांची प्रशासकीय, लेखा,आणि तांत्रीक सेवा अशी विभागणी करून एकुण ३८ अधिकाऱ्यांच्या पदासाठी आकृतीबंध निश्चित केला आहे. यामध्ये परिशिष्ट २ मध्ये ड वर्गीय महानगरपालिकासाठी अ.क्र.२२ वर शहर अभियंता पद दर्शविले आहे. या पदासाठी १०६५०-१५५०० अशी वेतन श्रेणी दर्शविलेली आहे. ही वेतनश्रेणी कार्यकारी अभियंता संवर्गाची सध्याची वेतन श्रेणी १०६५० ते १५८५० पेक्षाही कमी आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये शहर अभियंता हे पद पुर्वी १२००० ते १६५०० या वेतनश्रेणी मध्ये अधिक्षक अभियंता या संवर्गात अस्तित्वात होते. या पदावर श्री.सी.एस.सोनी हे कार्यरत होते. श्री.सोनी हे नियम वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे हे पद रिक्त झाले असून ४ मे २००६ च्या वरील शासन निर्णयानुसार आता कार्यकारी अभियंता दर्जाचे झाले आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेत सध्या कार्यकारी अभियंत्याची ०३ पदे असून त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिक्षक अभियंता या संवर्गातील वेतनश्रेणी १२००० ते १६५०० मध्ये १ पद आवश्यक आहे. औरंगाबाद शहर हे मराठवाडयाची राजधानी आहे. याठिकाणी शासनाची विविध कार्यालये आहेत. या कार्यालयामध्ये होणाऱ्या विविध बैठका, वरीष्ठ अधिकाऱ्यांशी होणाऱ्या चर्चा वै.साठी कार्यकारी अभियंता दर्जाच्या शहर अभियंत्यास अडचण निर्माण होते. त्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या शहर अभियंता पदी १२००० ते १६५०० हे वेतनश्रेणी करण्यात यावी. आणि हे पद शासनाच्या अधिक्षक अभियंता या संवर्गाच्या बरोबरीचे करण्यात यावे. अशी सर्व अधिकारी,पदाधिकारी आणि स.नगरसेवक यांची भावना आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेची २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या कमी असली तरी आजमीतीस शहराची लोकसंख्या १० लाखापेक्षा जास्त झाली आहे. या लोकसंख्येसाठी करावयाच्या

विकास कामाचा विचार करता अंदाजपत्रकांना तांत्रीक मान्यता देण्यासाठी कार्यकारी अभियंता दर्जाच्या शहर अभियंत्यास अडचण निर्माण होते. औरंगाबाद महानगरपालिकेत असलेल्या ०३ कार्यकारी अभियंत्यामध्ये शहराच्या विकास कामाचा समन्वय ठेऊन विकास कामे परिणाम कारक रित्या होण्यासाठी त्याच बरोबर विभागीय पातळीवरील शासनाच्या विविध कार्यालयाशी समन्वय ठेवण्यासाठी अधिक्षक अभियंता या संवर्गातील (वेतनश्रेणी १२००० ते १६५००) शहर अभियंता, औरंगाबाद महानगरपालिकेत असणे गरजेचे आहे. हे पद अधिक्षक अभियंता दर्जाचे केल्याने महानगरपालिकेवर कोणत्याही स्वरूपाचा जादा आर्थिक बोजा पडणार नाही. कारण सध्याचे कार्यरत कार्यकारी अभियंते रू.१२००० या मुळ वेतनापेक्षा जास्त वेतन घेत आहेत.

तरी औरंगाबाद महानगरपालिकेच्या शहर अभियंता पदाची वेतनश्रेणी १२००० ते १६५०० करणे आणि हे पद अधिक्षक अभियंता या संवर्गात आणणे यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर शहर अभियंता हे पद अधिक्षक अभियंता या संवर्गात रूपांतरीत झाल्यास औरंगाबाद महानगरपालिकेच्या दिनांक १६ मे १९९४ पासून लागू झालेल्या सेवा भरती नियमामध्ये अधिक्षक अभियंता दर्जाच्या शहर अभियंता पदाच्या नेमणूकी संदर्भाने तरतुद नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने नुकत्याच प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका सेवा (नेमणूकीसाठी अर्हता व सेवा भरती) नियम २००७ (प्रारूप) नुसार शहर अभियंता पदाची नेमणूक करण्यात यावी.

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष जेजुरकर,श्री.त्र्यंबक तुपे,डॉ.भागवत कराड,सौ.लता दलाल,
श्री.संजय जगताप, श्री.कचरू श्रीपतराव सोनवणे,श्री.संजय केनेकर,श्री.हिम्मतराव दाभाडे,
श्री.सय्यद खुसरो,श्री.वसंत नरवडे पाटील,श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर,
श्री.खान मुजीब मीर आलम खान,श्रीमती शकुंतला सांडूजी इंगळे,श्री.दिलीप गायकवाड,
श्रीमती सुशिला भगवान रगडे,श्री.कचरूजी मोरे,श्री.सुरजितसिंग सबरवाल,
श्री.भगवान घडमोडे

अनुमोदक : श्री.भाऊसाहेब वाघ,श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.सतिष कटकटे, श्री.प्रशांत देसरडा,
श्री.जावेद कुरैशी,श्री.अ.रशीद खान(मामू),श्री.सिताराम सुरे,
श्रीमती खान मेहरून्निसा खान,श्रीमती मंगला प्रकाश गायकवाड,श्री.रविकांत गवळी,
श्री.सलीम पटेल,श्री.कैसर खान,श्री.सलीम खान श्री.संजय जोशी श्री.काशिनाथ कोकाटे

मा.महापौर :विषय क्र. ९२ मंजूर करण्यात येतो.

सभागृहात स.सदस्यांचे घोषणा देणे चालूच असते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या शहर अभियंता पदाची वेतनश्रेणी अधिक्षक अभियंता या संवर्गात पूर्वीप्रमाणेच वेतनश्रेणी रू.१२००० ते १६५०० करणेस तसेच औरंगाबाद महानगरपालिकेच्या सेवा भरती नियमामध्ये अधिक्षक अभियंता संवर्गात शहर अभियंता पदाची नेमणूकीची तरतूद नसल्याने महाराष्ट्र शासनाने नुकत्याच प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका सेवा (नेमणूकीसाठी अर्हता व सेवा भरती) नियम २००७ (प्रारूप) नुसार शहर अभियंता पदाची नेमणूक करण्यास संबंधीचे नियम लागू करण्यास मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ९३ :</u>**

औरंगाबाद महानगरपालिकेत सध्या तीन कार्यकारी अभियंते कार्यरत आहेत. श्री.डी.पी.कुलकर्णी,श्री.एम.डी.सोनवणे आणि श्री.एस.डी.पानझडे हे या पदावर कार्यरत आहेत. श्री.डी.पी.कुलकर्णी,श्री.एम.डी.सोनवणे हे दोन्ही कार्यकारी अभियंते बी.ई. (सिव्हील असून) श्री.एस.डी.पानझडे हे एम.ई. (सिव्हील) आहेत या तिन्हीही कार्यकारी अभियंत्यांची सेवा/अनुभव कमी अधिक प्रमाणात सारखाच आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेत अधिक्षक अभियंता संवर्गातील शहर अभियंता हे पद दिनांक ३१.१०.२००७ पासून रिक्त झाले आहे. आता हे पद कार्यकारी अभियंता या संवर्गातील रूपांतरीत झाले आहे. या पदावर उपरोक्त तिन्हीही कार्यकारी अभियंत्यामधुन सक्षम आणि पात्रा अभियंत्यांची नेमणूक करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र महानगरपालिका सेवा (नेमणूकीसाठी अर्हता व सेवा भरती) नियम २००७ चे प्रारूप तयार केले आहे. त्याची एक प्रत औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे. यामध्ये पृष्ठ क्र.६७ अ.क्र. ७१ वर गट (अ) अभियांत्रिकी सेवा यामध्ये महानगरपालिका वर्ग

ब,क आणि ड साठी शहर अभियंता या पदाच्या नेमणूकीसाठी अर्हता दर्शविण्यात आलेली आहे. या अर्हतेचे अवलोकन केले असता यामध्ये मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण आणि एम.ई.(Master of Engineering) उमेदवारास प्राधान्य देण्यात यावे. असे स्पष्ट नमुद केले आहे. त्याचबरोबर हे पद एकाकी असल्याने पदोन्नतीने भरण्यास प्राधान्य देण्यात यावे. अशी तरतुद आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेचे सेवा भरती नियम दिनांक १६ मे १९९४ पासून अस्तित्वात आहे. यामध्ये पृष्ठ क्र.३ वर शहर अभियंता पदासाठी जी पात्रता दर्शविण्यात आलेली आहे. ती पाहता सदरचे पद हे कार्यकारी अभियंता संवर्गातील असल्याचे दिसून येते. औरंगाबाद महानगरपालिकेचे शहर अभियंता हे पद अधिक्षक अभियंता दर्जाचे होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने विचार करता महानगरपालिकेच्या सेवा भरती नियमामध्ये अधिक्षक अभियंता दर्जाच्या शहर अभियंता पदासाठीची नेमणूकीची पध्दत आणि नियम अंतर्भूत करण्यात आलेले नाही. त्यामुळे राज्य शासनाने प्रसिध्द केलेले प्रारूप नियम २००७ चा आधार घेण्याशिवाय पर्याय नाही. या नियमानुसार मास्टर ऑफ इंजिनियरींग (एम.ई) असलेल्या उमेदवारास शहर अभियंता पदावर नेमणूकीसाठी प्राधान्य देण्यात यावे. असे म्हटले आहे. त्यानुसार महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या तिन्ही कार्यकारी अभियंत्यापैकी श्री.एस.डी.पानझडे हे या पदासाठी पात्र असल्याचे दिसून येते. तसेच श्री.पानझडे यांचे कार्यकारी अभियंता पदावरील सेवा काळातील गोपनीय अहवालाची प्रतवारी अत्युत्कृष्ट असून त्याबद्दल त्यांना एक अतिरीक्त वेतनवाढ देखिल प्रशासनाने दिली आहे.

वरील बाबीचा विचार करता श्री.एस.डी.पानझडे कार्यकारी अभियंता यांची औरंगाबाद महानगरपालिकेचे शहर अभियंता म्हणून नेमणूक करण्यात यावी.

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष जेजुरकर,श्री.जावेद कुरैशी,श्री.त्र्यंबक तुपे,डॉ.भागवत कराड,
सौ.लता दलाल,श्री.संजय जगताप,श्री.कचरू श्रीपतराव सोनवणे,श्री.संजय केनेकर,
श्री.हिम्मतराव दाभाडे,सौ.मंगला प्रकाश गायकवाड,श्री.वसंत नरवडे पाटील,
श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर,श्री.कैसर खान,श्रीमती शकुंतला सांडूजी इंगळे,
श्री.भगवान घडमोडे,श्री.कचरूजी मोरे,श्री.सुरजितसिंग सबरवाल

अनुमोदक : श्री.भाऊसाहेब वाघ,श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.सतिष कटकटे, श्री.प्रशांत देसरडा,
श्री.अ.रशीद खान (मामू),श्री.मिलींद दाभाडे,श्री.सिताराम सुरे,
श्रीमती खान मेहरून्निसा खान, श्री.सय्यद खुसरो,श्री.रविकांत गवळी, श्री.सलीम पटेल,
श्री.खान मुजीब आलम खान,श्री.दिलीप गायकवाड,श्रीमती सुशिला भगवान रगडे,
श्री.सलीम खान,श्री.संजय जोशी,श्री.काशिनाथ कोकाटे

**संवाद :**

मा.महापौर डायस समोर अनेक स.सदस्य मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर : विषय क्र.९३ मंजूर करण्यात येतो. श्री.एस.डी.पानझडे यांची या पदावर नियुक्ती करण्यात येते. प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेत कार्यरत कार्यकारी अभियंतापैकी श्री.एस.डी.पानझडे यांची शहर अभियंता या पदावर महानगरपालिकेस प्राप्त अधिकारानुसार शहर अभियंता पदनामासह नियुक्ती करण्यास व प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव पाठविण्यास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

(सभागृहात अनेक सदस्य वेगवेगळ्या घोषणा देतात,सभागृहात बराचवेळ गोंधळ चालूच असतो.)

मा.महापौर : सर्व प्रशासकीय व स.सदस्यांचे ऐनवेळचे विषयासह सर्व विषय मंजूर करण्यात येते.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. ९४ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद, प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद शहरास ४०० वर्षांपुर्वीचा इतिहास आहे व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अजिंठा, एलोरा, दौलताबाद किल्ला या जिल्हयातच आहे. यामुळे हे शहर आंतरराष्ट्रीय स्तरावर ऐतिहासिक शहर म्हणून गणना केली जाते.

महानगरपालिका व इनटॅक (INTACH) यांचे विद्यमाने २५.०० कोटींचा मेगा हेरिटेज टूरिस्ट डेस्टिनेशन देश व आंतरराष्ट्रीय महत्वाचा डिपी.आर. तयार करण्यात आलेला आहे, या प्रकल्पाकरीता केंद्र शासनामार्फत आवश्यक निधी उपलब्ध करणेकरीता प्रयत्न करण्यात येतील, तसेच सदर प्रकल्प उभारणी नंतर महानगरपालिकेस उपयुक्त व मौल्यवान (Asset) निर्माण होईल त्यातुन देखभाल केली जाईल.

डि.पी.आर.मंजुरी,निधी उपलब्धतेबाबत केंद्र शासनाशी आवश्यक M.O.U.(Memorundum of Understanding) करणेकरीता आयुक्त महानगरपालिका यांना प्राधिकृत करणेबाबत प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरास ४०० वर्षांपुर्वीचा इतिहास आहे व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अजिंठा, एलोरा, दौलताबाद किल्ला या जिल्हयातच आहे. यामुळे हे शहर आंतरराष्ट्रीय स्तरावर ऐतिहासिक शहर म्हणून गणना केली जाते. महानगरपालिका व इनटॅक (INTACH) यांचे विद्यमाने २५.०० कोटींचा मेगा हेरिटेज टूरिस्ट डेस्टिनेशन देश व आंतरराष्ट्रीय महत्वाचा डि.पी.आर. तयार करण्यात आलेला आहे, या प्रकल्पाकरीता केंद्र शासनामार्फत आवश्यक निधी उपलब्ध करणेकरीता प्रयत्न करण्यात येतील, तसेच सदर प्रकल्प उभारणी नंतर महानगरपालिकेस उपयुक्त व मौल्यवान (Asset) निर्माण होईल त्यातुन देखभाल केली जाईल. डि.पी.आर.मंजुरी,निधी उपलब्धतेबाबत केंद्र शासनाशी आवश्यक M.O.U.(Memorundum of Understanding) करणेकरीता आयुक्त महानगरपालिका यांना प्राधिकृत करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ९५ :</u>**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४,२४५,३१३,३७६,३८३,३८६ नुसार व प्रकरण १८ चे सुचीनुसार जाहिरात/व्यावसायिक परवाना फी आकारण्याचे महानगरपालिकेला अधिकार आहेत. उपरोक्त कायद्यातील तरतुदीची अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिका हद्दीतील दुकाने, व्यापारी अस्थापना, अन्य संस्था इत्यादींनी प्रदर्शित केलेल्या जाहिराती, दुकानाचे फलक, आकाश चिन्हे इत्यादींचे सर्व्हेक्षण करण्यात आलेले असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीनुसार दुकानांसाठी द्यावयाची परवाना फी चे प्रस्तावित दर व दुकानांवरील प्रदर्शित करण्यात येत असलेल्या जाहिरातीच्या प्रस्तावित दराचे विवरण पत्र तसेच परवान्याबाबतचे सर्वसाधारण नियम सोबतप्रमाणे असून प्रस्तावित दरावर विचार विनिमय करण्यासाठी दि.२६.१०.२००७ च्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.११८२/७ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदरील प्रस्तावावर चर्चा होवून प्रस्तावातील अटी शर्ती कमी करून पुढील बैठकीत दुरूस्तीसह ठेवण्यास मान्यता देण्यात आली. सदरील प्रस्तावात दर्शविलेले दर हे राज्यातील इतर महानगरपालिकांच्या दराच्या तुलनेत कमीच प्रस्तावीत केलेले आहे. तसेच ठेवण्यात आलेल्या अटी शर्ती या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील उपरोक्त नमुद कलमांना अनुसरून ठरविण्यात आलेल्या आहेत. करीता सदर प्रस्ताव मंजुरीस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**<u>परवान्याबाबतचे सर्वसाधारण नियम</u>**

१) परवान्याची मुदत एक वर्षापुरती मर्यादीत असुन ती प्रती वर्षी दि.३१ मार्च रोजी संपेल.

२) परवाना ज्या व्यक्तीच्या नावाने दिला असेल अगर धंद्याकरीता वापरावयाच्या ज्या विशिष्ट जागेकरीता दिलेले असेल तेवढया व्यक्तीपुरताच अगर तेवढया जागेपुरताच (हे गृहित धरले जाईल.) तो मर्यादीत राहील.

३) ज्या व्यक्तीच्या नावावर अगर ज्या विशिष्ट जागेकरीता परवाना दिला असेल तो मा.महापालिका आयुक्त यांच्या संमती शिवाय बदलता येणार नाही.

४) ज्या धंद्याकरीता परवाना घेणे जरूर आहे असा कोणताही धंदा एखादा विशिष्ट जागेत चालविण्यास मा.महापालिका आयुक्त यांनी परवानगी दिल्याशिवाय चालविता येणार नाही

५) परवानाधारकास वर निर्दीष्ट केलेल्या मान्य विवक्षित ठिकाणाखेरीज अन्यस्त्र वा इतर सार्वजनिक जागी रस्त्यावर अगर फुटपाथवर काहीही वस्तु ठेवून त्याचा व्यापार अगर तत्संबंधी व्यवहार (करू नये) करता येणार नाही.

६) परवाना शुल्क परवाना मिळाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव परत दिले जाणार नाही. मा.महानगरपालिका आयुक्त अगर त्यांच्या वतीने परवाना शुल्क भरले गेले म्हणजे

संबंधीत इसमास परवाना मिळाला असे नाही. परवाना शुल्क हे दरवर्षी आगाऊ भरण्याचे आहे.परवाना न मिळाल्यास भरलेले शुल्क परत देण्यात येईल.

७) धंदा करण्यास ज्या जागेस परवाना मिळाला असेल ती जागा परवानाधारकाने अगर त्यामार्फत काम पाहणाऱ्या इसमाने महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यास ज्यावेळी जरूर असेल तेव्हा नियमाप्रमाणे केव्हाही तपासण्यास मोकळी ठेवली जाईल.

८) परवाना दिलेल्या ठिकाणी सहज दिसू शकेल अशा जागी परवानाधारकाने परवाना लावला पाहिजे.

९) परवानाधारकास परवान्याच्या मुदतीत धंद्याकरीता जास्त जागा,गोदाम अगर खोल्या लागल्यास त्याकरीता त्यास जादा परवाना मिळण्याकरीता अर्ज करावा लागेल व तो त्यास देण्याचे मान्य झाल्यास त्याकरीता वेळोवेळी ठरविण्यात आलेले शुल्क त्यास भरावे लागेल

१०) परवाना दिल्यानंतर परवाना दिलेली जागा अगर माल परवान्यामध्ये नमुद केल्यापेक्षा जास्त असेल तर अशा जादा जागेबद्दल अगर त्या मालाबद्दल त्या मुदतीकरीता जागा परवाना शुल्क घेऊन जादा परवाना दिला जाईल व हे दोन्ही परवाने पुढील वर्षी जरूर लागल्यास एकत्रित करण्यात येतील.

११) परवाना घेणे जरूर असलेल्या निरनिराळया वस्तु परवानाधारकांच्या व्यवसायानुरूप ठेवल्या जागी असतील आणि त्या जर विक्रीकरीता नसतील तर त्यावर परवाना शुल्क घेतले जाणार नाही.

१२) ज्या व्यापाऱ्यास आपल्या धंद्याच्या परवाना पुन्हा पुढील वर्षाकरीता चालु ठेवावयाचा असेल त्याने त्याकरीता चालु परवान्याची मुदत संपण्यापुर्वी दोन महिने अगोदर मा.महापालिका आयुक्त यांच्याकडे अर्ज केला पाहिजे. त्याप्रमाणे अर्ज न केल्यास त्याबद्दल त्यास खालील प्रमाणे विलंब शुल्क पडेल.

| परवाना फी रूपये | विलंब शुल्क रूपये |
|---|---|
| १ ते ५० | १०.०० |
| ५० च्या वर | २०.०० |

परवान्याचे शुल्क दरवर्षी जानेवारी महिन्यात भरावयाचे आहे.

१३) धंद्याच्या विक्रीमुळे अगर वारस हक्कामुळे जर परवानाधारकाच्या नावात बदल करावयाचा असेल तर त्याकरीता १० रूपये शुल्क घेतले जाईल.

१४) ज्यावेळी परवाना एक वर्षापेक्षा कमी मुदतीचा देण्यात येईल त्यावेळी खालील दराने परवाना शुल्क आकारण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| ०१. | तीन किंवा त्याहून कमी महिन्यासाठी | - वर्षाच्या परवाना शुल्काच्या २५ टक्के |
| ०२. | तीन पेक्षा अधिक व नऊ महिने अखेर | - वर्षाच्या परवाना शुल्काच्या ५० टक्के |
| ०३. | सहापेक्षा अधिक व नऊ महिने अखेर | - वर्षाच्या परवाना शुल्काच्या ७५ टक्के |
| ०४. | नऊ महिन्यापेक्षा अधिक | -संबंध वर्षासाठी असलेले म्हणजे १०० टक्के |

१५) परवान्याची मुदत वाढवून देण्याचे शुल्क सर्वसाधारणपणे संबंध वर्षाचे भरावे लागेल, परंतु एका वर्षाहून कमी मुदतीचा परवाना पाहिजे असेल व त्याप्रमाणे पहिल्या परवान्याची मुदत संपल्यानंतर एक महिन्याच्या आत अर्ज दिला असेल तर परवाना शुल्क कमी मुदतीच्या परवाना शुल्काच्या दराने आकारण्यात येईल.

१६) परवान्याकरीता ग्राहय धरलेल्या धंद्यात जर एकापेक्षा अधिक, परवाने घेणे जरूर आहे.अशा धंद्याच्या क्रिया (सेरिज ऑफ ऑपरेशन) एकाच ठिकाणी चालु असतील तर त्या सर्वांमध्ये ज्यावर सर्वात जास्त परवाना शुल्काची आकारणी होईल त्या धंद्याच्या क्रियेचा (ऑपरेशन्स) परवाना देण्यात येईल आणि त्या परवान्यामध्ये इतर क्रियेसंबंधीच्या अटी नमुद केल्या जातील.

१७) परवान्याच्या मुदतीत काही काळ धंदा तहकुब केला आणि त्यामुळे परवाना काढून घेतला असेल तर परवाना काढून घेतलेल्या मुदतीकरीता परवाना शुल्क परत दिले जाणार नाही.

१८) परवानाधारकास परवान्याच्या धंद्याची जागा रिकामी करावयाची असेल, पोटभाडयाने द्यावयाची असेल अगर ताबा सोडावयाचा असेल तर त्याप्रमाणे आपला इरादा परवानाधारकाने मा.महापालिका आयुक्त यांच्याकडे अर्ज करून ताबडतोब कळविला पाहिजे.

१९) ज्या ठिकाणी निरनिराळया तऱ्हेची गळितांची धान्ये साठविली जात असतील व त्यातच जी कपाशीच बी साठविले असेल तर तो सर्व साठा एकत्रित लक्षात घेऊन एकच परवाना देण्यात येईल व त्या करीता मान्य झालेले परवाना शुल्क वसूल केले जाईल.

२०) ज्यावेळी परवाना शुल्क एक वर्षापेक्षा कमी मुदतीकरीता वसुल करावयाचे असेल आणि ते हिशोबाने जर एक रूपयापेक्षा कमी होत असेल तर त्या बाबतीत कमीत कमी म्हणून एक रूपया फी वसुल केली पाहिजे.

२१) आरोग्य विषयक परवान्यांसाठी अर्ज व त्याबाबतचा पत्र व्यवहार मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांच्या नावे करावा. सर्वसाधारण परवान्यासाठीचा अर्ज व त्याबाबतचा पत्र व्यवहार मा.महापालिका आयुक्त यांच्या नावे करण्यात यावा.

**टिप :- शेडयूल चॅप्टर १८ भाग १ ते भाग ४ सोबत जोडण्यात आले आहे.**

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४,२४५,३१३,३७६,३८३,३८६ नुसार व प्रकरण १८ चे सुचीनुसार जाहिरात/व्यावसायिक परवाना फी आकारण्याचे महानगरपालिकेला अधिकार असल्यामूळे, उपरोक्त कायद्यातील तरतुदीची अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिका हद्दीतील दुकाने, व्यापारी अस्थापना, अन्य संस्था इत्यादींनी प्रदर्शित केलेल्या जाहिराती, दुकानाचे फलक, आकाश चिन्हे इत्यादींचे सर्व्हेक्षण करण्यात आलेले असल्यामूळे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीनुसार दुकानांसाठी द्यावयाची परवाना फी चे प्रस्तावित दर व दुकानांवरील प्रदर्शित करण्यात येत असलेल्या जाहिरातीच्या प्रस्तावित दराचे विवरण पत्र तसेच प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.०१ ते २१ परवान्याबाबतचे सर्वसाधारण नियमाप्रमाणे अंमलबजावणी करण्यास तसेच ठेवण्यात आलेल्या अटी शर्तीनुसार व सोबत जोडलेल्या शेडयूल चॅप्टर १८ भाग १ ते भाग ४ प्रमाणे प्रस्तुत प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, देवइंद्रायणी अथर्व कॉम्प्लेक्स व्हाया सेनानगर पर्यंतच्या १५ मी रूंद रस्त्याचे खडीकरण,मजबूतीकरण करणे, व कल्वर्ट बांधणे. या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००६-२००७ च्या दरसूचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचा अंदाजीत खर्च रू.३४४९४००/- एवढा आहे.

तरी ३४४९४००/- खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, देवइंद्रायणी अथर्व कॉम्प्लेक्स व्हाया सेनानगर पर्यंतच्या १५ मी रूंद रस्त्याचे खडीकरण,मजबूतीकरण करणे, व कल्वर्ट बांधणेच्या कामाचे र.रू.३४४९४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९७ :**

आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विशाल मार्केट, रेल्वे स्टेशन रोड येथे राखून ठेवण्यात आलेल्या जागेत सी.टी.स्कॅन, एम.आर.आय. एक्स-रे, मॅमोग्राफी,सोनोग्राफी व पॅथॉलॉजी लॅब इ.चे डायग्नोस्टीक सेंटर बी.ओ.टी. तत्वावर सुरू करावयाचे आहे. अद्ययावत यांच्या सर्वसाधारण अटी-शर्ती खालील प्रमाणे.

१) म.न.पा.च्या वतीने डायग्नोस्टिक सेंटरसाठी विशाल मार्केट रेल्वे स्टेशन येथे राखून ठेवण्यात आलेली नियोजीत जागा ठेकेदारास/संस्थेस सात वर्षासाठी उपलब्ध करून देण्यात येईल. सदर जागेचे भाडे नाममात्र म्हणजे १/- असतील.

२) ठेकेदार किंवा संस्थेने स्वखर्चाने स्वत:च्या एम.आय.आर. एक्स-रे, मॅमोग्राफी, सोनोग्राफी मशीन तसेच अद्ययावत पॅथॉलॉजी लॅबसाठी लागणारे अत्याधुनिक उपकरणे बसवायची आहेत.

३) डायग्नोस्टिक सेंटर चालविण्यासाठी आवश्यक असणारे सर्व प्रकारचे मनुष्यबळ ठेकेदाराने/संस्थेने उपलब्ध करावयाचे आहे.

४) डायग्नोस्टिक सेंटरकरिता उपकरणा शिवाय इतर लागणारी सर्व प्रकारची साधन सामुग्री उदा.फिल्मस,केमीकल्स इत्यादीचा खर्च संस्था/ठेकेदार यांना करावा लागेल.

५) डायग्नोस्टिक सेंटरमध्ये आवश्यक लागणारे फर्निचर,पार्टीशियन्स व तत्सम बाबी ठेकेदारास/ संस्थेस स्वत:च्या खर्चाने उपलब्ध करून द्यावयाचे आहे.
६) डायग्नोस्टिक सेंटर चालविण्याचा किमान १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
७) डायग्नोस्टिक सेंटरमध्ये म.न.पा. मार्फत लाईट मीटर व पाण्याचा मीटर बसविण्यात येईल. याकरीता येणारा खर्च व विद्युत बिल तसेच पाणी बिल ठेकेदारास / संस्थेस भरावे लागेल.

या डायग्नोस्टिक सेंटरमध्ये रूग्णांसाठी सर्वसाधारण खाजगी व्यावसायीक दरापेक्षा कमी दरात (मा.स्थायी समितीने ठरवलेले दरात) या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. ठेकेदारांनी/संस्थेनी महानगरपालिकेस प्रती रूग्ण किती टक्के रॉयल्टी देतील हे नमुद करायचे असतील, यावर निविदा मंजूर करून ठेकेदार/संस्था ठरविण्यात येतील.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विशाल मार्केट, रेल्वे स्टेशन रोड येथे राखून ठेवण्यात आलेल्या जागेत सी.टी.स्कॅन, एम.आर.आय. एक्स-रे, मॅमोग्राफी,सोनोग्राफी व पॅथॉलॉजी लॅब इ.चे डायग्नोस्टीक सेंटर बी.ओ.टी. तत्वावर प्रस्तूत प्रस्तावातील अ.क्र.०१ ते ०७ अटी शर्तीनुसार सुरू करणेस व याकरीता येणारा खर्च व विद्युत बिल तसेच पाणी बिल ठेकेदारास / संस्थेस भरावे लागेल. तसेच या डायग्नोस्टिक सेंटरमध्ये रूग्णांसाठी सर्वसाधारण खाजगी व्यावसायीक दरापेक्षा कमी दरात (मा.स्थायी समितीने ठरवलेले दरात) या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. ठेकेदारांनी/संस्थेनी महानगरपालिकेस प्रती रूग्ण किती टक्के रॉयल्टी देतील हे नमुद करायचे असतील, यावर निविदा मंजूर करून ठेकेदार/संस्था ठरविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ९८ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, क्रांतीचौक ते पैठणगेट मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे. या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००५-२००६ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.३४,९६,५००/- चे तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पातील नवीन डांबरीकरण या लेखाशिर्षातून करण्यात येणार आहे. सदर कामात ५०० मी.लांब व साधारणतः ७.५० मी. रूंद रस्त्याचे डांबरीकरणाचा समावेश आहे.

तरी सदर कामाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रांतीचौक ते पैठणगेट मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे र.रू.३४,९६,५००/-चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ९९ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७४ अंतर्गत संघर्षनगर व ज्ञानेश्वर कॉलनी मधील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू. २८,९७,२००/- चे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले असून प्रस्तावित रस्त्याची लांबी १७२० मी. व रूंदी सरासरी ७ मी. आहे. या कामाचा खर्च सन २००७-०८ या आर्थिक वर्षात पुनर्डांबरीकरण या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रू.२८,९७,२००/- च्या कामाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७४ अंतर्गत संघर्षनगर व ज्ञानेश्वर कॉलनी मधील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे रक्कम रू. २८,९७,२००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १०० :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सध्या म.न.पा. हद्दीत भारत सरकारने ॲनिमल बर्थ कंट्रोल (डॉग्ज) रूल-२००१ अन्वये मोकाट श्वानांना निर्बिजीकरण व लसीकरणाचे काम चालु असून डिसेंबर २००७ अखेर पर्यंत एकुण म.न.पा.हद्दीत ४०४५ श्वानांची निर्बिजीकरण करण्यात आले आहे.

या व्यतिरीक्त सध्या शहरात असलेले अंदाजे ५००० मोकाट श्वानांना मार्च २००८ अखेर पर्यंत निर्बिजीकरण करण्यासाठी २००७-२००८ सुधारीत अंदाज पत्रकात रू.३० लाखांची वाढीव तरतुद करण्या बद्दलचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. जेणे करून शहरातील सर्व मोकाट श्वानांचे निर्बिजीकरणाचे काम पूर्ण करता येईल. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सध्या म.न.पा. हद्दीत भारत सरकारने ॲनिमल बर्थ कंट्रोल (डॉग्ज) रूल-२००१ अन्वये मोकाट श्वानांना निर्बिजीकरण व लसीकरणाचे काम चालु असून डिसेंबर २००७ अखेर पर्यंत एकुण म.न.पा.हद्दीत ४०४५ श्वानांची निर्बिजीकरण करण्यात आले असल्यामूळे, या व्यतिरीक्त सध्या शहरात असलेले अंदाजे ५००० मोकाट श्वानांना मार्च २००८ अखेर पर्यंत निर्बिजीकरण करण्यासाठी २००७-२००८ सुधारीत अंदाज पत्रकात रू.३० लाखांची वाढीव तरतुद करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२९ अंतर्गत दिल्लीगेट जलकुंभ ते हिनानगर औरंगाबाद टाईम्स कॉलनीतील पूला पर्यंत १००,१५०,२००,२५० व ३०० मि.मी. व्यासाच्या डी.आय.के.-९ जलवाहिन्या टाकावयाच्या आहेत. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २००६-०७ च्या दरसुची नुसार रक्कम रू.२८,४४,५००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखा शिर्षामधुन करण्यात येणार आहे.

करीता अंदाजपत्रक रक्कम रू.२८,४४,५००/- चे मंजूरीस्तव तथा विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२९ अंतर्गत दिल्लीगेट जलकुंभ ते हिनानगर औरंगाबाद टाईम्स कॉलनीतील पूला पर्यंत १००,१५०,२००,२५० व ३०० मि.मी. व्यासाच्या डी.आय.के.-९ जलवाहिन्या टाकावयाच्या रक्कम रू.२८,४४,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०२ :**

दिनांक २९.१२.२००७ रोजी संपन्न झालेल्या माध्यमिक,पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समितीमध्ये विषय क्र.९ अन्वये श्रीमती विद्या श्रीकृष्ण बुलबुले, सहशिक्षिका कें.प्रा.शा. जमवाडी जि.जालना यांना औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये बदली करणेस मंजूरी देण्यांत येवून धोरणात्मक निर्णयासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस केलेली आहे. प्रशासनाचा मुळ प्रस्ताव खालीलप्रमाणे आहे.

**प्रशासनाचा मुळ प्रस्ताव**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती विद्या श्रीकृष्ण बुलबुले,सहशिक्षिका के.प्रा.शा. जामवाडी जि.जालना यांची बदली औरंगाबाद महानगरपालिकामध्ये करणे बाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना यांनी शिफारस केली आहे.

महानगरपालिका औरंगाबाद शिक्षण विभागातील शाळेवर कार्यरत शिक्षकांपैकी जे शिक्षक सेवा निवृत्त, स्वेच्छा निवृत्त, मयत झाले राजीनामा दिल्याने तसेच शिक्षकांमधून काही पदोन्नतीने मुख्याध्यापक पदी पदस्थापना देण्यात आल्यामुळे आणि यावर्षात विद्यार्थी संख्येत वाढ झाल्यामुळे, दोन नविन शाळा सुरू केल्यामुळे मराठी/उर्दु माध्यमाचे एकुण (मराठी २०,उर्दु ५) २५ शिक्षक पदे रिक्त झाली आहेत. सेवानिवृत्त शिक्षकांमधून काही शिक्षक (मराठी/उर्दु) पदे भरणे बाबतची कार्यवाही चालू आहे.

करीता श्रीमती विद्या श्रीकृष्ण बुलबुले,सहशिक्षिका के.प्रा.शा.जामवाडी जि.जालना यांना औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये बदली करण्याच्या कार्यवाहीस्तव संमती देणे बाबत योग्य त्या निर्णयास्तव प्रस्ताव मा.शिक्षण समिति समोर सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती विद्या श्रीकृष्ण बुलबुले,सहशिक्षिका के.प्रा.शा.जामवाडी जि.जालना यांची औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये बदली करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.८५ येथील लेखाशिर्षक बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.८५ मध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे. अर्थसंकल्पातील | प्रभाग क्र.८५ मधील १२ वी योजना शिवाजीनगर येथील सी.एल.-२ व सी.एल.-८ च्या बाजुला असलेल्या |

| | | |
|---|---|---|
| | पृ.क्र.डब्ल्यू २१६ अ.क्र.४१ तरतुद रक्कम ५ लक्ष.१ | महानगरपालिकेच्या खुल्या जागेस संरक्षण भिंत बांधणे-५ लक्ष. |

सुचक : श्री.प्रल्हाद निमगावकर अनुमोदक : श्री.सतिष कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.८५ करीता अर्थसंकल्पात असलेल्या खालीलप्रमाणे कामाचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.८५ मध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यू २१६ अ.क्र.४१ तरतुद रक्कम ५ लक्ष.१ | प्रभाग क्र.८५ मधील १२ वी योजना शिवाजीनगर येथील सी.एल.-२ व सी.एल.-८ च्या बाजुला असलेल्या महानगरपालिकेच्या खुल्या जागेस संरक्षण भिंत बांधणे-५ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, खालील लेखाशिर्षक बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| १ | शिवाजीनगर येथे पथदिवे बसविणेसाठी अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यू २२६ अ.क्र.४२ वर तरतुद रक्कम १० लक्ष | १. शिवाजीनगर येथील ११ वी योजना मध्ये विविध सेक्टर मध्ये उर्जा बचत दिवे बसविणे.२ लक्ष.<br>२. शिवाजीनगर येथील १२ वी योजना मध्ये विविध सेक्टर मध्ये उर्जा बचत दिवे बसविणे.२ लक्ष |
| | | ३. शिवाजीनगर येथील ११ वी योजना मध्ये विविध ठिकाणी केबल दुरूस्ती करणे.२ लक्ष.<br>४. शिवाजीनगर येथील १२ वी योजना विविध ठिकाणी जंक्शन बॉक्स दुरूस्ती व केबल कोपींग अर्थींग करणे. २ लक्ष.<br>५. ११ वी योजना व १२ वी योजना येथे विविध ठिकाणी पॅनलचे काम करणे २ लक्ष. |

सुचक : श्री.प्रल्हाद निमगांवकर अनुमोदक : श्री.विजय खुडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पातील खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| १ | शिवाजीनगर येथे पथदिवे बसविणेसाठी अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यू २२६ अ.क्र.४२ वर तरतुद रक्कम १० लक्ष | ६. शिवाजीनगर येथील ११ वी योजना मध्ये विविध सेक्टर मध्ये उर्जा बचत दिवे बसविणे.२ लक्ष.<br>७. शिवाजीनगर येथील १२ वी योजना मध्ये विविध सेक्टर मध्ये उर्जा बचत दिवे बसविणे.२ लक्ष |
| | | ८. शिवाजीनगर येथील ११ वी योजना मध्ये विविध ठिकाणी केबल दुरूस्ती करणे.२ लक्ष.<br>९. शिवाजीनगर येथील १२ वी योजना विविध ठिकाणी जंक्शन बॉक्स दुरूस्ती व केबल कोपींग अर्थींग करणे. २ लक्ष.<br>१०. ११ वी योजना व १२ वी योजना येथे विविध ठिकाणी पॅनलचे काम करणे २ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९५ पदमपुरा मधील खालील कामासाठी अर्थसंकल्पात तरतुद दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्षक बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील तरतुद काम | नविन सुधारीत काम |
|---|---|---|
| १<br><br><br>२ | पृ.क्र.डब्ल्यू २८ अ.क्र.३६ वर नंददिप सो.उद्यान विकसीत करणेसाठी रू.५० हजार ची तरतुद करण्यात आली आहे.<br>पृ.क्र.डब्ल्यू १३४ अ.क्र.४ महावीर चौक ते रेल्वेस्टेशन रस्त्यावर हनुमान मंदीर समोर पदमपुरा येथे ६०० | वार्ड क्र.९५ पदमपुरा येथील नविन वस्तीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविण्यासाठी ४.८० लक्ष रू.वळती करण्यात यावे व सदर काम पुतळे खरेदी व दुरूस्ती या शिर्षकामध्ये समावेश करून करण्यात |

| | | |
|---|---|---|
| | मि.मि.व्यासाची आर.सी.सी.पाईप लाईन टाकणे २.५ लक्ष. | यावे. |
| ३ | पृ.क्र.डब्ल्यू १३४ अ.क्र.५ शिल्पनगर भागात जमा होणारे पावसाचे पाणी जाण्यासाठी ६०० मि.मि.व्यासाची आर.सी.सी. स्ट्रॉम वाटर पाईप लाईन टाकणे. १.८ लक्ष | |

सुचक : श्री.गजानन बारवाल

अनुमोदक :श्री.संजय शिरसाट, सौ.अल्पा जैन, सौ.अनिता घोडेले

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९५ पदमपुरा मधील खालील कामासाठी अर्थसंकल्पात असलेल्या तरतुदीचे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील तरतुद काम | नविन सुधारीत काम |
|---|---|---|
| १ | पृ.क्र.डब्ल्यू २८ अ.क्र.३६ वर नंददिप सो.उद्यान विकसीत करणेसाठी रू.५० हजार ची तरतुद करण्यात आली आहे. | वार्ड क्र.९५ पदमपुरा येथील नविन वस्तीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविण्यासाठी ४.८० लक्ष रू.वळती करण्यात यावे व सदर काम पुतळे खरेदी व दुरूस्ती या शिर्षकामध्ये समावेश करून करण्यात यावे. |
| २ | पृ.क्र.डब्ल्यू १३४ अ.क्र.४ महावीर चौक ते रेल्वेस्टेशन रस्त्यावर हनुमान मंदीर समोर पदमपुरा येथे ६०० मि. मि.व्यासाची आर.सी.सी.पाईपलाईन टाकणे २.५ लक्ष. | |
| ३ | पृ.क्र.डब्ल्यू १३४ अ.क्र.५ शिल्पनगर भागात जमा होणारे पावसाचे पाणी जाण्यासाठी ६०० मि.मि.व्यासाची आर.सी.सी. स्ट्रॉम वाटर पाईप लाईन टाकणे. १.८ लक्ष | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १०६ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८६ अंतर्गत विविध विकास कामे करणे अत्यंत आवश्यक आहे. खालील अर्थसंकल्पीय लेखाशिर्षक बदलुन विकास काम करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीतून सादर करणे बाबत.

वार्ड क्र.८६ येथील पान क्र.डब्ल्यू ८ अ.क्र.१ मधील सुलभ शौचालय बांधणे त्यातील ५ लाखापैकी ३ लाख रू.गादीया विहार ते दर्गारोड,डिपी.रोड, वरील विहीरीवर स्लॅप टाकणे बाबत.

सुचक : श्री.प्रल्हाद गणपत निमगांवकर अनुमोदक :सौ.वंदना प्रकाश खंदारे

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८६ करीता अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यू ८ अ.क्र.१ मधील सुलभ शौचालय बांधणे यातील र.रू.५.०० लाखापैकी र.रू.३.०० लाख गादीया विहार ते दर्गारोड,डिपी.रोड, वरील विहीरीवर स्लॅप टाकणे करीता लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १०७ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एस.बी.कॉलनी येथे आर.सी.सी.पुल बांधणे करीता माझ्या वार्ड क्र. (३७) अंतर्गत खालील कामांची रक्कम पुल बांधणेच्या कामाकरीता वळती करण्यात यावे ही विनंती (अर्थसंकल्प २००७-०८ मधुन)

१. वार्ड क्र.३७ एस.बी.कॉलनी पुलाची दुरूस्ती करणे - ५ लक्ष.
(पृ.क्र.W-१७९ अ.क्र.५)

२. वार्ड क्र.३७ स्वातंत्र कॉलनी येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे-५ लक्ष
(पृ.क्र.W-१८६ अ.क्र.२९)

३.पैठण गेट पार्कीग येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे-४ लक्ष.
(वार्ड (ड) पृ.क्र.W-१२४/अ.क्र.५०)

४.प्र.क्र.३७ अलफ खान यांचे गल्लीत पेव्हींग ब्लॉक बसविणे - १ लक्ष.
<u>(वार्ड (ड) पृ.क्र.W-१२४/ अ.क्र.५१)</u>

**एकुण :- १५ लक्ष**

सुचक : श्री.वसंत नरवडे पाटील

अनुमोदक : डॉ.आशा बिनवडे, श्रीमती जयश्री किवळेकर, श्री.रशिद खान(मामु)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एस.बी.कॉलनी येथे आर.सी.सी.पुल बांधणे करीता वार्ड क्र. (३७) करीता अर्थसंकल्प २००७-२००८ मध्ये खालीलप्रमाणे असलेल्या कामाची तरतूद वळती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. (अर्थसंकल्प २००७-०८ मधुन)

१. वार्ड क्र.३७ एस.बी.कॉलनी पुलाची दुरूस्ती करणे - ५ लक्ष.
(पृ.क्र.W-१७९ अ.क्र.५)
२. वार्ड क्र.३७ स्वातंत्र कॉलनी येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे-५ लक्ष
(पृ.क्र.W-१८६ अ.क्र.२९)
३.पैठण गेट पार्कीग येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे-४ लक्ष.
(वार्ड (ड) पृ.क्र.W-१२४/अ.क्र.५०)
४.प्र.क्र.३७ अलफ खान यांचे गल्लीत पेव्हींग ब्लॉक बसविणे - १ लक्ष.
(वार्ड (ड) पृ.क्र.W-१२४/ अ.क्र.५१)

**एकुण :- १५ लक्ष.** वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प २००७-२००८ मध्ये
लेखाशिर्षक : १. सुलभ शौचालय-पान क्रमांक डब्ल्यु-६६ अ.क्र.१ तरतुद ०.५० लक्ष.
२. कॉंक्रीट रस्ते शहरी भाग पान क्रमांक डब्ल्यु-६७ अ.क्र.१५ तरतुद ६.५० लक्ष.
३. भांडवली कामे जलनि:सारण-पा.क्र.डब्ल्यू-६९ अ.क्र.१० तरतुद १.५० लक्ष.

उपरोक्त ८.५० लक्ष तरतुदीमधुन वार्ड क्रमांक ३२ मधील दैनंदिन ड्रेनेज लाईन देखभाल दुरूस्ती, रस्ते दुरूस्ती व इतर अत्यावश्यक कामे करणे करीता तरतुद वापरणेस्तव परवानगी देण्याची कृपा करावी ही विनंती.

सुचक : श्री.जावेद हसन खान अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्रीमती खान मेहरून्नीसा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००७-२००८ मध्ये खालीलप्रमाणे असलेल्या तरतूदीचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

१. सुलभ शौचालय-पान क्रमांक डब्ल्यु-६६ अ.क्र.१ तरतुद ०.५० लक्ष.
२. कॉंक्रीट रस्ते शहरी भाग पान क्रमांक डब्ल्यु-६७ अ.क्र.१५ तरतुद ६.५० लक्ष.
३. भांडवली कामे जलनि:सारण-पा.क्र.डब्ल्यू-६९ अ.क्र.१० तरतुद १.५० लक्ष. **याऐवजी** र.रू.८.५० लक्ष तरतुदीमधुन वार्ड क्रमांक ३२ मधील दैनंदिन ड्रेनेज लाईन देखभाल दुरूस्ती, रस्ते दुरूस्ती व इतर अत्यावश्यक कामे करणे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२८ नेहरूनगर येथील ८० फुट रोड वर अनाधिकृत अतिक्रमण रोडवर झालेले आहे तसेच कटकट गेट ते पोलीस मेस पर्यंत या रोडवर ही अतिक्रमण झालेले आहे. दोन्ही ठिकाणी कोणतीही ही अप्रिय घटना घडल्यास येथे अग्निशमन विभागाची गाडी सुध्दा जाऊ शकत नाही, व भविष्यात प्राणहानी सुध्दा होऊ शकते. सदरील घटना होऊ नये म्हणुन अतिक्रमण काढणे अत्यंत गरजेचे आहे.प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती खान मेहरून्नीसा हमीद खान अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२८ नेहरूनगर येथील ८० फुट रोडवर अनाधिकृत झालेले अतिक्रमण तसेच कटकट गेट ते पोलीस मेसपर्यंत झालेले अतिक्रमण काढणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००८-२००९ मध्ये दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत वार्ड क्र.६७ मधील बौध्दनगर,नाथनगर,शिवशंकर कॉलनी,उत्तमनगर येथे नागरीक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी या भागातील अंतर्गत रस्ते तयार करणे आवश्यक असुन उक्त भागात सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकीय रक्कम रू.५० लक्ष तरतुद करून कॉंक्रेटींग रस्ते तयार करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक:श्री.रविंद्र लक्ष्मणराव गांगे
अनुमोदक:श्री.विजय खुडे,श्री.सतिष कटकटे,श्री.संतोष खेंडके पाटील

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००८-२००९ मध्ये दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत वार्ड क्र.६७ मधील बौध्दनगर,नाथनगर,शिवशंकर कॉलनी,उत्तमनगर येथे कॉंक्रीट रस्ते तयार करणेकरीता सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात र.रू.५० लक्ष आर्थिक तरतूद उपलब्ध करून देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नागरी भागातील दलित वस्त्यांना पाणी पुरवठयाची सोय उपलब्ध करणेसाठी वार्ड क्र.८० अंबिकानगर मुकूंदवाडी येथे १००,१५० आणि २०० एम एम क्यु डी आय-के ७ जलवाहिनी टाकणे सविस्तर अंदाजपत्रक रू.३१,७५,७८०/- तयार करून शासन निर्देशानुसार सविस्तर प्रस्ताव शासनाकडे पाठवलेला होता. व त्यास मान्यता देऊन सदर कामी ३१,७५,७८०/- चा धनादेश मनपाकडे वर्ग केला असून काम प्रगती पथावर आहे.

सदरील कामासाठी लोकवर्गणी-महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र.नादव-२००६/पापुयो/अनुदान/प्र.क्र.४४४/पापु-२४ मंत्रालय मुंबई दिनांक ३० मार्च २००७ अन्वये नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजने अंतर्गत घ्यावयाच्या कामा करीता नागरी स्वराज्य संस्थांना ९० टक्के अनुदान आणि १० टक्के लोकवर्गणी असा वित्तीय आकृती-बंध विहीत करण्यात आलेला आहे.

या कामासाठी शासन निर्देशानुसार लोक वर्गणीचा दहा टक्के रक्कम ३,१७,५७८/- रू.सह १०० टक्के रकमेसह अनुदान मनपास उपलब्ध झालेले आहे करीता अंदाजपत्रकाच्या १० टक्के लोकवर्गणी रू.३,१७,५७८/- भरूण घेण्याची आवश्यकता नाही कारण मनपावर काहीही बोजा नाही.

करीता प्रस्ताव मान्यतेस सादर.

सुचक : श्री.नारायण तिलोकचंद कुचे अनुमोदक : श्री.भगवान देविदास घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागरी भागातील दलित वस्त्यांना पाणी पुरवठयाची सोय उपलब्ध करणेसाठी वार्ड क्र.८० अंबिकानगर मुकूंदवाडी येथे १००,१५० आणि २०० एम एम क्यु डी आय-के ७ जलवाहिनी टाकणेचे काम प्रगती पथावर असल्यामूळे,सदरील कामासाठी लोकवर्गणी-महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र.नादव-२००६/पापुयो/अनुदान/प्र.क्र.४४४/ पापु-२४ मंत्रालय मुंबई दिनांक ३० मार्च २००७ अन्वये नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा योजने अंतर्गत घ्यावयाच्या कामा करीता नागरी स्वराज्य संस्थांना ९० टक्के अनुदान आणि १० टक्के लोकवर्गणी असा वित्तीय आकृती-बंध विहीत करण्यात आलेला असल्यामूळे, तसेच या कामासाठी शासन निर्देशानुसार लोक वर्गणीचा दहा टक्के रक्कम ३,१७,५७८/- रू.सह १०० टक्के रकमेसह अनुदान मनपास उपलब्ध झालेले असून अंदाजपत्रकाच्या १० टक्के लोकवर्गणी रू.३,१७,५७८/- भरूण न घेणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला बुढ्ढीलैन येथील चौकास स्व.अजीज खुसरो (संस्थापक दैनिक औरंगाबाद टाईम्स) हे औरंगाबाद शहराच्या विकासासाठी आपल्या दैनिक वर्तमान पत्रातुन कौतुकास्पद कार्य केलेले आहे त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ **बुढ्ढीलैन चौकास स्व. अजीज खुसरो** असे नांव देण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.जावेद हसन खान, श्री.अब्दुल रशिद खान (मामु), श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
अनुमोदक : श्रीमती खान मेहरून्निसा, श्री.मिलींद दाभाडे, श्री.नासेर नाहदी,
श्री.हाजी शेरखान, श्रीमती लक्ष्मी शंकर आशन्ना

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला बुढ्ढीलैन येथील चौकास स्व.अजीज खुसरो (संस्थापक दैनिक औरंगाबाद टाईम्स)असे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९८ नक्षत्रवाडी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W | नाथपुरम येथे समाज मंदीर बांधणे - १०.०० लक्ष. | १. नाथपुरम येथे बॅडमींटन हॉल बांधणे - १५.०० लक्ष. |
| W१८५/२३ | वार्ड क्र.९८ नाथपुरम येथे श्री गरड यांच्या घरापासून ते नाथपुरम-२ ला जोडणाऱ्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे - ५.०० लक्ष. | |

सुचक : सौ.अनिता नंदकुमार घोडेले अनुमोदक : श्री.गजानन बारवाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९८ नक्षत्रवाडी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W | नाथपुरम येथे समाज मंदीर बांधणे - १०.०० लक्ष. | १. नाथपुरम येथे बॅडमींटन हॉल बांधणे - १५.०० लक्ष. |
| W१८५/२३ | वार्ड क्र.९८ नाथपुरम येथे श्री गरड यांच्या घरापासून ते नाथपुरम-२ ला जोडणाऱ्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे - ५.०० लक्ष. | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प सन २००७-२००८ मधील पान क्र.डब्ल्यू-६९ अ.क्र.११ जलनि:सारण कामे करणे यासाठी तरतुद रक्कम रूपये १.७५ लाख चे काम करणे ऐवजी वार्ड क्रमांक १० मध्ये रस्ते व पेव्हर ब्लॉक फुटकळ कामे करणेस्तव १.७५ लाख वापरणे करीता परवानगी द्यावी ही विनंती.

सुचक :श्री.संजय जगताप अनुमोदक : श्री.सलीम खान यासीन खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प सन २००७-२००८ मधील पान क्र.डब्ल्यू-६९ अ.क्र.११ जलनि:सारण कामे करणे यासाठी तरतुद रक्कम रूपये १.७५ लाख चे काम करणे ऐवजी वार्ड क्रमांक १० मध्ये रस्ते व पेव्हर ब्लॉक फुटकळ कामे करणेस्तव १.७५ लाख वळती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८४ रस्ते देखभाल दुरूस्ती करणेसाठी पा.क्र.१४० अ.क्र.५ रू.दोन लाख बाकी रकमेतून जलनि:सारण व रस्ते देखभाल दुरूस्तीचे फुटकळ कामे करणे.

सुचक : श्री.शशांक दामोधर विसपुते अनुमोदक : श्री.कैलास लक्ष्मणराव गायकवाड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८४ रस्ते देखभाल दुरूस्ती करणेसाठी पा.क्र.१४० अ.क्र.५ रू. दोन लाख बाकी रकमेतून जलनि:सारण व रस्ते देखभाल दुरूस्तीचे फुटकळ कामे करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महिला बालकल्याण समितीचे अधिकार व कामकाजाबाबत इतर राज्यात कशाप्रकारे काम चालते यादृष्टीने दिल्ली व आग्रा महानगरपालिकामध्ये अभ्यासदौरा आयोजित करणे आहे. त्यात सभापती, उपसभापती व संबंधित समितीचे सर्व सदस्य उपस्थित राहू ईच्छितात. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्रीमती मिराताई शिंदे, सौ.रजनीताई जोशी अनुमोदक : सौ.शोभा हरीशचंद्र मिटकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सभापती, उपसभापती व संबंधित समितीचे सर्व सदस्य महिला बालकल्याण समिती यांचा दिल्ली व आग्रा महानगरपालिकामध्ये अभ्यासदौरा आयोजित करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प सन २००७-२००८ लेखाशिर्षक १. खुल्या गटारी बांधणे-पान क्रमांक डब्ल्यू-७४ अ.क्र.१८ तरतुद ३.५० लक्ष.

उपरोक्त ३.५० लक्ष तरतुदीमधुन वार्ड क्रमांक १० अंतर्गत पेव्हरब्लॉक बसविणे व इतर अत्यावश्यक कामे करणे करीता तरतुद वापरणेस्तव परवानगी देण्याची कृपा करावी ही विनंती.

सुचक : श्री.सलीम खान यासीन खान अनुमोदक :श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.सलीम पटेल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प सन २००७-२००८ लेखाशिर्षक १. खुल्या गटारी बांधणे-पान क्रमांक डब्ल्यू-७४ अ.क्र.१८ तरतुद ३.५० लक्ष तरतुदीमधुन वार्ड क्रमांक १० अंतर्गत पेव्हरब्लॉक

बसविणे व इतर अत्यावश्यक कामे करणे करीता तरतुद वळती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद येथे ५३ वी राष्ट्रीय शालेय कुस्ती स्पर्धा ७ ते १० फेब्रुवारी २००८ या काळात आयोजित करण्यात येत आहे या स्पर्धात भारतातुन ३५० खेळाडू सहभागी होणार आहे. सदरील स्पर्धा औरंगाबाद शहरात होत असल्याने आपल्या महानगरपालिके तर्फे या स्पर्धेचे आयोजनास रक्कम रूपये ५.०० लाखाची आर्थिक मदत करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.अ.साजेद अ.सत्तार

अनुमोदक : श्री.सलीम खान, श्री.सलीम पटेल, श्री.हिम्मतराव दाभाडे, श्री.नासेर नाहदी श्री.मिलींद दाभाडे,श्री.हाजी शेरखान,श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय,सौ.संगिता जाधव, सौ.खंदारे वंदना प्रकाश, श्री.मो.जावेद मो.इसाक, श्री.सुरजितसिंग सबरवाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद येथे ५३ वी राष्ट्रीय शालेय कुस्ती स्पर्धा ७ ते १० फेब्रुवारी २००८ या काळात आयोजित करण्यात येत आहे या स्पर्धात भारतातुन ३५० खेळाडू सहभागी होणार असल्यामूळे,महानगरपालिकेतर्फे या स्पर्धेचे आयोजनास रक्कम रूपये ५.०० लाख आर्थिक मदत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००८-२००९ मध्ये दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत वार्ड क्र.७१ न्यायनगरमधील नागरीक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी या भागातील अंतर्गत रस्ते तयार करणे आवश्यक असुन उक्त भागात सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात अंदाज पत्रकीय रक्कम रू.५० लक्ष तरतुद करून कॉंक्रेटींग रस्ते तयार करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील

अनुमोदक : श्री.विजय खुडे, श्री.सतिष कटकटे, श्री.रविंद्र लक्ष्मणराव गांगे, श्री.प्रल्हाद निमगावकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००८-२००९ मध्ये दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत वार्ड क्र.७१ न्यायनगरमधील अंतर्गत रस्ते तयार करणेकरीता सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात अंदाज पत्रकीय रक्कम रू.५० लक्ष तरतुद करून कॉंक्रेटींग रस्ते तयार करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.४५ मधील हत्तेसिंगपुरा सईदा मस्जिद जवळील जागा विकसीत करण्याच्या कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,९९,८८२/- चे अंदाजपत्रक तयार करून रितसर निविदा कार्यवाही अंती मंजुर गुत्तेदार यांच्या कडून काम सुरू करण्यात आले असता विकास करावयाचा जागेमध्ये वाद निर्माण झाल्याने काम अर्धवट स्थितीत मागील दोन वर्षा पासून बंद आहे. सदर कामासाठीचा निधी दोन वर्षा पासून तसाच पडून असल्याने प्रभागातील इतर विकास कामासाठी निधी उपलब्ध नसल्याने यास कामाच्या गुत्तेदाराकडून कामातील उर्वरित तरतुदी मधुन प्रभागातील मनपाच्या मंजुर रेखांकित यशोधरा कॉलनी खुल्या जागेत पेव्हर ब्लॉक बसून विकास काम करून घेण्यास प्रभागातील निधीचा वापर करता येऊन विकास कामे करता येईल.

करीता वरील कामासाठीची साईट बदलुन प्रभागातीलच यशोधरा कॉलनी या मनपाच्या मंजुर रेखांकित खुल्या जागेत विकास कामे करण्याच्या प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.हाजी शेरखान अब्दुल रहेमान खान अनुमोदक :श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.४५ मधील हत्तेसिंगपुरा सईदा मस्जिद जवळील जागा विकसीत करण्याच्या कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,९९,८८२/- चे अंदाजपत्रक तयार करून रितसर निविदा कार्यवाही अंती मंजुर गुत्तेदार यांच्या कडून काम सुरू करण्यात आले असता विकास करावयाचा जागेमध्ये वाद निर्माण झाल्याने काम अर्धवट स्थितीत मागील दोन वर्षा पासून बंद आहे. सदर कामासाठीचा निधी दोन वर्षा पासून तसाच पडून असल्याने प्रभागातील इतर विकास कामासाठी निधी उपलब्ध नसल्याने याच कामाच्या गुत्तेदाराकडून कामातील उर्वरित तरतुदी मधुन

प्रभागातील मनपाच्या मंजुर रेखांकित यशोधरा कॉलनी खुल्या जागेत पेव्हर ब्लॉक बसविणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.८७ उल्कानगरी येथे विविध विकास कामासाठी खालील प्रमाणे तरतुदींचे लेखाशिर्ष बदलणे

| पान क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नवीन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| W२०२ | हिरण्यनगर ओपन स्पेस विकास करणे रू.३ लाख | प्रभाग क्र.८७ उल्कानगरी येथे पाण्याची पाईप लाईन टाकणे रू.१.५० लाख |
| W२०२ | सहयोग नगर उद्यान विकसीत करणे रू.५ लाख | प्रभाग क्र.८७ उल्कानगरी येथे डांबरीकरण करणे रू.३.५० लाख |
| W२२८ | श्रीनगर येथील उद्यान विकसीत करणे रू.४ लाख | |
| W१८५ | हिरण्यनगर येथील जागा विकसित करणे रू.३ लाख | उल्कानगरी प्र.क्र.८७ येथे विकास कामे करणे रू.१०.०० करणे |

सुचक : सौ.अंजली कोंडेकर अनुमोदक :डॉ.भागवत कराड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.८७ उल्कानगरी येथे विविध विकास कामासाठी खालील प्रमाणे तरतुदींचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| पान क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नवीन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| W२०२ | हिरण्यनगर ओपन स्पेस विकास करणे रू.३ लाख | प्रभाग क्र.८७ उल्कानगरी येथे पाण्याची पाईप लाईन टाकणे रू.१.५० लाख |
| W२०२ | सहयोग नगर उद्यान विकसीत करणे रू.५ लाख | प्रभाग क्र.८७ उल्कानगरी येथे डांबरीकरण करणे रू.३.५० लाख |
| W२२८ | श्रीनगर येथील उद्यान विकसीत करणे रू.४ लाख | |
| W१८५ | हिरण्यनगर येथील जागा विकसित करणे रू.३ लाख | उल्कानगरी प्र.क्र.८७ येथे विकास कामे करणे रू.१०.०० करणे |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९८ नक्षत्रवाडी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खाली दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पानं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W१६१/८ | प्रभाग क्र.९८, अंतर्गत स्मशान भुमि विकसीत करणे.- ५.०० लक्ष | आयुर्वेदिक उद्यान जवळील महानुभव पंथीय स्मशान भुमि व मुस्लिम बांधव कब्रस्थान कडे जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे बाबत. - ५ लक्ष |

सुचक : सौ.अनिता नंदकुमार घोडेले अनुमोदक : श्री.गजानन बारवाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९८ नक्षत्रवाडी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खाली दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पानं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W१६१/८ | प्रभाग क्र.९८, अंतर्गत स्मशान भुमि विकसीत करणे.- ५.०० लक्ष | आयुर्वेदिक उद्यान जवळील महानुभव पंथीय स्मशान भुमि व मुस्लिम बांधव कब्रस्थान कडे जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे बाबत. - ५ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु-१९ वरील अ.क्र.२७ वर शहरातील विविध वाहतूक बेटाची देखभाल व दुरूस्ती करणे करीता र.रू.२५.०० लक्ष तरतूद करण्यांत आलेली आहे.

सदरील रक्कमेतून र.रू.५.०० लक्ष रक्कम कोकणवाडी येथील पुण्यश्लोक अहील्यादेवी होळकर यांचा पुतळा चिकलठाणा येथील महानगरपालिकेच्या शाळेसमोरील चौकात बसविण्याकरीता खर्च करण्यात यावी करीता उपरोक्त प्रमाणे रक्कम वळती करणेस मंजूरी देण्यात यावी,करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.भाऊसाहेब वाघ अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु-१९ वरील अ.क्र.२७ वर शहरातील विविध वाहतूक बेटाची देखभाल व दुरूस्ती करणे करीता र.रू.२५.०० लक्ष असलेल्या तरतूदीमधून र.रू.५.०० लक्ष कोकणवाडी येथील पुण्यश्लोक अहील्यादेवी होळकर यांचा पुतळा चिकलठाणा येथील महानगरपालिकेच्या शाळेसमोरील चौकात बसविण्याकरीता सदरील रक्कम वळती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १२४ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प २००७-०८ मधील

<table>
<tr><th>अर्थसंकल्प पा नं.</th><th>कामाचे नांव</th><th>सुधारीत कामाचे नांव</th></tr>
<tr><td>पृ.क्र.W२११</td><td>नाला ट्रेनिंग कामे अ.क्र.८<br>वार्ड क्र.१७ अलका हौ.ते फरशी मैदान नाला चॅनेलिंग करून संरक्षित भिंत बांधणे (१० लक्ष)</td><td rowspan="4">वार्ड क्र.१७ एन-९ मधील नाला चॅनेलिंग करून संरक्षित भिंत बांधणे करीता (१४.८० लक्ष)</td></tr>
<tr><td>पृ.क्र. ७६</td><td>बागा देखभाल दुरूस्ती (अ.क्र.७)<br>वार्ड क्र.१७ दिपनगर जॉगींग टँक शेजारी लॉन विकसित करण्यासाठी फेन्सिंग करणे (२.३० लक्ष)</td></tr>
<tr><td>पृ.क्र. ८२</td><td>(अनुक्रमांक ६) वार्ड क्र.१७ एन-११ बी १२६ ते १६३ अंतर्गत रस्ता तयार करणे (१ लक्ष)</td></tr>
<tr><td>पृ.क्र. ८२</td><td>(अनुक्रमांक ७) भारतमाता हौसिंग येथे खडीकरण पेव्हींग करणे (१.५० लक्ष.)</td></tr>
</table>

वरील चारही कामा ऐवजी वार्ड क्रमांक १७ एन-९ मधील नाला चॅनेलिंग करून संरक्षित भिंत बांधणे करीता १४.८० लक्षची तरतुद करण्यात यावी. प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात येत आहे.

सुचक : श्री.महेश माळवतकर अनुमोदक : श्री.सिताराम सुरे

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००७-०८ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

<table>
<tr><th>अर्थसंकल्प पा नं.</th><th>कामाचे नांव</th><th>सुधारीत कामाचे नांव</th></tr>
<tr><td>पृ.क्र.W२११</td><td>नाला ट्रेनिंग कामे अ.क्र.८<br>वार्ड क्र.१७ अलका हौ.ते फरशी मैदान नाला चॅनेलिंग करून संरक्षित भिंत बांधणे (१० लक्ष)</td><td rowspan="4">वार्ड क्र.१७ एन-९ मधील नाला चॅनेलिंग करून संरक्षित भिंत बांधणे करीता (१४.८० लक्ष)</td></tr>
<tr><td>पृ.क्र. ७६</td><td>बागा देखभाल दुरूस्ती (अ.क्र.७)<br>वार्ड क्र.१७ दिपनगर जॉगींग टँक शेजारी लॉन विकसित करण्यासाठी फेन्सिंग करणे (२.३० लक्ष)</td></tr>
<tr><td>पृ.क्र. ८२</td><td>(अनुक्रमांक ६) वार्ड क्र.१७ एन-११ बी १२६ ते १६३ अंतर्गत रस्ता तयार करणे (१ लक्ष)</td></tr>
<tr><td>पृ.क्र. ८२</td><td>(अनुक्रमांक ७) भारतमाता हौसिंग येथे खडीकरण पेव्हींग करणे (१.५० लक्ष.)</td></tr>
</table>

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १२५ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७० मधील खालील लेखाशिर्षक बदलण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव ठेवण्यात यावा, ही विनंती.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील काम | सुधारीत काम |
|---|---|---|
| १ | पृ.क्र.डब्ल्यू १९७ अ.क्र.५२ वर वार्ड क्र.७० गजानन मंदिर चौकात हायमास्ट लावणे ३ लक्ष | वार्ड क्र.७० मध्ये<br>१. केबल कोपींग २५ हजार<br>२.पोल बॉक्स बसवणे २५ हजार<br>३. उर्जा बचत फिटींग लावणे-२५ हजार<br>४. पॅलन दुरूस्ती करणे-२५ हजार<br>५. मेटल हायलाईट लावणे-२५ हजार<br>६. नादुरूस्त केबल बदलणे-२५ हजार<br>७. इमारतीत विद्युत व्यवस्था करणे-२५ हजार<br>८. पोल शिफटींग करणे-२५ हजार<br>९. विविध पोलला अर्थींग करणे-२५ हजार<br>१०. विद्यानगर मध्ये उर्जा बचत फिटींग |

| | | |
|---|---|---|
| | | बसविणे-२५ हजार<br>११. छत्रपतीनगर मध्ये उर्जा बचत फिटींग बसविणे-२५ हजार<br>१२. छत्रपतीनगर सभागृह परिसरात पोलसह फिटींग बसविणे |

सुचक : श्री.विजय खुडे अनुमोदक : श्री.सतिष कटकटे, श्री.संतोष खेंडके पाटील

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७० मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील काम | सुधारीत काम |
|---|---|---|
| १ | पृ.क्र.डब्ल्यू १९७ अ.क्र.५२ वर वार्ड क्र.७० गजानन मंदिर चौकात हायमास्ट लावणे ३ लक्ष | वार्ड क्र.७० मध्ये<br>१. केबल कोपींग २५ हजार<br>२. पोल बॉक्स बसवणे २५ हजार<br>३. उर्जा बचत फिटींग लावणे-२५ हजार<br>४. पॅलन दुरूस्ती करणे-२५ हजार<br>५. मेटल हायलाईट लावणे-२५ हजार<br>६. नादुरूस्त केबल बदलणे-२५ हजार<br>७.इमारतीत विद्युत व्यवस्था करणे-२५ हजार<br>८.पोल शिफटींग करणे-२५ हजार<br>९.विविध पोलला अर्थींग करणे-२५ हजार<br>१०. विद्यानगर मध्ये उर्जा बचत फिटींग बसविणे-२५ हजार<br>११. छत्रपतीनगर मध्ये उर्जा बचत फिटींग बसविणे-२५ हजार<br>१२. छत्रपतीनगर सभागृह परिसरात पोलसह फिटींग बसविणे |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.५७ मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| पान नं. | सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार वळती करण्यात आलेल्या कामाचे नांव व तरतुद रक्कम | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W२१०/१७ | **लेखाशिर्ष-शहरी भागात खुल्या गटारी बांधणे**<br>(प्रभाग क्र.५७ रेंगटीपुरा ते मोंढा येथील गटार दुरूस्ती करणे- ५.०० तरतुदीमधुन दिनांक २६.१०.२००७ रोजीच्या सर्वसाधारण सभेतील ठरावानुसार र.रू.२.०० लक्ष वळती करण्यात आलेले आहेत)<br>बन्सीलालनगर अग्निशमन विभागाचे इमारतीस रंगरंगोटी करणे २.०० लक्ष | १) वार्ड क्र.६६ मध्ये जी आय पोल व उर्जा बचतीचे दिवे लावणे २.०० लक्ष |

सुचक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५७ मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| पान नं. | सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार वळती करण्यात आलेल्या कामाचे नांव व तरतुद रक्कम | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W२१०/१७ | **लेखाशिर्ष-शहरी भागात खुल्या गटारी बांधणे**<br>(प्रभाग क्र.५७ रेंगटीपुरा ते मोंढा येथील गटार दुरूस्ती करणे- ५.०० तरतुदीमधुन दिनांक २६.१०.२००७ रोजीच्या सर्वसाधारण सभेतील ठरावानुसार र.रू.२.०० लक्ष वळती करण्यात आलेले आहेत)<br>बन्सीलालनगर अग्निशमन विभागाचे इमारतीस रंगरंगोटी करणे २.०० लक्ष | १) वार्ड क्र.६६ मध्ये जी आय पोल व उर्जा बचतीचे दिवे लावणे २.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्वरदर्शन संचलीत ग्रामस्वराज्य उद्योजक महिला महासंघ, औरंगाबाद यांच्या मार्फत औरंगाबाद शहरात ग्रामोद्योग-२००८ हे मराठवाडा स्तरावरील कृषी, लघु,

ग्रामोद्योजक व बचत गटांचे पाचवे भव्य प्रदर्शन व ग्राम कलामहोत्सव चे आयोजन दिनांक ०९-१२ फेब्रुवारी २००८ या दरम्यान करण्यात येणार आहे. भागात उद्योजक निर्माण व्हावेत, महिलांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, ग्रामिण उद्योजकांना बाजारपेठ मिळावी, कलाकारांना व्यासपीठ मिळावे, तसेच सुजाण ग्राहक तयार करणे हा या प्रदर्शनाचा हेतू आहे.

सामाजिक कामात महानगरपालिकेचा सहभाग असावा या दृष्टिने सदरील उपक्रम महानगरपालिका, औरंगाबाद व ग्रामस्वराज्य उद्योजक महिला महासंघ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात यावा. तसेच सदरील उपक्रमासाठी गरवारे स्टेडियम जि.प.मैदान महानगरपालिकेमार्फत उक्त कालावधीसाठी उपलब्ध करून देण्यास व येणाऱ्या संभाव्य खर्चास मान्यता देण्यात यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : डॉ.भागवत कराड, श्री.संजय जोशी

अनुमोदक : श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर, श्री.प्रशांत देसरडा, श्री.सिताराम सुरे, श्री.नारायण कुचे श्री.महेश माळवतकर, सौ.विमलताई बेंद्रे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स्वरदर्शन संचलीत ग्रामस्वराज्य उद्योजक महिला महासंघ, औरंगाबाद यांच्या मार्फत औरंगाबाद शहरात ग्रामोद्योग-२००८ हे मराठवाडा स्तरावरील कृषी, लघु, ग्रामोद्योजक व बचत गटांचे पाचवे भव्य प्रदर्शन व ग्राम कलामहोत्सव चे आयोजन दिनांक ०९-१२ फेब्रुवारी २००८ या दरम्यान करण्यात येणार असल्यामूळे, सदरील उपक्रम महानगरपालिका, औरंगाबाद व ग्रामस्वराज्य उद्योजक महिला महासंघ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यास तसेच सदरील उपक्रमासाठी गरवारे स्टेडियम जि.प.मैदान महानगरपालिकेमार्फत उक्त कालावधीसाठी उपलब्ध करून देण्यास व येणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W २५/०३ | नवीन जी.आय.पोल (मुख्यालय)- १०.०० लक्ष | १.नवीन जी.आय.पोल (मुख्यालय) ८.७५ लक्ष<br>२. वार्ड क्र.६१ (वार्ड-ड तरतुद) मध्ये नवीन पथदिव्यांचे किरकोळ कामे करणे- १.२५ लक्ष. |

सुचक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W २५/०३ | नवीन जी.आय.पोल (मुख्यालय)- १०.०० लक्ष | १. नवीन जी.आय.पोल (मुख्यालय) ८.७५ लक्ष<br>२. वार्ड क्र.६१ (वार्ड-ड तरतुद) मध्ये नवीन पथदिव्यांचे किरकोळ कामे करणे- १.२५ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

(सभा संपेपर्यत सभागृहात अनेक स.सदस्य मा.महापौर डायस समोर मोठमोठयाने बोलत होते विविध घोषणा देणे चालूच होते. )

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.